UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**सभागृहातील कामकाजाच्या थेट प्रक्षेपणाबाबत**

श्री. गिरीष बापट : सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून सभागृहाला कळवू इच्छितो की, आजपासून विधानसभा व विधानपरिषद सभागृहांतील कामकाजाचे थेट प्रक्षेपण राज्यातील सर्व जनतेला पाहण्यासाठी सुरू करण्यात येत आहे. आपण सर्व पक्षांचे सन्माननीय सदस्य जनतेला न्याय देण्यासाठी पोटतिडीकीने भाषण करीत असतो. सभागृहातील कामकाज सर्वसामान्यांपर्यंत पोहचावे हा हेतू थेट प्रक्षेपणाच्या मागे आहे. त्यामुळे मी सन्माननीय सदस्यांना या संदर्भात विनंती करतो. आपण नंतरच्या काळात यामध्ये जास्तीत जास्त वाढ करण्याचा प्रयत्न करणार आहोत. आज फक्त प्रश्नोत्तराच्या तासाचेच थेट प्रक्षेपण दाखविण्याची प्रागोगिक तत्वावर सुरूवात होत आहे. मी आपल्या माहितीकरिता हे निवेदन करीत आहे.

**उप सभापती** : मी एक घोषणा करीत आहे.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, आजपासून विधानसभा व विधानपरिषद सभागृहांचे थेट प्रक्षेपण संपूर्ण राज्यामध्ये करण्याच्या संदर्भात निर्णय घेतला आहे. मी त्याबद्दल सर्व सन्माननीय सदस्यांतर्फे आपले अभिनंदन करतो. हे थेट प्रक्षेपण पूर्ण वेळ होणार आहे. सभागृहातील कामकाज राज्यातील, देशातील जनता पाहणार आहे. लोकसभा, राज्यसभा या सभागृहांतील सर्व प्रकारच्या कामकाजाचे थेट प्रक्षेपण सातत्याने होत आहे. लोकसभा व राज्यसभा यांनी थेट प्रक्षेपणाच्या दृष्टीने काही निकष आणि पध्दती यामध्ये बदल केले आहेत. सभागृहातील कामकाजाचे प्रतिबिंब जनतेमध्ये जाणार आहे. शासनाकडून प्रश्नांना न्याय मिळत आहे, त्याचप्रमाणे प्रश्न विचारणारे सन्माननीय सदस्य देखील प्रश्नांना न्याय देत आहेत हे जनतेला दिसणार आहे. त्यामुळे सदनामध्ये विशेष प्रकारचे वातावरण ठेवण्याच्या दृष्टीने

16-03-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A.2

MSK/ ST/ AKN/ 13:00

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. माणिकराव ठाकरे ....

एक चांगला उपक्रम असून मी त्याबाबत शुभेच्छा देतो. मी सर्व सन्माननीय सदस्यांनाही या संदर्भात शुभेच्छा देतो. राज्यातील जनतेला प्रत्यक्ष कामकाज पाहता येणार आहे. सभागृहामध्ये कोण काय करतो याची जाणीवही राज्यातील सर्व जनतेला होईल.

**उप सभापती** : मी एक घोषणा करीत आहे. संसदीय शासन प्रणालीत विधानमंडळाला लोकशाहीचे मंदिर समजले जाते.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, दोन्ही सभागृहांतील प्रश्नोत्तराच्या तासाच्या कामकाजाचे थेट प्रक्षेपण सबंध राज्यभर प्रायोगिक तत्वावर सुरू होत असल्याच्या संदर्भात माननीय संसदीय कामकाज मंत्र्यांनी निवेदन केले आहे. सभागृहातील विरोधी पक्षाच्या आणि सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांचे काम महाराष्ट्रातील जनतेसमोर येणार आहे. आम्ही उपस्थित केलेल्या प्रश्नांच्या उत्तरातून मिळालेला न्याय जनतेच्या समोर येणार आहे. मी थेट प्रक्षेपणाच्या संदर्भात माननीय संसदीय कामकाज मंत्र्यांचे आभार मानतो आणि सभागृहाचेही आभार मानतो.

श्री. गिरीष बापट : सभापती महोदय, सभागृहातील कामकाज आपल्या नेतृत्वाखाली चालविले जाते. थेट प्रक्षेपणाचे सर्वाधिकार विधानसभेमध्ये माननीय अध्यक्षांना आणि विधानपरिषदेमध्ये आपल्याला दिलेले आहेत. सभागृहातील कामकाजातील कोणता भाग दाखवायचा किंवा कोणता दाखवायचा नाही, याची व्यवस्था केली आहे. आपल्या परवानगीनेच सर्व प्रक्षेपण दाखविण्यात येईल आणि थांबविण्यातही येईल.

**उप सभापती** : होय. रिमोट कंट्रोल माझ्याकडे आहे. संसदीय शासन प्रणालीमध्ये विधानमंडळाला लोकशाहीचे मंदिर समजले जाते. सर्वोच्च व्यासपीठावर राज्याच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाच्या विषयावर चर्चा होऊन निर्णय घेतले जातात. सभागृहातील कामकाजाची सर्वसामान्य जनतेला माहिती होण्याच्या दृष्टीने आणि विविध वाहिन्यांद्वारे ते पाहता यावे म्हणून आजपासून सभागृहाचे कामकाज मराठी दूरचित्रवाहिन्यांवर थेट प्रक्षेपित करण्यात येत आहे. मी सर्व सन्माननीय सदस्यांना एका गोष्टीची जाणीव करून देऊ इच्छितो की, थेट प्रक्षेपणामुळे आपणा

**उप सभापती ....**

सर्वांची जबाबदारी वाढली आहे. सभागृहातील कामकाज नियमानुसार चालावे, कामकाजामध्ये गोंधळ होऊ नये, आक्षेपार्ह वर्तन होऊ नये याबाबतची जबाबदारी आपल्या सर्वांवर येते. सर्वांवर जनतेचे पूर्ण लक्ष आहे, याचे भान ठेवून सभागृहातील कामकाज सुरू करावे.

----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या सूचनेबाबत**

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मी नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या सूचनेच्या संदर्भात बोलू इच्छितो. राज्यामध्ये गारपीट आणि अवकाळी पाऊस झाला आहे. शासनाने निवेदन करतो असे सांगावे.

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, प्रश्नोत्तराच्या तासानंतर या संदर्भात म्हणणे मांडण्यासाठी आपल्याला संधी देण्यात येईल.

----

..5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : तोंडी उत्तरे

वदर्भातील संचन प्रकल्पांना निधी उपलब्ध करुन प्रकल्पांची कामे पूर्ण करण्याबाबत

(१) * ३०२८ श्री.मा णकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संदिप बाजोरिया, श्री.अनिल भोसले, श्री.सतिश चव्हाण, श्री. करण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.गो प कशन बाजोरीया, श्री.राजेंद्र मुळक, श्री.जगन्नाथ शंदे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू ख लफे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.शरद रण पसे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील : तारां कत प्रश्न क्रमांक ४८९४८ ला दिनांक ५ जून, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय जलसंपदा मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पश्चिम वदर्भातील संचन प्रकल्पांच्या कामासाठी मागणीनुसार निधी उपलब्ध झाला नसल्याने आज मतीस २ लाख ४७ हजार हेक्टर संचन अनुशेष कायम असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात दुष्काळ आ ण शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची संकटे कायम असताना वदर्भ संचन महामंडळाकडे दोन हजार कोटी रूपयांचा निधी पडून आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वदर्भातील काही संचन प्रकल्पाचे बांधकाम ७५ टक्क्यांपर्यंत पूर्ण असून या संचन प्रकल्पास वाढीव निधी देवून ते पूर्ण करण्यात येणार आहेत व ज्या संचन प्रकल्पाचे बांधकाम दहा टक्क्यापर्यंत करण्यात आले आहे अशा संचन प्रकल्पासाठी वाढीव निधी देण्यात येणार नसून ते पूर्ण करण्यात येणार नसल्याचा शासनाने निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वरील संचन प्रकल्पांची कामे त्वरीत पूर्ण करण्याबाबत व महामंडळाकडे पडून असलेला निधी संचन वकासासाठी उपलब्ध करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, वलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गरीष महाजन : (१) अंशतः खरे आहे. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्रा धकरणाच्या वा र्षक अहवालानुसार निर्देशांक व अनुशेष स मतीच्या अनुशेषापैकी जून २०१२ अखेर २२७७५ हजार हेक्टर रबी समतुल्य इतका अनुशेष अमरावती प्रदेशातील ३ जिल्ह्यांमध्ये शल्लक आहे. तथा प मागणीनुसार निधी उपलब्ध झाला नाही ही एकच कारण नसून भूसंपादन, पुनर्वसन, वन ज मन संपादन इ. कारणांमुळे अनुशेषाचे निर्मुलन होवू शकलेले नाही.

(२) होय.

..6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3028....

श्री. गिरीष महाजन ....

**(३) अनुशेषांतर्गत प्रकल्प तसेच ७५ % पेक्षा जास्त गुंतवणूक झालेल्या प्रकल्पावर निधी केंद्रीत करुन प्रकल्प पूर्ण करण्यास प्राधान्य देण्याचे ठर वण्यात आले आहे.**
**(४) भूसंपादन, पुनर्वसन, वन जमीन, स्थानिक शेतक-यांचा वरोध यासह प्रकल्पावरील अडचणी दूर करुन प्रकल्प कामांना गती देण्याच्या दृष्टीने शासन प्रयत्नशील आहे.**
**(५) प्रश्न उद्भवत नाही.**

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, विदर्भ मागासलेला आहे हे पुन्हा सांगण्याची गरज आहे असे मला वाटत नाही. विदर्भात सिंचन व्यवस्था अत्यंत तुटपुंजी आहे. विदर्भात सिंचन व्यवस्था पुरशी न झाल्यामुळे, जमीन सिंचनाखाली न आल्यामुळे तेथील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण वाढत आहे हे आपल्याला मान्य करावे लागेल. शासनाने देखील हे मान्य केले आहे की, विदर्भात 2 लाख 47 हजार हेक्टर सिंचन अनुशेष आहे. अमरावती विभागाचा अनुशेष जास्त आहे आणि त्या पाठोपाठ नागपूर विभागाचा अनुशेष आहे. शासनाने हा अनुशेष भरून काढण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. विदर्भाचे 2 हजार कोटी रुपये अखर्चित आहेत. विदर्भातील सिंचनाकरिता पैसे आले परंतु ते अजूनही अखर्चित आहेत. राज्य शासनाकडून ते संपूर्ण पैसे खर्च होण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. नव्या माननीय सिंचन मंत्र्यांनी पदभार स्वीकारल्यावर नव्याने प्रशासकीय मान्यतेकरिता प्रस्ताव आले आहेत. सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव आले आहेत. शासनाने कोणत्या प्रस्तावांना थांबवून ठेवले आहे, ते प्रस्ताव थांबवून ठेवण्याचे कारण काय आहे, प्रस्तावांना मान्यता न मिळण्याचे कारण काय, कोणत्या जिल्ह्यात किती अनुशेष आहे ? अनुशेष भरून काढण्याकरिता 2 हजार कोटी रुपये खर्च झाले पाहिजेत. राज्य शासन या संदर्भात कोणती पावले उचलणार आहे आणि सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी आलेले प्रस्ताव का रोखले आहेत या संदर्भातील उत्तर मिळाले पाहिजे.

श्री. गिरिष महाजन : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचे म्हणणे बरोबर आहे. पश्चिम विदर्भामध्ये 2 लाख 47 हजार हेक्टर इतका सिंचन अनुशेष आहे. सिंचन कमी कशामुळे झाले आहे, सिंचनासाठीचे 2100 कोटी रुपये शिल्लक आहेत या संदर्भात सन्माननीय सदस्यांकडून सांगण्यात आले आहे. निधीच्या अभावी कामे होत नाहीत, अशातील भाग नाही.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3028........

श्री.गिरीश महाजन.......

त्यामध्ये अनेक अडचणी आहेत. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे उपस्थित आहेत. त्यांना कल्पना आहे की, पूर्वीच्या शासनाने असे ठरविले होते की, सन 2005 पर्यंत सर्व अनुशेष भरुन काढू. परंतु, सन 2005 गेले, सन 2010 गेले आता आपण सन 2015 मध्ये आहोत, पण अद्याप अनुशेष भरुन निघालेला नाही. सन 2013-2014 अखेर 4 लाख 92 हजार हेक्टर पैकी 2 लाख 27 हजार हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळालेला नाही. निधी उपलब्ध असताना कामे रखडलेली आहेत. अनेक प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता मिळालेली नाही, प्रकल्पांच्या किंमती वाढलेल्या आहेत, वर्षानुवर्षे प्रकल्प रखडलेले आहेत, भूसंपादनाचे प्रश्न आहेत, अशा अनेक अडचणी आहेत. भूसंपादनासंदर्भात नवीन कायदा केंद्र सरकारने मंजूर केलेला आहे. त्यामुळे शेतकरी जमीन देण्यास तयार नाहीत. नवीन कायदा भूसंपादनासाठी लागू करावा, असे त्यांचे म्हणणे आहे. भूसंपादन कायद्यासंदर्भातील मार्गदर्शक सूचना अद्याप केंद्र सरकारकडून राज्य सरकारकडे आलेल्या नाहीत. त्यामुळे त्या कायद्याबाबतची स्पष्टता नाही. भूसंपादन हा विषय अतिशय महत्त्वाचा आहे. त्याचप्रमाणे पुनर्वसनाची अनेक कामे रखडलेली आहेत.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सुधारित प्रशासकीय मान्यता का देण्यात आली नाही, असा प्रश्न मी विचारला होता.

श्री.गिरीश महाजन : सभापती महोदय, माझे उत्तर अद्याप पूर्ण झालेले नाही. सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रश्न आहे, त्याचप्रमाणे भूसंपादनाचाही प्रश्न आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, भूसंपादनाबाबतचा प्रश्न मी विचारलेलाच नाही.

श्री.गिरीश महाजन : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सिंचन प्रकल्प का रखडले आहेत, उपलब्ध निधी का खर्च होत नाही, असे प्रश्न विचारले आहेत. त्यामुळे मला या संदर्भातील सविस्तर उत्तर देणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, अनेक ठिकाणी भूसंपादन होत नाही. नवीन कायदा केंद्र सरकारने मंजूर केलेला आहे. त्या कायद्यात नव्याने काही दुरूस्त्या करण्यात आल्या आहेत. परंतु, त्या संदर्भातील

...2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3028........

श्री.गिरीश महाजन.......

स्पष्टता अद्याप झालेली नाही. अनेक ठिकाणी पुनर्वसनाचे प्रश्न आहेत. पुनर्वसन करण्यामध्ये अनेक अडचणी येत आहेत. काही ठिकाणी प्रकल्प पूर्ण झाले असले तरी सिंचन क्षमता वाढलेली नाही. कारण, पुनर्वसनाचे प्रश्न आहेत. अनेक प्रकल्प अपुरे आहेत. लोक नवीन ठिकाणी जाण्यास तयार होत नाहीत. त्यामुळे प्रकल्प पूर्ण होत नाही व सिंचन क्षमता निर्माण होत नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सुधारित प्रशासकीय मान्यता का देण्यात आली नाही, असा प्रश्न उपस्थित केला आहे. याबाबतची कल्पना त्यांनाही आहे. सुधारित प्रशासकीय मान्यता मिळविण्यासाठी आपणही आपल्या सत्ताकाळात भरपूर प्रयत्न केले आहेत. माजी मुख्यमंत्री महोदयांनीही खूप प्रयत्न केले आहेत. परंतु, त्यात त्यांना यश मिळाले नाही. सुधारित प्रशासकीय मान्यतेअभावी प्रकल्प रखडलेले आहेत, ही वस्तुस्थिती आहे. सुधारित प्रशासकीय मान्यतेअभावी 39 प्रकल्प रखडलेले आहेत. दिनांक 16 फेब्रुवारी, 2015 रोजी मुख्यमंत्री महोयांनी सर्व संबंधित अधिकाऱ्यांसमवेत एक बैठक घेतली होती.

सभापती महोदय, मला सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांच्या प्रश्नाला पूर्ण न्याय द्यायचा आहे. त्यांच्या भागातील अनुशेष भरुन काढावयाचा आहे. सर्व प्रकल्पांना लवकरात लवकर सुधारित प्रशासकीय मान्यता द्यावी, अशा प्रकारच्या सूचना मुख्यमंत्री महोदयांनी बैठकीत दिलेल्या आहेत.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, जलसंपदा मंत्री महोदयांनी असे जाहीर वक्तव्य केले आहे की, " राज्यातील ज्या प्रकल्पांच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेबाबतची प्रकरणे माझ्याकडे आलेली आहेत त्यापैकी काही प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता मी देणार नाही." हे त्यांचे वक्तव्य वर्तमानपत्रात छापून आले आहे. त्या आधारावर मी असा प्रश्न विचारला होता की, त्यांनी कोणत्या प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता दिलेली नाही, कोणते प्रकल्प थांबविलेले आहेत, त्याची कारणे काय आहेत, असा साधा आणि सोपा प्रश्न मी विचारला होता. या प्रश्नाला उत्तर देण्याऐवजी मंत्री महोदय भूसंपादनाबाबतची माहिती देत आहेत.

श्री.गिरीश महाजन : सभापती महोदय, गेल्या चार महिन्यामध्ये आम्ही पावरनाला, डोमा,

...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3028........

श्री.गिरीश महाजन.......

ब्रम्ह्मा, उत्तरडोह, खडकी, दिग्रस अशा 6 प्रकल्पांना आणि राज्यातील 22 प्रकल्पांना मान्यता दिलेली आहे. यामधील 6 प्रकल्प सन्माननीय सदस्यांच्या भागातील म्हणजेच पश्चिम विदर्भातील आहेत. या प्रकल्पांना आम्ही मान्यता दिलेली आहे. एवढेच नाही तर सर्व कामांना आम्ही वेग दिलेला आहे. मुख्यमंत्री महोदयांनी डिसेंबर, 2014 मध्ये नागपूरला बैठक घेतली आणि सर्व अधिकाऱ्यांना असे सांगितले की, लवकरात लवकर याबाबतची कार्यवाही करावी. दर 15 दिवसांनी या संदर्भात बैठक होत आहे. आम्हाला सर्व अनुशेष भरुन काढावयाचा आहे. सुधारित प्रशासकीय मान्यता लवकरात लवकर कशी देता येईल, याबाबत शासन प्रयत्नशील आहे.

सभापती महोदय, विदर्भातील प्रकल्पांबाबत मागील सरकारने 15 ते 20 वर्षात काहीही केलेले नाही. गेल्या दोन-तीन वर्षात त्या सरकारने सुधारित प्रशासकीय मान्यताही दिलेली नाही. आम्ही 4 महिन्यात विदर्भातील 6 आणि अन्य 22 कामांना सुधारित प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. आमचा असा प्रयत्न आहे की, येत्या महिन्याभरात आणखी 6 ते 7 कामांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात यावी. येत्या तीन महिन्यात रखडलेल्या सर्व प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देऊन प्रश्न मार्गी लावण्याचा आमचा प्रयत्न आहे. कारण, या प्रकल्पांसाठी साधारणपणे 2100 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध आहे. त्याचप्रमाणे येत्या अर्थसंकल्पात देखील काही निधी मिळणार आहे. म्हणजे, जवळपास 3 हजार कोटी रुपये पडून आहेत. परंतु, काही तांत्रिक अडचणींमुळे प्रकल्प पूर्ण होत नाहीत. निश्चितपणे शासन याबाबत प्रयत्नशील आहे. येत्या तीन महिन्यात सर्व प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देऊन ही कामे पूर्ण करु.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, भूसंपादन आणि वन जमिनीचा अडथळा या दोन गोष्टींमुळे प्रकल्प पूर्ण होण्यास अडचणी निर्माण होत आहेत. भूसंपादन, पुनर्वसन, वन जमीन आणि स्थानिक शेतकऱ्यांचा विरोध या सर्व अडचणीतून मार्ग काढून प्रकल्प पूर्ण होण्याकरिता अधिकाऱ्यांची एक समिति नेमण्यात येईल का ?

श्री.गिरीश महाजन : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्याबाबत शासन गंभीर आहे आणि सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेचा विचार करु.

....4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3028........

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी अतिशय सविस्तर उत्तर दिलेले आहे. प्रश्न भाग 3 च्या उत्तरात असे नमूद केले आहे की, "75 टक्क्यांपेक्षा जास्त गुंतवणूक झालेल्या प्रकल्पांवर निधी केंद्रित करुन प्रकल्प पूर्ण करण्यास प्राधान्य देण्याचे ठरविण्यात आले आहे." असा निर्णय घेतला गेला असेल तर छोट्या प्रकल्पांचे भवितव्य काय असणार आहे आणि या बाबतीतील अडचण दूर करण्यासाठी शासनाचा ॲक्शन प्लॅन काय असणार आहे ?

श्री.गिरीश महाजन : सभापती महोदय, पश्चिम विदर्भाच्या बाबतीत तसा विषय नाही. राज्यभरामध्ये ज्या प्रकल्पांवर 75 टक्क्यांपेक्षा जास्त गुंतवणूक झाली आहे, त्या प्रकल्पांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत प्राधान्य देण्यात येणार आहे. जेणेकरुन हे प्रकल्प वर्षाभरात पूर्ण होतील आणि तसे ते या वर्षात पूर्ण करु. अन्य प्रकल्पांना पुढील वर्षात निधी देऊ. अशा प्रकारे दोन वर्षात ही कामे पूर्ण करणार आहोत. 100 टक्के सिंचन क्षमता कशी निर्माण करता येईल, यासाठी हे प्रयत्न करणार आहोत. विदर्भामधील प्रकल्पांसाठी निधीची अडचण नाही. सर्व प्रकल्पांसाठी निधी उपलब्ध आहे. जी कामे सुरु असतील मग ती कितीही टक्के पूर्ण झाली असली तरी त्यांना निधी देऊ आणि कामे पूर्ण करु.

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.प्रकाश बिनसाळे)**

श्री.रामराजे नाईक-निंबाळकर : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सविस्तर उत्तर दिलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी सुधारित प्रशासकीय मान्यतेबाबत जो प्रश्न विचारला आहे, त्याबाबतीतच मला उपप्रश्न विचारावयाचा आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी अर्थ मंत्री महोदय उपस्थित आहेत. त्यांच्या अधिपत्याखाली ईपीसी समिती आहे. या समितीसमोर सुधारित प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव येत असतात. या समितीमध्ये प्रशासनाचे काही उच्चपदस्थ अधिकारी आणि अर्थ व नियोजन विभागाचे सचिव देखील असतात. नियोजन विभागाचे सचिव आणि अर्थ सचिव यांनी सुधारित प्रशासकीय मान्यता द्यावी किंवा नाही, या विषयी गेली दोन-तीन वर्षे, पाच वर्षे बराच खल केलेला आहे, याची आपल्याला

...5.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3028........

श्री.रामराजे नाईक-निंबाळकर..........

माहिती आहे. आता प्रश्न असा तयार होतो की, हा केवळ विदर्भाचा नाही तर सर्व राज्याचा प्रश्न आहे. संपूर्ण राज्यातील प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यासाठी ईपीसी समिती असमर्थ ठरणार असेल तर मंत्रिमंडळापुढे हे प्रस्ताव आणून त्यांना मंजुरी प्रदान करणार आहात का ?

सभापती महोदय, सन 2013-2014 मध्ये आपण अेआयबीपी योजनेखाली राज्यातील चार सिंचन महामंडळांकडे निधी वर्ग केला होता. परंतु, या प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता नसल्यामुळे निधी खर्च करता आला नाही. आघाडी सरकारने मागील काळात निर्णय घेऊन ज्या ठिकाणी सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या वर निधी खर्च करण्याची परवानगी आहे, त्या ठिकाणी अेआयबीपीचा निधी देण्याबाबतची परवानगी दिली होती. त्याच पध्दतीने सन 2014-2015 मध्ये अेआयबीपीचा निधी खर्च करण्यास परवानगी देणार आहात का ?

श्री.सुधीर मुनगंटीवार : सन्माननीय सदस्यांनी ईपीसीबाबतचा उल्लेख या ठिकाणी केला आहे. गेल्या 10 वर्षात या राज्यामधील सिंचन प्रकल्पांकडे गंभीरपणे लक्ष देण्याची आवश्यकता होती. दुर्दैवाने राज्याने एवढे उत्तरदायित्त्व वाढवून ठेवले की, एकूण 70 हजार कोटी रूपये या प्रकल्पांसाठी खर्च येणार असून दरवर्षी आपण 7 हजार कोटी रूपये या प्रकल्पांवर खर्च करतो आणि 10 टक्के दरवाढ होत असते. परंतु, या 7 हजार कोटी रूपयांचा आपल्याला अपेक्षित परिणाम दिसून येत नाही. सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याबाबत मागील सरकारमध्ये मतभिन्नता होती.

यानंतर श्री.वि.खर्चे........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3028....

श्री.सुधीर मुनगंटीवार...

तत्कलीन मुख्यमंत्री महोदयांनी सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचे निर्णय जलद गतीने का घेतले नाहीत, याबाबत मी माहिती घेतली तेव्हा सुधारित प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर त्या कामासाठी निधीची तरतूद करता आली नाही तर सुधारित प्रशासकीय मान्यता देऊन देखील अपेक्षित सिंचन क्षमता निर्माण करता येत नाही. आता सरकार स्पष्टपणे एका नितीमध्ये विचार करीत आहे की, प्रकल्प एका वर्षात पूर्ण होणारे आहेत, त्या प्रकल्पांना या वर्षात पूर्ण निधी देण्यात येणार आहे. पुढील दोन वर्षात जे प्रकल्प पूर्ण होणार आहेत व त्यांना या वर्षी जितक्या निधीची आवश्यकता आहे तितका निधी आणि पुढील वर्षात जितक्या निधीची आवश्यकता आहे तितका निधी पुढील वर्षात देण्यात येणार आहे. इतर जे मोठे प्रकल्प आहेत त्याबाबत दोन निर्णय सरकारच्या विचाराधीन आहेत.

सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी सांगितल्याप्रमाणे हा अनुशेष चिंता आणि चिंतनाचा विषय आहे. सन 2000 मध्ये माननीय राज्यपाल महोदयांना आघाडी सरकारने सांगितले होते की, अमरावती जिल्ह्यातील चार जिल्ह्यांचा अनुशेष आम्ही सन 2005 पर्यंत पूर्ण करू. परंतु सन 2005 पर्यंत हा अनुशेष आघाडी सरकारला पूर्ण करता आला नाही. त्यानंतर हा अनुशेष सन 2010 पर्यंत पूर्ण करु असे सांगण्यात आले. परंतु 2010 पर्यंत देखील हा अनुशेष पूर्ण होऊ शकलेला नाही. त्यानंतर सन 2015 पर्यंत अनुशेष पूर्ण करण्यात येईल असे सांगितले होते. सन 2015 पर्यंत देखील हा अनुशेष पूर्ण होऊ शकलेला नाही. त्यामुळे यासंदर्भातील कारणे शोधावी लागतील. विरोधी पक्षाच्या व सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना असे वाटते की, हा अनुशेष पूर्ण झाला पाहिजे. सभागृहात बसलेल्या कोणत्याही पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना राज्यांच्या हितासाठी काम करण्यात आनंद वाटतो. आम्हाला व आपणाला देखील असे वाटते की, सिंचन प्रकल्प पूर्ण झाले पाहिजेत. त्यामुळे याम काय समस्या आहेत, याचा विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे पहिली समस्या सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याची आहे. सन्माननीय सदस्य श्री.रामराजे नाईक निंबाळकर साहेब, अगोदर राज्यात प्रशासकीय सुधारीत मान्यता देण्याचा अधिकार संबंधित महामंडळांना होता. त्यामुळे सुधारीत

...2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3028....

श्री.सुधीर मुनगंटीवार...

प्रशासकीय मान्यता देण्याचा विषय राज्य स्तरावर न आणता तेथील महामंडळांनी यावर निर्णय घ्यावा काय ही बाब सरकारच्या विचाराधीन आहे. याबाबत लवकर निर्णय करण्याची सरकारची मानसिकता आहे व हा अधिकार पुन्हा जशाचा तसा मराठवाडा व विदर्भ या दोन महामंडळांना देण्याचा शासन विचार करीत आहे.

सभापती महोदय, ईपीसीच्या संदर्भात या अगोदर बैठक झाली आहे. आपणाला देखील माहिती आहे की, काही प्रकल्पांबाबत शंका आणि संदिग्धता असतात. मंत्री महोदयांनी ईपीसी व सुधारित प्रशासकीय मान्यतेबाबत सांगितले आहे. सुधारित प्रशासकीय मान्यता देतांना ती तपासून पहावी लागणार आहे. सुधारित प्रशासकीय मान्यता न तपासता देणे हे तुम्हा आम्हाला अपेक्षित असेल असे मला वाटत नाही. सुधारित प्रशासकीय मान्यता देतांना 5 कोटी रुपयांचा प्रकल्प 500 कोटी रुपये होत असेल तर त्याबाबत अभ्यास करावा लागेल. आपण जनतेच्या पैशांचे विश्वस्त आहोत, त्यामुळे अभ्यास करुन ज्या प्रकल्पाला निधीची आवश्यकता आहे त्या प्रकल्पाला निधी दिला जाणार आहे.

सभापती महोदय, ज्या सुधारित प्रशासकीय मान्यता राज्य स्तरावर देण्याची आवश्यकता आहे त्यांना गती देण्याचा मानस शासनाचा आहे. तिसरा विषय असा आहे की, विधानसभा व विधानपरिषद किंवा लोकमानस यांना अशी चिंता आहे की, हा निधी देतांना राज्य सरकारकडे अतिशय मर्यादित साधन संपत्ती आहे. प्रकल्पवाईज कर्ज उभे करुन मर्यादित कालावधीत हे प्रकल्प पुर्ण करता येतील काय याबाबत शासन विचार करीत आहे. डिफर्ड पेमेंट च्या माध्यमातून यामध्ये स्कीम आणता येईल काय ? ॲन्युईटीच्या माध्यमातून स्कीम आणता येईल काय या सर्व विषयावर शासनाकडून अभ्यास सुरु आहे. सिंचन प्रकल्प वेगाने पूर्ण करता येतील काय ? या विरोधी पक्षाच्या भावनेशी सरकार सहमत आहे. आज देशात सिंचनाच्या बाबतीत आपले राज्य 28 व्या क्रमांकावर आहे. झारखंड राज्याची चिंन क्षमता 5.38 टक्के असून ते 29 व्या क्रमांकावर आहे. महाराष्ट्र राज्याची सिंचन क्षमता 17.50 टक्केच्या जवळपास आहे. इतर सर्व राज्य सिंचनामध्ये अतिशय पुढे आहेत. पंजाब, हरियाणा हे राज्य सिंचनाच्या बाबतीत अतिशय पुढे आहेत. त्यामुळे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3028....

श्री.सुधीर मुनगंटीवार...

तेथील दरडोई उत्पन्न अतिशय जास्त आहे. महाराष्ट्रातील सिंचनाच्या बाबतीत जनता अतिशय चिंताग्रस्त आहे. मी सभागृहाला असे आश्वासन देत आहे की, नवीन सरकार सिंचनाच्या बाबतीत अतिशय गंभीर आहे, सन्माननीय सदस्यांचे मार्गदर्शन आणि सूचनांचे सरकार स्वागत करणार आहे. हे सरकार ईपीसी लवकर घेणार आहे. यासाठी सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचा अधिकार विदर्भ व मराठवाड महामंडळाना देण्याचा विचार शासनाचा आहे. कर्ज किंवा इतर माध्यमातून साधन संपत्ती निर्माण करण्याचा विचार शासन अतिशय गंभीरपणे करीत आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, एका वर्षात पूर्ण होणाऱ्या प्रकल्पांना अग्रक्रमाने पूर्ण निधी देण्यात येईल. त्याचप्रमाणे मंत्री महोदयांनी पुन्हा असे देखील सांगितले की, 5 कोटी रुपयांचे प्रकल्प 500 कोटी रुपयांवर गेले आहेत, अशा प्रकल्पांची चौकशी करण्यात येईल. एका वर्षात पूर्ण होणारे असे प्रकल्प किती आहेत, त्यामध्ये चौकशी करण्यासारखे किती प्रकल्प आहेत. याची माहिती मंत्री महोदय देतील काय ?

श्री.गिरीष महाजन : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जी माहिती मागितली आहे ती आता नसली तरी 43 प्रकल्प अग्रक्रमाने या वर्षी पूर्ण करण्यात येणार आहेत. पुढील वर्षी जवळपास 95 प्रकल्प पूर्ण करण्यात येणार आहेत. या प्रकल्पांची सिंचन क्षमता पूर्णपणे वाढविण्यात येणार आहे.

श्री. गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, विदर्भातील विशेषतः अकोला, बुलढाणा, वाशिम व यवतमाळ या चार जिल्ह्यांमध्ये 2009-2010 मध्ये सर्वात जास्त आत्महत्या झाल्या होत्या. त्यावेळी केंद्र शासनाने 3750 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले होते. या पॅकेजमधील 2200 कोटी रुपये सिंचनासाठी राखीव होते. हे 2000 कोटी रुपये त्या 2200 कोटी रुपयांपैकी आहेत काय ? 2200 कोटी रुपये विदर्भातील 6 जिल्ह्यांसाठी राखीव होते त्याबाबत शासनाने काय नियोजन केले आहे ?



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3028....

श्री.गिरीष महाजन : सभापती महोदय, 2200 कोटी रुपये हे पॅकेजचे होते ती रक्कम वेगळी होती. त्या रकमेचा सिंचन पॅकेजशी काहीही संबंध नाही. 6 जिल्ह्यांसाठी जे पॅकेज देण्यात आले होते, त्या निधीचे काय केले हा विषय या विभागाशी संबंधित नाही तो महसूल विभागाचा आहे. त्या निधीचा आणि जलसंपदा खात्याचा काही संबंध नाही.

-----------

...5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**लघुपाटबंधारे योजना काचुर्ली (ता.त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक) या प्रकल्पाच्या कामामध्ये झालेला गैरव्यवहार**

**(२) * ३४६१ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेगगःग तारांकित प्रश्न क्रमांक ११७१ ला दिनांक १२ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भातः** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लघुपाटबंधारे योजना काचुर्ली (ता.त्र्यंबकेश्वर जि.नाशिक)कया प्रकल्पाच्या कामामध्ये मोठया प्रमाणात गैरव्यवहार करण्यात आल्याची तक्रार जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी दिनांक ९ ऑगस्ट, २०१४ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,ससदर प्रकल्पाच्या कामाची महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था तसेच दक्षता व गुणनियंत्रक विभागाकडून तपासणी करण्याची मागणी करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?
**श्री. गिरीष महाजन :** (१) होय,
(२) होय,
(३) व (४) नाही. दक्षता पथक ठाणे मार्फत चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्याबाबत त्यांना कळविण्यात आले आहे. त्यानुसार चौकशी सुरु आहे.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, हा प्रश्न मी मागील अधिवेशनात देखील विचारला होता. त्यावेळेस देण्यात आलेले उत्तर व आता देण्यात आलेले लेखी उत्तर यामध्ये एका शब्दाचा देखील फरक नाही. लोकप्रतिनिधी ज्या वेळी सांगतात की, या कामांमध्ये अनियमितता झालेली आहे, त्यावेळी शासनाचे त्याचा विचार केला पाहिजे. माझा तालुका आदिवासी आहे, तेथे सिंचन होत असताना अधिकाऱ्यांच्या भ्रष्ट प्रवृत्तीमुळे येथील कामांमध्ये चुका होत आहेत, मागील अधिवेशनात विचारलेल्या प्रश्नाला असे उत्तर दिले होते की, या कामाबाबत चौकशी करण्यात येईल. या कामाबाबत मी मेरी संस्थेकडून व क्वॉलिटी कंट्रोल यांच्याकडून चौकशी करण्यात यावी अशी मागणी केली होती. आता असे उत्तर देण्यात आले की, दक्षता पथक ठाणे यांच्या माध्यमातून चौकशी करण्यात येत आहे असे उत्तर देण्यात आले आहे. माझा पहिला प्रश्न असा आहे की, गेल्या अधिवेशनात विचारलेल्या प्रश्नांची चौकशी आजतागायत का झाली नाही.

...6...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3461...

श्री.जयवंतराव जाधव...

सभापती महोदय, जलविज्ञान भवन नाशिक यांच्याकडून प्राप्त पाणी उपलब्धता प्रमाणपत्रा प्रमाणे जया क्षमतेचे हे धरण होणे अपेक्षित होते त्या पध्दतीने हे धरण झाले नाही. असा माझा आरोप आहे. हे खरे आहे काय ? धरणाचे काम चालू असताना प्रत्यक्षात सिंचन क्षमता निर्माण झालेली नसताना सिंचन क्षमता निर्माण झालेली आहे असे शासनाकडे संबंधित अधिकाऱ्यांकडून कळविण्यात आले आहे. हे खरे आहे काय ? कोणत्या माहितीच्या आधारे संबंधित अधिकाऱ्यांनी अशी माहिती कळविली आहे. याची चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यावर शासन कारवाई करणार आहे काय ?

श्री.गिरीष महाजन : सभापती महोदय, साठवण तलाव काचुर्ली, तालुका त्र्यंबकेश्वर या प्रकल्पाला शासनाने 7 मे 2004 रोजी प्रशासकीय मान्यता दिली होती. त्यावेळी त्या प्रकल्पाची किंमत 3 कोटी 91 लाख रुपये होती. त्यानंतर सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी हे प्रकरण आले त्यावेळी त्या प्रकल्पाची किंमत 6 कोटी 87 लाख रुपये इतकी झाली होती. या तलावाची साठवण क्षमता 73 एमसीएफटी इतकी आहे.

या नंतर श्री.बोरले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3461........

श्री.गिरीष महाजन..........

आता पर्यंत जे काम झालेले आहे त्या माध्यमातून या धरणात 45 एमसीएफटी पाणी थांबलेले आहे. या धरणाच्या सांडव्याचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही. या धरणाचे काम पूर्ण झालेले आहे. परंतु धरणाच्या वेस्ट वेअरचे काम पूर्ण न झाल्यामुळे या धरणात पूर्ण क्षमतेने पाणी थांबत नाही. वेस्ट वेअरचे काम पूर्ण झाल्यानंतर या धरणात पूर्ण क्षमतेने पाणी थांबेल.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, वेस्ट वेअरचे काम पूर्ण झालेले नाही. मग सिंचन क्षमता पूर्ण झालेली नसताना संबंधित अधिकाऱ्यांनी शासनाची दिशाभूल का केली ?

श्री.गिरीष महाजन : सभापती महोदय, या धरणाचे वेस्ट वेअर बांधावयाचे राहिलेले आहे....

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, मंत्री महोदय संबंधित अधिकाऱ्यांना पाठीशी घालण्याचा प्रयत्न करीत आहेत काय ? जर त्या ठिकाणी सिंचन क्षमता पूर्ण झालेली नाही तर संबंधित अधिकाऱ्यांनी शासनाला कोणत्या आधारे ही माहिती कळविली आहे ?

श्री.गिरीष महाजन : सभापती महोदय, आज या धरणात जेवढे पाणी आहे तेवढी सिंचन क्षमता त्या ठिकाणी निर्माण झालेली आहे. मी मघाशीच सांगितले की, या धरणात 65 टक्के पाणी साठा झालेला आहे. या धरणाच्या सांडव्याचे काम पूर्ण झालेले नसल्यामुळे धरणात पूर्ण क्षमतेने पाणी साठलेले नाही.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, माननीय जलसंपदा मंत्री नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत. त्यामुळे या प्रकल्पाबाबत मी त्यांच्याकडून विशेष मदत मागू इच्छितो. सभापती महोदय, ज्यावेळी संबंधित अधिकाऱ्यांनी शासनाला सिंचन क्षमता कळविली त्यावेळी तेथे साधे पाण्याचे डबके देखील नव्हते आणि आता संबंधित अधिकारी त्या ठिकाणी सिंचन क्षमता होत असल्याचे शासनाला कळवीत आहेत. अशा प्रकारे अधिकाऱ्यांचा गैरव्यवहार सुरु आहे आणि आपण त्यांना पाठीशी घालणार आहात काय, आपण त्याची चौकशी करणार नाही काय ? मी मागील अधिवेशनात देखील या संदर्भात प्रश्न उपस्थित केला होता आणि आज देखील मी हा प्रश्न

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3461........

श्री.जयवंतराव जाधव.......

उपस्थित केलेला आहे. चौकशी सुरु आहे, असे सांगितले जाते. या चौकशीचा अहवाल सभागृहात केव्हा सादर होणार आहे ?

श्री.गिरीष महाजन : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले की, या धरणात 65 टक्के पाणी साठलेले आहे. या धरणाच्या वेस्ट वेअरचे काम अपूर्ण आहे. त्यामुळे या धरणात फक्त 65 टक्केच पाणी साठलेले आहे. या धरणात जेवढे पाणी साठलेले आहे तेवढी सिंचन क्षमता झालेली आहे. हे धरण अंशतः पूर्ण झालेले आहे....

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, रेकॉर्डवर चुकीचे येत आहे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव, आपण कृपया खाली बसावे. आपण मंत्री महोदयांचे उत्तर ऐकूण घ्यावे.

श्री.गिरीष महाजन : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांना सांगू इच्छितो की, आपण पत्र दिल्याबरोबर मी या कामाची चौकशी करण्याचा निर्णय घेतला. आपण आता पर्यंत याबाबत अनेक वेळा सभागृहात प्रश्न उपस्थित केले, पत्रे देखील दिली. परंतु आता पर्यंत साधे चौकशीचे आदेश देखील देण्यात आले नव्हते. आपण पत्र दिल्याबरोबर मी या कामाची दक्षता पथक, ठाणे यांच्या मार्फत चौकशी करण्याचा निर्णय घेतला आणि त्यांचा अहवाल आल्यानंतर जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी या कामाची दक्षता पथक, ठाणे यांच्या मार्फत चौकशी सुरु आहे असे सांगितले. माझा प्रश्न असा आहे की, आपण जी चौकशी करणार आहात ती आता पर्यंत झालेल्या कामाच्या संदर्भात आहे, की त्या कामातील कोणत्या त्रुटींच्या संदर्भात आहे आणि त्रुटी निघाल्या असतील तर हे काम करणाऱ्या कंत्राटदारावर आपण कारवाई करणार आहात काय ? तसेच, आपण उर्वरित काम किती दिवसात पूर्ण करुन सिंचनाचे पोटेंशिअल पूर्णपणे उपयोगात येईल या दृष्टीने कोणती पावले टाकणार आहात ?

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3461........

श्री.गिरीष महाजन : सभापती महोदय, मी अगोदरही सांगितले की, या कामाची दक्षता पथक, ठाणे यांच्या मार्फत चौकशी केली जाईल आणि जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल. सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी काम पूर्ण केले जाईल काय, असा दुसरा प्रश्न उपस्थित केलेला आहे. मी मघाशीच सांगितले की, सुरुवातीला या प्रकल्पाची प्रशासकीय मान्यता 3 कोटी 91 लाख रुपये होती आणि त्यानंतर या प्रकल्पाची किंमत जवळपास 10 कोटी 87 लाख रुपये झालेली आहे. हे प्रकरण सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी शासनाच्या विचाराधीन आहे आणि जो पर्यंत सुधारित प्रशासकीय मान्यता मिळत नाही तो पर्यंत आपल्याला पुढील काम करता येत नाही, या धरणाच्या वेस्ट वेअरचे काम पूर्ण करता येत नाही. सुधारित प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर हे काम पूर्ण केले जाईल.

श्री.अविनाश वारजूकर : सभापती महोदय, जलसंपदा मंत्री अत्यंत कडक आहेत. त्यांनी जलसंपदा विभागाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर लगेच सांगितले की, त्यांच्याकडे काही गुत्तेदार 100 कोटी रुपये घेऊन आले होते. त्याचे पुढे काय झाले, याची आम्हाला माहिती नाही. परंतु त्यांना कोणी ऑफर दिली होती आणि त्यांनी त्यांच्यावर कोणती कारवाई केली, या संदर्भात ते सभागृहाला माहिती देतील का, मंत्री महोदय त्यांची नावे सभागृहात जाहीर करतील का ?

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.अविनाश वारजूकर यांनी विचारलेला प्रश्न तारांकित प्रश्नाशी संबंधित नाही.

श्री.दीपकराव साळुंखे : सभापती महोदय, मघाशी मंत्री महोदयांनी सांगितले की, धरणात 65 टक्के पाणी साठा झालेला आहे. परंतु अद्याप वेस्ट वेअरचे काम पूर्ण झालेले नाही. माझा प्रश्न असा आहे की, वेस्ट वेअरचे काम पूर्ण झालेले नसताना सिंचन क्षमता पूर्ण झालेली आहे असे उत्तर संबंधित अधिकाऱ्यांनी मंत्री महोदयांकडे कसे काय दिले ? म्हणून शासन संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करणार आहे काय ? वेस्ट वेअरचे काम पूर्ण झाल्याशिवाय धरणात एक थेंब देखील पाणी थांबत नाही, याची अधिकारी आणि मंत्री महोदयांना माहिती नसेल तर ती दुर्दैवाची बाब आहे.

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3461........

श्री.गिरीष महाजन : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दीपकराव साळुंखे यांनी सांगितले की, धरणाच्या वेस्ट वेअरचे काम पूर्ण झाल्याशिवाय धरणात पाणी थांबत नाही. आपण या संदर्भातील तांत्रिक माहिती घ्यावी. मी आपल्याला सांगू इच्छितो की, आज या धरणात 65 टक्के साणी साठा झालेला आहे. वेस्ट वेअरचे काम पूर्ण झाल्यानंतर उर्वरित 35 टक्के साठवण क्षमता देखील पूर्ण होईल आणि त्या ठिकाणी पूर्ण क्षमतेने सिंचन होईल.

---------

..5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

राज्यातील प्राथ मक आरोग्य केंद्र, व जिल्हा रुग्णालयातील डाटा एंट्री ऑपरेटर
कम अकाऊंटंट यांना थ कत वेतन अदा करण्याबाबत

(३) * २६५३ **श्री.धनंजय मुंडे श्री.सुनील** तटकरे, श्री.अमर संह पं डत, **श्री.सतीश** चव्हाण :

सन्माननीय सार्वजनिक आरोग्य आ ण **कुटुंब** कल्याण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आरोग्य वभागामार्फत राज्यातील सर्व प्राथ मक आरोग्य केंद्र, जिल्हा रुग्णालयात डाटा ऐंट्री ऑपरेटर कम अकाउंटट या पदाच्या नेमणुका करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर डाटा एंट्री ऑपरेटर कम अकाउंटंट यांच्या नेमणूका ईगल सेक्युरिटी ॲण्ड पर्सनल सर्व्हिसेस, मुंबई या कंपनी मार्फत करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कंपनीने या डाटा एंट्री ऑपरेटर कम अकाउंटंट यांना माहे मार्च २०१४ पासून वेतन दिलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नऊ महिन्यांपासून थ कत वेतन मिळावे व ते वेतन न देणाऱ्या कंपनी वरुद्ध कारवाई करण्याच्या मागणीसाठी अ खल भारतीय एडीईओ संघटना परिसंघाने मुंबईच्या आझाद मैदानावर दिनांक २० जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास धरणे आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर मागणीनुसार या डाटा एंट्री ऑपरेटर कम अकाऊंटंट यांना थ कत वेतन देऊन शासनाने कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, वलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.राम शिंदे,** डॉ.दीपक सावंत **यांच्याकरिता :** (१) व (२) अंशतः खरे आहे.
राष्ट्रीय आरोग्य अ भयानांतर्गत आवश्यक असलेल्या डेटा एन्ट्री ऑपरेटर कम अकाउटंट या कंत्राटी तत्वावरील पदांच्या सेवा पुर वण्यासाठी मे. ईगल सक्युरिटी ॲण्ड पर्सनल स र्वसेस यांना शासनाने नि वदेच्या माध्यमातून कंत्राट दिले असून सदर कंपनीमार्फत राज्यातील राष्ट्रीय आरोग्य अ भयानांतर्गत डाटा एन्ट्री ऑपरेटरची नियुक्ती करण्यात आली आहे.
(३) अंशतः खरे आहे.
सदर कंपनीने काही अकाऊन्टंट कम डाटा एन्ट्री ऑपरेटर यांना माहे ए प्रल २०१४ पर्यंतचे वेतन अदा केले असल्याचे कळ वले आहे. तसेच सदर कंपनीने अकाऊन्टंट कम डाटा एन्ट्री ऑपरेटर यांना मे, २०१४ पासून वेतन अदा केलेले नाही.
(४) हे खरे आहे.
(५) आ खल भारतीय एडीईओ संघटना परिसंघ व मे. ईगल सक्यरिटी ॲण्ड पर्सनल स र्वसेस, मुंबई यांच्या सोबत दि. ३१/१/२०१५ रोजी आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई येथे बैठक आयोजित करण्यात आली होती बैठकीमध्ये मे. ईगल सक्यरिटी ॲण्ड पर्सनल स र्वसेस, मुंबई यांनी राष्ट्रीय आरोग्य



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2653........

प्रा.राम शिंदे........

अ भयानामार्फत मिळालेल्या हजेरी पत्रकामध्ये मोठ्या प्रमाणावर त्रुटी असल्याचे नमूद केले. यासाठी जिल्हा स्तरावर समिती गठीत करुन सुधारीत हजेरी पत्रक लवकरात लवकर राष्ट्रीय आरोग्य अभियान कक्षाकडे पाठ वण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार जिल्हा स्तरावर समिती गठीत करुन माहे फेब्रुवारी, २०१४ ते जानेवारी, २०१५ या कालावधीतील हजेरी पडताळणी करण्याचे काम पुर्ण झाले आहे. त्यानुसार आता या कर्मचाऱ्यांना थेट वेतन अदा करण्याची कार्यवाही करण्याचे वचाराधीन आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, आरोग्य विभागामार्फत राज्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र, जिल्हा रुग्णालय व उप जिल्हा रुग्णालयात डाटा एट्री ऑपरेटर कम अकाउंटंटचे काम करण्यासाठी मनुष्यबळ पुरविण्यासाठी ईगल सिक्युरिटी ॲण्ड पर्सनल सर्व्हिसेस, मुंबई या कंपनी बरोबर फेब्रुवारी, 2014 रोजी आरोग्य विभागाने करार केला होता. या कंपनीने मार्च, 2014 मध्ये 2,298 सुशिक्षित बरोजगारांची या कामासाठी नियुक्ती केली. तथापि, एक वर्ष होऊनही यापैकी एकाही कर्मचाऱ्यास वेतन दिले गेले नाही. एडीईओ या संघटनेने या संदर्भात आझाद मैदानावर आंदोलनही केले होते. तारांकि प्रश्नाला दिलेल्या लेखी उत्तरात असे नमूद केलेले आहे की, "आता या कर्मचाऱ्यांना थेट वेतन अदा करण्याची कार्यवाही करण्याचे विचाराधीन आहे." ही कार्यवाही एका महिन्यात पूर्ण करण्यात येणार आहे काय ? तसेच, माझा दुसरा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, एका वर्षापासून वेतन न देणाऱ्या कंपनीविरुद्ध शासन कोणती कारवाई करणार आहे ? या बेरोजगारांना जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात सामावून घेण्याबाबत शासनाची काय भूमिका आहे ? वेगवेगळ्या विभागात आऊट सोर्सिंगच्या माध्यमातून भरती करण्यात येत आहे. मात्र या कंपन्या त्या कर्मचाऱ्यांना पगार देत नाहीत, त्यांची फसवणूक करतात, याबाबत शासन कोणता निर्णय घेणार आहे ?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, मे.ईगल सिक्युरिटी ॲण्ड पर्सनल सर्व्हिसेस, मुंबई या कंपनीला दिनांक 7 फेब्रुवारी, 2014 रोजी कार्यादेश दिलेला आहे. त्यानुसार नॅशनल हेल्थ मिशन

..7...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2653........

प्रा.राम शिंदे........

आणि भारत सरकारच्या संयुक्त विद्यमाने डाटा एटी ऑपरेटर कम अकाउंटंट पदाच्या 2,298 जागा भरण्यात आल्या होत्या, हे खरे आहे. या संदर्भात सदरहू संघटनेने आझाद मैदानावर धरणे आणि उपोषण केले. त्यांनी फसवणूक केली. या कंपनीने जाहिरातीमध्ये शासनाचा लोगो वापरला. त्याच बरोबर त्यांना सुरक्षित नोकरी देण्यात येईल, असेही म्हटले. या पदासाठी कॉमर्स ग्रॅज्युएट आणि एमएससीआयटी असे मिनिमम क्वॉलिफिकेशन होते. ही शैक्षणिक पात्रता धारण केलेल्या उमेदवारांची नियुक्ती झाल्यानंतर त्या उमेदवारांच्या असे लक्षात आले की, ही नोकरी कायम स्वरूपी नाही.

यानंतर श्री.भोगले........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2653.....

प्रा.राम शिंदे......

दरम्यानच्या कालखंडात डिस्प्युट झाले आणि स्टूडण्ट पूर्णत्वाने कामावर आले नाहीत व त्यांना पेमेंट देण्यामध्ये त्यांची फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. निश्चित स्वरूपामध्ये त्यांना पेमेंट देण्यात आलेले नाही.

श्री.धनंजय मुंडे : डाटा एन्ट्री ऑपरेटर कामावर आले नाहीत असे म्हणता येणार नाही. त्यांनी एक वर्ष काम केले आहे.

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, कामावर आले नाहीत असे म्हटले नाही. त्यांचे देणे बाकी आहे. त्यामुळे या संस्थेच्या संदर्भात जी कारवाई करणे अपेक्षित आहे त्याबाबत बैठक झाली. त्या बैठकीमध्ये विद्यार्थी, एनआरएचएमचे अधिकारी, भारत सरकार आणि आरोग्य विभागाचे अधिकारी उपस्थित होते. या बैठकीमध्ये तोडगा काढण्याचे ठरले. त्यानुसार त्यांची सर्व जिल्हावार हजेरी पत्रके पडताळणी करण्याचे ठरले. दरम्यानच्या कालखंडात दोन बैठका झाल्यानंतर सदर संस्थेकडून जर यामध्ये काही अडचण आली तर दरडोई प्रती व्यक्ती 500 रूपये दंडाची तरतूद केलेली आहे. माझ्याकडे अहवाल आलेला आहे.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी पाच उपप्रश्न विचारले होते, त्यापैकी 4 प्रश्नांना मी अनुकूल उत्तर दिले आहे. फेब्रुवारी, 2014 पासून जानेवारी, 2015 पर्यंत अनुपस्थितीच्या संदर्भात चौकशी केली असता कंपनीला रू.23,32,325 इतका दंड आकारला आहे. विद्यार्थ्यांना पेमेंट देण्याच्या संदर्भात कंपनी हायकोर्टात गेली. हायकोर्टात 18 मार्च रोजी सुनावणी असल्यामुळे हे प्रकरण न्यायप्रविष्ठ झालेले आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सदर कंपनीला काम देताना त्यांच्याकडून सिक्युरिटी डिपॉझिट घेतले होते का, या कंपनीचे संचालक कोण आहेत, कंपनीने पेमेंट विद्यार्थ्यांना पेमेंट दिले नाही, तेवढ्या कालावधीत कंपनीला शासनाकडून किती रक्कम अदा केली गेली?

प्रा.राम शिंदे : कंपनीचा करार रद्द करण्यात आला असून सिक्युरिटी डिपॉझिट जप्त करण्यात आले आहे. या संस्थेच्या संचालक मंडळाची नावे पटलावर ठेवण्यात येतील.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, लोकशाहीमध्ये काहीही फायनल नसते. उत्तरामध्ये अंशतः खरे आहे असे म्हटले आहे. अंशतः काय खरे आहे याबाबत खुलासा केलेला नाही. कंपनीने कामगारांची फसवणूक केलेली आहे. एप्रिल, 2014 पर्यंतचे वेतन दिलेले नाही हे खरे आहे. कामगारांचा पगार देण्याच्या संदर्भात कंपनीने कोर्टात दावा दाखल केला ही सबब मान्य होऊ शकत नाही. कामगारांना केलेल्या कामाचा मोबदला मिळविण्याचा घटनेने अधिकार दिलेला आहे. कंपनीला कामगारांनी केलेल्या कामाबद्दल पगार अदा करावाच लागतो. मंत्री महोदय अभ्यासू आहेत. हा प्रश्न उपस्थित करण्यामागे हाच उद्देश होता की, एप्रिल 2014 पर्यंतचा पगार त्या कामगारांना आजपर्यंत मिळालेला नाही. त्याकरिता हे डाटा एन्ट्री ऑपरेटर आझाद मैदानावर उपोषणासाठी बसलेले आहेत. त्यांचे थकित वेतन तत्काळ देण्यासाठी सरकार या कंपनीला बाध्य करणार आहे काय? कंपनीने हजेरी पत्रकाबाबत मॅन्युप्युलेशन केले आहे हे मान्य केले आहे. कंपनीचा करार रद्द केल्याचे म्हटले आहे. कंपनीने केलेली चूक ही गुन्हेगारी प्रवृत्तीची असल्यामुळे या कंपनीविरुध्द तशा प्रकरचा गुन्हा दाखल केला जाईल काय?

प्रा.राम शिंदे : या कंपनीला कॉन्ट्रॅक्ट दिल्यापासून कंपनीने डाटा एन्ट्री ऑपरेटर्सना एक रुपयाही वेतन दिलेले नाही. त्याना थेट पगार देण्याबाबत आरोग्य विभागाने विधी व न्याय विभागाकडे नस्ती सादर केली होती. कंपनीच्या माध्यमातून करार केलेला असल्यामुळे त्यांना थेट पगार देता येणार नाही असे त्या विभागाने अभिप्राय दिले आहेत. हे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे जो काही निर्णय न्यायालय देईल त्यानुसार कारवाई करण्यात येईल.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, हा 2298 कामगारांचा प्रश्न आहे. या कामगारांना गरोदर मातांची नोंदणी करणे, आरोग्य केंद्रांचे ऑडिट करणे ही कामे करावयाची होती. त्यांनी पूर्ण एक वर्ष काम केले आहे. शासनाचे मत आहे की कंपनी आणि विभागाचे जमले नाही, कंपनी कोर्टात गेली, त्यामुळे कंपनीचे सिक्युरिटी डिपॉझिट जप्त करण्यात आले आहे. या सिक्युरिटी डिपॉझिटच्या रक्कमेतून कामगारांना त्यांचे वेतन देणे सहज शक्य आहे. त्यांनी केलेल्या कामाचा मोबदला मागितला आहे. तो मोबदला त्यांना तातडीने दिला जाईल काय? या कंपनीने शासनाची

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

आणि 2298 कामगारांची फसवणूक केली असल्यामुळे या कंपनीविरुध्द फसवणुकीचा गुन्हा दाखल केला जाईल काय?

..3..



प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, कंपनीच्या माध्यमातून प्रथमदर्शनी निश्चित स्वरुपात शासनाची आणि त्या 2298 कामगारांची फसवणूक झाली आहे. त्या कंपनीने शासनाचा लोगो वापरला म्हणून त्यांच्याविरुध्द फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल करण्यात येईल. या कामगारांना पगार देण्याच्या संदर्भात आरोग्य विभागाकडून विधी व न्याय विभागाकडून अभिप्राय मागविले होते. त्या कामगारांना थेट पगार देण्याच्या संदर्भात आर्बिट्रेटर नेमण्याची कार्यवाही करण्यात येईल.

श्री.भाई जगताप : ही कार्यवाही किती दिवसात करण्यात येईल?

प्रा.राम शिंदे : लवकरात लवकर करण्यात येईल.

-----------

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**मु.पो. कट्टा (ता. मालवण,जि.सिंधुदुर्ग) येथील समादेवी मंदिर ते गोकुळ आळी या रस्त्याचे डांबरीकरण करणेबाबतत**

**(४) * u३५५५ uuश्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अमरसिंह पंडिततःत** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय

(१) मु.पो. कट्टा (ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग) येथील समादेवी मंदिर ते गोकुळ आळी तसेच नांदोस येथील रस्त्यांच्या रुंदीकरण, खडीकरण व डांबरीकरणाचे काम अद्याप करण्यात आले नसल्याने सदर भागातून ये-जा करणाऱ्या वाहनांच्या वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामपंचायतीकडे निधी असतांना सुध्दा वरील भागातील रस्त्याचे रुंदीकरण, डांबरीकरण व खडीकरण करण्यास ग्रामपंचायत दुर्लक्ष करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच मु.पो. कट्टा (ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग) येथील समादेवी मंदिर ते गोकुळ आळी तसेच नांदोस येथील ग्रामपंचायतीच्या हद्दीत पिण्याचे पाणी व रस्त्यावरील पथदिवे याची सोय नसल्याने तेथील ग्रामस्थांमध्ये नैराश्याचे वातावरण निर्माण झालेले आहे, ही ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त दोन्ही सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे दुर्लक्ष करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, सदर कामे लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दीपक केसरकर, श्रीमती पंकजा मुंडे यांच्याकरिता :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

समादेवी मंदिर ते गोकुळ आळी तसेच नांदोस येथील ग्रामपंचायतीच्या हद्दीत पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. रस्त्यावरील सौरपथदिवे व स्ट्रीट लाईट बसविण्यात आले असून चालू स्थितीत आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) सदर रस्ता खडीकरण व डांबरीकरण करण्याच्या दृष्टीने जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, हा प्रश्न सिंधुदुर्ग जिल्हयाच्या संदर्भात असून माननीय राज्यमंत्री त्याच जिल्हयाचे प्रतिनिधीत्व करीत असल्यामुळे तेथील ग्रामस्थांना न्याय देण्याच्या दृष्टीने काय करता येईल याकरिता हा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. ग्रामपंचायतीच्या हद्दीत पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे असे उत्तरामध्ये म्हटले आहे. निश्चितपणे काय व्यवस्था केली आहे? या योजनेवर किती खर्च झाला आहे, आज ही योजना सुरु आहे का?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

16-03-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) E.5

SGB/ AKN/ ST/ 13:40

ता.प्र.क्र.3555.....

श्री.हेमंत टकले......

सभापती महोदय, सौर पथ दिवे आणि स्ट्रीट लाईट या योजना वेगवेगळ्या आहेत का? सौर पथ दिवे बसविण्यात आले असून स्ट्रीट लाईट नंतर बसविले जाणार आहेत का याचा खुलासा होत नाही. छोट्या छोट्या गावातील कामांची गुणवत्ता न राखल्यामुळे आणि त्या कामांचे वेळापत्रक न पाळल्यामुळे ग्रामस्थांमध्ये नाराजी निर्माण होते आणि त्यांची गैरसोय होते.

नंतर एफ.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3555...

श्री.हेमंत टकले...

या दृष्टीने या प्रश्नाचा विचार करून आपण नागरिकांना न्याय द्यावा. तसेच, तेथे आपण सौर ऊर्जेवर चालविण्यासाठी पथ दिवे बसविले असतील तर त्यांची आजची स्थिती काय आहे, यासंबंधी खुलासा केला जाईल काय ?

श्री.दीपक केसरकर : सभापती महोदय, या प्रश्नाचे तीन भाग आहेत. पहिला प्रश्न हा रस्त्याच्या संबंधातील आहे. आपण ज्या रस्त्याच्या उल्लेख केला आहे तो गुरामवाडी हद्दीतील 800 मीटरचा आहे. 500 मीटर रस्ता हा नांदोस येथील आहे. गुरामवाडी येथील रस्त्याचे सन 1997-98 मध्ये डांबरीकरण झाले होते. या रस्त्याला गटर्स नाहीत. रस्त्याच्या दोन्ही बाजूला अतिक्रमणे आहेत. गडगे आहेत. त्यामुळे ही दुरूस्ती झाल्याशिवाय तेथे गटर्स होऊ शकत नाही. त्यामुळे हा रस्ता दरवर्षी खराब होतो. गेल्या वर्षी ग्रामपंचायतीने या रस्त्यावर 8000 रूपये खर्च केले होते. नांदोस हद्दीतील 500 मीटरचा रस्ता पूर्णपणे खडीकरणाचा होता. परंतु, त्या भागाचे खासदार श्री.विनायक राऊत यांनी त्यापैकी 250 मीटरच्या रस्त्याला निधी मिळवून दिलेला आहे. ते काम पूर्ण झालेले आहे. त्या विभागाचे आमदार सन्माननीय सदस्य श्री.वैभव नाईक यांनी 250 मीटर रस्ता दुरूस्त करण्यासंबंधीचा प्रस्ताव दिलेला आहे. पण त्यास अजून मंजुरी दिलेली नाही. त्यास मंजुरी दिल्यानंतर 250 मीटर रस्त्याचे काम पूर्ण करण्यात येईल. म्हणजे नांदोस गावाचे काम पूर्ण होईल. तेथील अतिक्रमण दूर करून रस्त्याचे रूंदीकरण केले पाहिजे. त्यासंबंधी ग्रामपंचायतीला कळविण्यात आले आहे. सदर जागा उपलब्ध करून देण्याची विनंती ग्रामपंचायतीने लोकांना केलेली आहे. तेथे गटर्स झाले तर रस्ता खराब होणार नाही हे ग्रामपंचायत लोकांना समजावून सांगत आहे. या रस्त्याची डागडुजी करण्यासाठी जिल्हा वार्षिक नियोजन मंडळामार्फत प्रस्ताव पाठविण्यात यावा असे देखील त्यांना कळविण्यात आले आहे. सदर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर त्यावर योग्य तो विचार केला जाईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3555...

श्री.दीपक केसरकर....

सभापती महोदय, येथे दुसरा प्रश्न पाणी पुरवठ्या संबंधी विचारण्यात आला आहे. येथे गोकुळ आळीचा उल्लेख करण्यात आला आहे. येथे 30 कनेक्शन्स आहेत. नांदोस गावाची एकूण लोकसंख्या 1585 आहे. वरची गुरामवाडी येथील लोकसंख्या 2678 इतकी आहे. नांदोस ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये 425 कुटुंबे आहेत. त्यापैकी 239 जणांना कनेक्शन्स देण्यात आली आहेत. म्हणजे जेवढ्या लोकांनी कनेक्शन्सची मागणी केली होती तेवढ्यांना कनेक्शन्स देण्यात आलेले आहे. ही योजना जलस्वराज्य योजनेमधून राबविण्यात आली होती. त्याव्यतिरिक्त 21 सार्वजनिक आणि खाजगी विहिरीतून पाणी पुरवठा केला जातो. गुरामवाडी येथे एकूण 675 कुटुंबे आहेत. त्यात 179 कनेक्शन्स आहेत. ही जुनी योजना असून ती एमजीपी मार्फत राबविण्यात आली होती. तेथे 33 सार्वजनिक विहिरी अस्तिस्त्वात आहेत, तर 4 विंधन विहिरी देण्यात आलेल्या आहेत. तेथील एकाच वाडीची मागणी असल्यामुळे राष्ट्रीय पेय जल योजनेतून एक विहीर मंजूर करण्यात आली आहे.

सभापती महोदय, तिसरा प्रश्न लाईट संबंधातील आहे. स्ट्रीट लाईट आणि सौर दिवे यामध्ये फरक आहे. स्ट्रीट लाईटची ब्रॅकेट मंजूर केली जातात. त्याचा खर्च शासनातर्फे देण्यात येतो. येथे एकूण 17 सौर दिवे असून ते सुरू आहेत. पर्यावरण संतुलन योजनेमधून दरवर्षी दिवे देण्यात येतात. त्यातून दिवे देण्याची आम्ही काळजी घेऊ. मला वाटते की, माझ्या या उत्तराने आपले समाधान झाले असेल.

.......



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**बांबू व्यवसायाला प्रोत्साहन देण्याबाबत**

**(5) * 2688 श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार, श्री.मितेश भांगडिया : तारांकित प्रश्न क्रमांक २१०९ ला दिनांक १९ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील बांबू व्यवसायाला प्रोत्साहन देण्याकरिता शासनाचे धोरण काय आहे,
(2) असल्यास, आतापर्यंत त्यानुसार शासनाने कोणत्या सवलती व्यावसायिकांना दिल्या आहेत,
(3) असल्यास, त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(4) नसल्यास, धोरण न ठरविण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१), (2) व (३) बांबू व्यवसायाला प्रोत्साहन देण्याकरिता ४ डिसेंबर, २०१४ रोजी नवीन बांबू धोरण जाहीर करण्यात आले असून, त्यात १) खाजगी जमिनीवर बांबू लागवडीस प्रोत्साहन देणे. २) खाजगी जमिनीवरील बांबूस वाहतूक पासाच्या बंधनातून मुक्त करणे. ३) बांबू क्षेत्रातील उद्योजकांना ई-लिलाव पध्दतीने पारदर्शकरीत्या बांबू पुरवठा करणे. ४) बुरुड कामगारांना वन विभागाकडे नोंदणी करुन त्यांना स्वामित्व शुल्क (Royalty) तसेच वनविकास कर न आकारता बांबू पुरवठा करणे. ५) शास्त्रोक्त पध्दतीने बांबू लागवड व औद्योगिक वापरासाठी प्रशिक्षण व प्रसार करण्यासाठी प्रशिक्षण केंद्राची स्थापना करणे. ६) ज्या गावाजवळच्या वनक्षेत्रात स्थानिक लोकांना संयुक्त वनव्यवस्थापन समिती व ग्रामवन समिती मार्फत बांबूचा निष्कासन व जतन करणे याचा समावेश आहे.

शासनाने आतापर्यंत याबाबत घेण्यात आलेले निर्णय खालील प्रमाणे आहे.

* शासन निर्णय दिनांक २१/०२/२०१४ अन्वये ई-लिलाव द्वारे बांबू उद्योजकांना बांबू पुरवठाचा निर्णय घेण्यात आला.
* दिनांक २४/६/२०१३ च्या अधिसूचनान्वये खाजगी क्षेत्रातील Dendrocalamus strictusuव Bambusa bambos या दोन प्रजाती व्यतिरिक्त इतर सर्व प्रजातीना वाहतूक परवाना पासून मुक्त करण्यात आले.
* दिनांक ३०/१०/२०१४ च्या अधिसूचने अन्वये बुरडांना बांबूवरील वनविकास करातून सूट देण्यात आली व त्यांनतर ५/१२/२०१४ च्या शासन निर्णयान्वये बुरडांना स्वामित्व शुल्कातून सूट देण्यात आली व तसेच ज्या बुरडांची नोंदणी करण्यात आली नाही, त्यांची नोंदणी करण्यास मान्यता देण्यात आली.
* दिनांक ४/१२/२०१४ च्या शासन निर्णयानुसार जाहिर करण्यात आलेल्या नवीन बांबू धोरणाची अंमलबजावणी करिता चिचपल्ली, जिल्हा चंद्रपूर येथे संशोधन व प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला.

(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2688

श्री.अनिल सोले : सभापती महोदय, सन 2010 मध्ये बांबू विषयीचे धोरण निश्चित झाले आहे अशा प्रकारची माहिती येथे आलेली आहे आणि ते सत्यही आहे. यासंबंधी प्रभावीपणे कार्यवाही व्हावयास पाहिजे होती, ती होताना काही दिसत नाही. माननीय मंत्री महोदयांनी त्यास गती आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. तरी देखील काही प्रश्न हे उपस्थित होत आहेत. बांबू व्यवसायाला प्रोत्साहन देण्याचा विचार हा फक्त 3-4 विभागांपुरताचा होतो. आदिवासी, कृषी, ग्रामविकास, वन विभाग फक्त बांबू व्यवसायाचा विचार करीत आहे. त्यामुळे महाराष्ट्र बांबू स्टेट ऑथोरिटी किंवा एजन्सी किंवा कॉर्पोरेशन स्थापन करून एका छताखाली बांबू व्यवसाय आणण्यासंबंधी शासनाने काही निर्णय घेतला आहे काय ? बांबू इंडस्ट्री डेव्हलप करण्याच्या दृष्टीने एक मास्टर प्लॅन तयार करण्याचा शासनाचा मानस आहे काय ? बांबू हा इको फ्रेंडली आहे. त्यामुळे वेगवेगळ्या खात्यांमध्ये याचा वापर केला पाहिजे. कन्स्ट्रक्शन ॲक्टीव्हिटीमध्ये, शाळांचे फर्निचर बनविण्यामध्ये, इंटिरियर डेकोरेशनमध्ये व राज्य शासनाच्या विविध खात्यांमध्ये बांबूचा उपयोग करण्यासंबंधीचे धोरण किंवा निर्णय शासनाने घेतला आहे काय ?

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रश्न बिल्ट-अप करीत आहेत की, लक्षवेधी सूचना बिल्ट-अप करीत आहेत ?

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा प्रश्न मोठा असला तरी त्यांची भावना अतिशय मोठी आहे. दिनांक 4 डिसेंबर 2014 रोजी शासनाने नवीन बांबू धोरण जाहीर केले आहे. आता दोनच महिन्यांनंतर सन्माननीय सदस्य विचारत आहेत की, या धोरणाचा काहीच प्रभाव दिसत नाही. शासनाने दिनांक 4 डिसेंबर 2014 रोजी बांबू धोरण जाहीर केले आहे. या धोरणा नुसार महाराष्ट्रातील सर्व बुरूड कामगारांना ......

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, बांबूचा प्रभाव म्हणजे काय हे आम्हाला कळले पाहिजे.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2688...

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, बांबू धोरणाचा प्रभाव दिसत नाही असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे. बांबू धोरणाचा प्रभाव दिसायला काही कालावधी लागणार आहे. त्यामुळे या आर्थिक वर्षामध्ये काही तरी तरतूद करण्याचा सरकारचा मानस आहे. शास्त्रोक्त पद्धतीने बांबू लागवड व औद्योगिक वापरासाठी प्रशिक्षण व प्रसार करण्यासाठी चिचपल्ली येथे प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याचा निर्णय झालेला आहे. भारत सरकारच्या डायरेक्टर जनरल ऑफ एम्प्लॉयमेंट अँड ट्रेनिंग यांच्या माध्यमातून शास्त्रोक्त पद्धतीने महाराष्ट्रात बांबूची लागवड करण्यात येणार आहे. ही लागवड आदिवासी, कृषी विभाग यांच्या मार्फत देखील करता येईल. यासाठी एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प सुरू करण्याचा शासनाचा मानस आहे. येणाऱ्या काळामध्ये त्याची लवकरच घोषणा करण्यात येणार आहे. बांबूचा बांधकामासाठी, हँण्डीक्रॉफ्टच्या वस्तू बनविण्यासाठी,फाईन प्रोडक्ट बनविण्यासाठी उपयोग करता येईल. अशा प्रकारे शास्त्रीय पद्धतीवर आधारित अभ्यासक्रम ठेवून बांबू धोरण यशस्वीपणे अंमलात आणण्याचा आम्ही निर्णय केलेला आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, पूर्व विदर्भातील विशेषतः गडचिरोली, चंद्रपूर येथील जंगलांमध्ये बांबू मोठ्या प्रमाणावर आहे. हा विभाग आदिवासी आहे. येथे रोजगार उपलब्ध व्हावा या दृष्टीने दिनांक 4 डिसेंबर 2014 रोजी चांगल्या प्रकारचे धोरण राज्य शासनाने आणलेले आहे.

यानंतर श्री.जुन्नरे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2588.......

श्री. माणिकराव ठाकरे .......

आदिवासी भागातील लहान मोठया उद्योगांमध्ये कामगारांना प्रशिक्षण देण्याचा प्रश्न असून वेगवेगळया उद्योगातील कामगारांना प्रशिक्षण देण्याच्या दृष्टीने शासनाने चांगल्या प्रकारचे धोरण आखलेले आहे. विदर्भामध्ये कागद निर्मितीचे मोठे उद्योग आहेत. या ठिकाणच्या कागद उद्योगांना लांब अंतरावरुन कच्चा माल आणावा लागत असतो. कागद निर्मितीसाठी लांब अंतरावरुन बांबू किंवा लाकूड आणावे लागत असल्यामुळे कागद निर्मिती महाग पडते. पर्यायाने आता त्याचा परिणाम कामगारांवर सुध्दा होऊ लागला आहे. येथे मोठया प्रमाणात कागद निर्मिती उद्योग असून येथील कागद निर्मितीचे उद्योग बाहेरच्या राज्यात जाऊ नये व पर्यायाने या आदिवासी भागातील कामगार बेकार होऊ नये, यासाठी कागद निर्मिती उद्योगातील कामगारांना न्याय देण्याच्या संदर्भात शासनाची नेमकी कोणती भूमिका राहणार आहे ?

श्री. सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, या राज्यातील 90 टक्के बांबू गडचिरोली व चंद्रपूर या क्षेत्रामध्ये निर्माण होत असतो. परंतु राज्यपाल महोदयांनी तसेच या अगोदरचे केंद्रीय मंत्री माननीय श्री. जयराम रमेशजी यांनी गावाला 60 टक्के बांबूचा निर्णय घेण्याचा अधिकार दिला होता. एकूण निर्माण होणाऱ्या 90 टक्के बांबू पैकी, 60 टक्के बांबूची विल्हेवाट कशी लावायची या बाबतचा निर्णय गावाकडे दिला असून उरलेल्या 40 टक्के बांबूच्या संदर्भात शासनाने ई- ऑक्शन करण्याचा निर्णय घेतलेला आहे. छोटया उद्योगांसाठी, विस्तार धारकांना व बांबूवरील पारंपरिक हक्क धारकांकडे हा बांबू राखीव ठेवलेला असून बाकी बांबू त्याच महसूल विभागातील उद्योगांना ई-ऑक्शनमधून घेता येणार आहे. त्यामुळे कामगारांवर बेरोजगाराची पाळी येणार नाही, अशी या धोरणातून शासनाला अपेक्षा आहे. अमरावती विभागातील मेळघाट व नागपूर विभागातील गडचिरोली व चंद्रपूर या तीन ठिकाणी एकंदर बांबूपैकी 90 टक्के बांबूची निर्मिती होत असते. त्यामुळे याच महसूल विभागातील उद्योगांना ई-ऑक्शनमध्ये सहभागी होता येणार आहे.

**उप सभापती :** प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

----

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : सभापती यांच्यावर अविश्वास
**मु.शी.** : सभापती श्री. शिवाजीराव देशमुख यांच्यावर सर्वश्री अमरसिंह पंडित, सतिश चव्हाण, अनिल भोसले, जयवंतराव जाधव, प्रकाश बिनसाळे, ॲड. राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री प्रकाश गजभिये, हेमंत टकले, दिपकराव साळुंखे, राजेंद्र जैन, संदिप बाजोरिया, ख्वाजा बेग, किरण पावसकर, जगन्नाथ शिंदे, नरेंद्र पाटील, आनंद ठाकूर, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री रामराव वडकुते, प्रभाकर घार्गे, वि.प.स. यांनी दिलेला अविश्वासाचा प्रस्ताव.

***श्री. अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १८३(ग) व म.वि.प.नियम ११ अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो :-***

***"महाराष्ट्र विधानपरिषदेचे मा.सभापती श्री.शिवाजीराव देशमुख यांनी सभागृहाचा विश्वास गमावला असल्याने त्यांना सभापती पदावरून दूर करण्यात यावे."***

***श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मला पॉईंट ऑफ ऑर्डरच्या मुद्यावर बोलावयाचे आहे.***

**उप सभापती :** मी सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित यांना बोलण्याची परवानगी दिलेली असून त्यांनी अविश्वासाच्या प्रस्तावावर आपले विचार मांडावेत.

(काँग्रेस पक्षाचे काही सन्माननीय सदस्य उभे राहून एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, महाराष्ट्र विधानसभेचे माननीय सभापती यांनी विश्वास गमावला असल्यामुळे त्यांना सभापती पदावरून दूर करण्यात यावे, असा मी प्रस्ताव मांडलेला आहे. महाराष्ट्र विधानपरिषदेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची सर्वाधिक सदस्य संख्या आहे. विधान परिषद नियम व लोकशाहीच्या संकेतानुसार या सभागृहातील विरोधी पक्षाचे नेते पद राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला मिळणे क्रमप्राप्त असताना डिसेंबर, 2014 च्या अधिवेशनात विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते पद राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवाराला मिळावे यासाठी आम्ही सभापती महोदयांकडे वारंवार मागणी केली होती. परंतु सभापती महोदयांनी



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित...

पक्षपातीपणाची भूमिका घेत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाला विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते पद देण्यामध्ये विलंब केल्यामुळे, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष माननीय सभापतींविरुध्द अविश्वास प्रस्ताव मांडत आहे.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, .....

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

**उप सभापती :** आता मी इतर सन्माननीय सदस्यांना या संदर्भात विचार मांडण्याची संधी देणार आहे. या विषयाच्या संदर्भात या पूर्वी ठरल्याप्रमाणे गट नेते आपले विचार मांडतील. ठरावाचे वाचन झाले असून सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे हे गट नेते असल्यामुळे आपल्याला ठरावाच्या संदर्भात विचार मांडावयाचे असतील तर आपण ते मांडू शकता.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, .....

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, ...

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**उप सभापती :** सभागृहात सन्माननीय सदस्य एकाचवेळी मोठमोठयाने बोलत असल्यामुळे मला सभागृहाचे कामकाज करणे अवघड जात आहे. यामुळे सन्माननीय सदस्यांनी सभागृहात शांतता पाळावी, अशी विनंती करतो.

प्रा.जनार्दन चांदूरकर : सभापती महोदय, आपण मला पॉईंट ऑफ प्रोसिजरवर बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपला शतशः आभारी आहे.

**उप सभापती :** प्रस्ताव वाचून झालेला असल्यामुळे मी सन्माननीय गट नेते श्री. माणिकराव ठाकरे यांना प्रस्तावावर भाषण करण्याची परवानगी दिलेली आहे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, पॉईंट ऑफ प्रोसिजरच्या संदर्भात आपण सन्माननीय सदस्य श्री. जनार्दन चांदूरकर यांना विचार मांडण्याची परवानगी दिलेली आहे.

**उप सभापती :** आपल्याला विनंती करतो की, प्रस्तावावर विचार मांडण्याची संधी मी सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनाच दिलेली आहे.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सदनामध्ये कोणतेही कामकाज सुरु असताना एखाद्या सन्माननीय सदस्यांनी पॉईंट ऑफ प्रोसिजरच्या संदर्भात परवानगी मागितली असता व त्यांना आपण परवानगी दिलेली असताना सन्माननीय सदस्यांना पॉईंट ऑफ प्रोसिजरच्या मुद्यावर बोलू दिले पाहिजे. या ठिकाणी पॉईंट ऑफ ऑर्डरचा मुद्दा नसून पॉईंट ऑफ प्रोसिजरचा मुद्दा आहे. पॉईंट ऑफ प्रोसिजर संदर्भात सन्माननीय सदस्य प्रा. चांदूरकर यांनी परवानगी मागितली असून आपण त्यांना त्या संदर्भात परवानगी देखील दिलेली आहे. सन्माननीय सदस्यांचा पॉईंट ऑफ प्रोसिजरचा मुद्दा आपण ऐकून घेणार की, नाही, हा माझा सवाल आहे. सन्माननीय सदस्यांना पॉईंट ऑफ प्रोजिसरचा मुद्दा उपस्थित करण्याचा अधिकार घटनेने दिला असून त्यांना पॉईंट ऑफ प्रोसिजरचा मुद्दा मांडण्याची संधी द्यावी. त्यांचा मुद्दा मांडून झाल्यानंतर आपल्याला जो काही निर्णय द्यावयाचा आहे, तो आपण खुशाल द्यावा.

प्रा. जनार्दन चांदूरकर : माननीय उप सभापती महोदय, मी मांडत असलेल्या मुद्याला आपण पॉईंट ऑफ ऑर्डर म्हणा, पॉईंट ऑफ प्रोसिजर म्हणा किंवा पॉईंट ऑफ प्रोप्रायटी म्हणा. परंतु या सभागृहात एका अत्यंत महत्वाच्या विषयावर जो बेकायशीर, घटनाबाह्य प्रस्ताव आलेला आहे, त्या प्रस्तावाला विरोध करण्यासाठी मी पॉईंट ऑफ ऑर्डर मांडत आहे.

यानंतर श्री. अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जर्नादन चांदूरकर....

भारतीय घटनेच्या अनुच्छेद 183 अन्वये लोकसभेचे अध्यक्ष मावळंकर यांच्यावर अविश्वास ठराव आला होता त्यावेळी झालेल्या चर्चेच्या वेळी पॉईट ऑफ ऑर्डर किंवा पॉईट ऑफ प्रोसिजर यापैकी काहीही म्हणा तो मांडण्यात आला होता. तसेच लोकसभा अध्यक्ष श्री.बलराम जाखर यांच्यावरील अविश्वास प्रस्तावाच्या वेळी देखील पॉईंट ऑफ ऑर्डर मांडण्यात आला होता. त्या बेसीसवर मी या सभागृहात माझा पॉईट ऑफ ऑर्डर म्हणा किंवा पॉईंट ऑफ प्रोसिजर मांडू इच्छितो. आपण त्या मुद्यावर निर्णय दिल्याशिवाय सभागृहाचे कामकाज पुढे चालवू नये, अशी माझी आपणास विनंती आहे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य प्रा.जर्नादर चांदूरकर यांना मी सांगू इच्छितो की, या प्रस्तावावर विचार करण्यासाठी कामकाज सल्लागार समितीची बैठक झाली होती. त्या बैठकीमध्ये ह्या प्रस्तावावर विचार करण्यासाठी आजची तारीख ठरविण्यात आली होती. तेव्हा आता पुन्हा नव्याने कोणताही विचार करता येणार नाही. कामकाज सल्लागार समितीमध्ये हा प्रस्ताव आज घेण्यात यावा, असा प्रस्ताव मंजूर झालेला आहे. माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, कामकाज सल्लागार समितीमध्ये हा विषय उपस्थित झाला त्यावेळी सर्व सदस्य उपस्थित होते. तेव्हा नव्याने प्रस्ताव तयार करता येणार नाही. या प्रस्तावावर फक्त गट नेत्यांनी बोलावे असे ठरलेले आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, आपण जी मिटींग घेतली होती ती मिटींग म्हणजे सभागृह नाही. हे सार्वभौम सभागृह आहे. या सभागृहाला सर्व अधिकार आहेत. आपण केबीनमध्ये मिटींग घेतली, त्यामध्ये कोणता निर्णय झाला, त्यापेक्षा या सार्वभौम सभागृहाला अधिकार आहेत. मला घटनेने जो अधिकार मिळालेला आहे तो अधिकार हिरावून घेण्याचा कोणाला अधिकार नाही.

"माननीय सभापती यांनी सभागृहाचा विश्वास गमावला असल्याने त्यांना सभापती पदावरुन दूर करण्यात यावे" असा एक-दोन ओळींचा आपण प्रस्ताव वाचून दाखविला. ज्यावेळी नियमाप्रमाणे प्रस्ताव दिला जातो त्यावेळी त्यांनी विश्वास का गमावला आहे, हे स्पष्टपणे सांगितले पाहिजे. त्यांनी कुठे बलात्कार गेला, कुठे खून केला, कुठे चोरी केली, त्यांनी कोणते नियमबाह्य काम केले ते कामकाजावर दाखविले पाहिजे होते. जोपर्यंत ते दाखविले जात नाही, सांगितले जात नाही,

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामदास कदम....

त्यांनी कशामुळे सभागृहाचा विश्वास गमावला हे स्पष्ट होत नाही, तोपर्यंत हा प्रस्ताव सभागृहात आणू शकत नाही. म्हातारी मेल्याचे दु:ख नाही. हे सार्वभौम सभागृह आहे, बिहार राज्य नाही. या सार्वभौम सभागृहाला लौकिक आहे. सभापतींवर नियमबाह्य पद्धतीने अविश्वास ठराव आणणार असाल, नियमबाह्य काम करणार असाल, तर ती सभागृहाला काळिमा लावणारी बाब होईल. माननीय सभापतींनी विश्वास का गमावला आहे, हे या ठिकाणी सांगितले पाहिजे. आपण अशा तऱ्हेने दोन ओळींचा प्रस्ताव आणून ज्यांनी वर्षानुवर्षे काम केले त्यांना अशा पद्धतीने घालविता येणार नाही. कोणाला खुर्ची पाहिजे, कोणाला केबीन पाहिजे ? त्या व्यक्तीने इतकी वर्षे काम केलेले आहे. आपण देखील त्यांच्या सोबत 18 वर्षे काम केलेले आहे. या सर्व गोष्टी आपल्या मनाला पटतात का ? किमान आपल्या हातून असे चुकीचे काम, चुकीचा निर्णय होऊ नये. आपल्या हातून लोकशाहीची हत्या होऊ नये. आपल्या हातून लोकशाहीचा खून होऊ नये. सभागृहाचे कामकाज नियमाप्रमाणे झाले पाहिजे अशी आमची आपल्याकडून अपेक्षा आहे. मी विधिमंडळात 25 वर्षे काम करीत आहे.

माननीय सभापतींनी विश्वास का गमावला आहे ते प्रस्तावामध्ये यावयास पाहिजे होते. तसा प्रस्ताव देणे आवश्यक आहे. माननीय सभापतींनी इतके वाईट काम केले म्हणून त्यांच्यावर अविश्वास प्रस्ताव आणलेला आहे का ? हे महाराष्ट्रातील जनतेला कळले पाहिजे. आपण नियमबाह्य प्रस्ताव स्वीकारु नये, किमान आपल्या हातून हे पाप होऊ नये, अशी माझी आपणास विनंती आहे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी भाषणाच्या ओघात माननीय सभापतींचा उल्लेख करताना काही आक्षेपार्ह शब्दप्रयोग केले आहेत. ते शब्द मी सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकत आहे.

भारताचे संविधान आणि विधान परिषद नियमा प्रमाणे प्रस्तावात कारणे देण्याची तरतूद नाही. तेव्हा प्रस्ताव नियमाप्रमाणे आहे. सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या भाषणात त्यांचे मुद्दे मांडावेत.

..3.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, आमचे मित्र आणि सभागृहातील ज्येष्ठ सदस्य घटना तज्ज्ञ ॲड.रामदास कदम यांनी या ठिकाणी जो युक्तीवाद केला, तसेच सन्माननीय सदस्य प्रा.जनार्दन चांदूरकर यांनी काही प्रश्न उपस्थित केले. घटनेच्या अनुच्छेद 183 मध्ये सभापतींचे आणि उप सभापतींचे पद रिक्त होणे व त्याचा राजीनामा देणे आणि त्यावरुन दूर करणे असा उल्लेख आहे. त्या अनुच्छेदातील (ग) मध्ये "विधानपरिषदेच्या त्या वेळच्या सर्व सदस्यांच्या बहुमताने पारित झालेल्या विधानपरिषदेच्या ठरावाद्वारे त्याच्या पदावरुन दूर करता येईल" असा उल्लेख आहे. तसेच विधानपरिषद नियम 11 मध्ये " सभापतींना किंवा उप सभापतींना पदावरुन दूर करण्यासंबंधीच्या ज्या प्रस्तावाची संविधानाच्या अनुच्छेद 183 अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे चौदा दिवसांची सूचना देण्यात आली असेल असा प्रस्ताव सूचनेची मुदत संपल्यानंतर शक्य तितक्या लवकर सभापती विधानपरिषदेला वाचून दाखवतील व नंतर ते जे सदस्य उक्त प्रस्ताव मांडण्याची परवानगी देण्यास अनुकूल असतील त्यांना आपापल्या जागेवर उभे राहण्याविषयी विनंती करतील. आणि जर 10 हून कमी नाहीत इतके सदस्य उभे राहिले तर उक्त परवानगी देण्यात आली आहे असे व उक्त प्रस्ताव ज्या दिवशी परवानगी देण्यात आली त्या दिवसापासून 7 दिवसांहून जास्त उशिरा नाही अशा ते ठरवतील त्या दिवशी विचारात घेण्यात येईल असे सभापती कळवतील."

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे....

सभापती महोदय, या सर्व कायदेशीर प्रक्रिया घटनेमध्ये नमूद केलेल्या आहेत आणि विधानपरिषदेतील प्रत्येक नियमामध्ये असलेल्या प्रत्येक गोष्टीची पूर्तता केल्यानंतर, गेल्या मंगळवारी 24 सन्माननीय सदस्यांनी उभे राहून हा प्रस्ताव सभागृहात मान्य केलेला आहे. घटनेच्या कलम 183 नुसार हा प्रस्ताव सभागृहात आलेला आहे. आपण हा प्रस्ताव मांडण्यास अनुमती दिलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी हा प्रस्ताव मांडताना कारणांसह विवेचन केले आहे. सभापती महोदय, आपण निर्णय दिला आहे. महोदय, ज्यांना या ठरावावर बोलायचे असेल त्यांना तातडीने मतप्रदर्शन करावयास सांगावे, अशी माझी विनंती आहे.

**उप सभापती** : मी विचारु इच्छितो की, गट नेत्यांमध्ये आपल्यापैकी कोण बोलणार आहे ? मी सांगू इच्छितो की, प्रत्येक पक्षाच्या वतीने एकाच सन्माननीय सदस्यांना बोलता येईल. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे हे काँग्रेस पक्षाचे गट नेते आहेत. या ठिकाणी जो प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे त्यावर कामकाज सल्लागार समितीमध्ये ठरल्यानुसार चर्चा होईल. या ठिकाणी कोणालाही दादागिरी करुन चालणार नाही.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, ज्या बैठकीमध्ये या संदर्भातील निर्णय झाला त्या बैठकीला सन्माननीय मंत्री श्री.रामदास कदम, सन्माननीय सदस्य सर्वश्री माणिकराव ठाकरे व संजय दत्त हे सुध्दा उपस्थित होते.

(विरोधी पक्षाचे सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**उप सभापती** : मी पुन्हा एकदा विचारु इच्छितो की, गट नेत्यांपेकी कोण बोलणार आहे ? आपण आरडाओरड करुन कामकाज बंद पाडण्याचा प्रयत्न केला तर ते चालणार नाही. कामकाज सल्लागार समितीमध्ये ठरले आहे की, या प्रस्तावावर केवळ गट नेत्यांनीच आपल्या भावना व्यक्त कराव्यात. त्यामुळे प्रत्येक पक्षाच्या एका गट नेत्यांनी बोलावे. आता कोणत्याही एका गट नेत्यांने बोलण्यास सुरवात करावी.

श्री.माणिकराव ठाकरे : महोदय, सभागृहामध्ये पॉईंट ऑफ प्रोसिजरखाली आपण सन्माननीय सदस्यांना बोलण्यासाठी परवानगी देत आहात.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे, आपणही त्या बैठकीला उपस्थित होता. माझी विनंती आहे की, आपण असे करता कामा नये. या प्रस्तावावर फक्त गट नेत्यांनीच बोलावे असे त्या बैठकीत ठरलेले आहे.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

मला वाटते या प्रस्तावावर बोलण्याची कोणाचीही इच्छा दिसत नाही. त्यामुळे हा प्रस्ताव मी..... मी शेवटी सांगतो की, प्रत्येक गट नेत्यांना या प्रस्तावावर बोलण्याची एकदाच संधी देण्यात येईल. गट नेत्यांना हे मान्य नसेल किंवा ते ही बाब मानणार नसतील तर....मी सभागृहाच्या माहितीसाठी सांगतो की, त्या बैठकीत असे ठरले होते.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

आपण जर शांतपणे ऐकून घेणार नसाल तर मी पुढील कार्यवाही सुरु करीन, एवढेच आता तुम्हाला सांगतो.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय,....

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे, आपण गट नेते या नात्याने बोलणार आहात काय ?

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, आपण सभागृहामध्ये हा प्रस्ताव पुकारल्यानंतर अनेक सन्माननीय सदस्यांनी पॉईंट ऑफ प्रोसिजरच्या नावाखाली आपली मते मांडली. सन्माननीय सदस्य प्रा.जनार्दन चांदूरकर, सन्माननीय मंत्री सर्वश्री रामदास कदम, दिवाकर रावते यांनी पॉईंट ऑफ प्रोसिजरखाली....

**उप सभापती** : मी या ठिकाणी कामकाज सल्लागार समितीमध्ये काय निर्णय झाला हे सागितले. या प्रस्तावावर केवळ गट नेत्यांना बोलता येईल. मंत्री महोदय श्री.दिवाकर रावते, यांना मी सांगू इच्छितो की, या प्रस्तावावर गट नेत्यांनाच बोलता येईल असे ठरले होते. आपल्यासारख्या जबाबदार व्यक्तीने खाली बसून 'नाही' म्हणणे योग्य नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीमध्ये या विषयावर साधकबाधक चर्चा झाली होती. पहिले असे ठरले होते की, या प्रस्तावावर नुसते मतदान घ्यावयाचे आहे. त्यावेळी मी पहिला प्रश्न उपस्थित केला होता की, हा प्रस्ताव का मांडला जात

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिवाकर रावते....

आहे हे समजले पाहिजे. हा प्रस्ताव मांडण्यामागील कारणे दिली पाहिजेत आणि ती जनतेला समजली पाहिजेत. या प्रस्तावावरील चर्चेचा आम्ही आग्रह धरला आणि आपण सुध्दा त्या वेळी उपस्थित होता. या प्रस्तावावर आम्हाला चर्चा करावयाची असल्याचे आम्ही सांगितले आणि तेही आपल्यासमोर सांगितले. ज्यावेळी कामकाजाचा विषय समोर आला त्यावेळी या प्रस्तावावरील चर्चा दोन दिवस चर्चा चालेल असा विषय पुढे आला. त्यावेळी या प्रस्तावावर ज्यांना बोलायचे असेल त्यांना संधी द्यावी असे ठरले होते. सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त म्हणाले होते की, आम्हाला सर्वांना या प्रस्तावावर बोलण्याची संधी दिली पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी सांगितले की, आम्ही सुध्दा चर्चा लांबवू, चर्चा व्हायची तेवढी होऊ द्यावी. अनेक वर्षे या सभागृहात ज्यांनी आमचे नेतृत्व केले त्यांच्या संदर्भातील भावना व्यक्त करावयाच्या असतील तर.... तुमचे मतदान पक्के आहे ना, आपण, त्यांना घरी पाठवायचे ठरविले आहे काय ? या प्रस्तावावरील चर्चा वाढली तर मतदान कमी होईल याची तुम्हाला काळजी वाटते काय ? माझी विनंती आहे की, सन्माननीय सदस्यांना या प्रस्तावावर बोलू द्यावे. आम्हाला वाटले तर आमच्याकडून कोणी तरी एकच बोलतील. परंतु इतर सन्माननीय सदस्यांना बोलू द्यावे. त्या समितीमध्ये जे काही ठरले त्यानुसार सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी द्यावी.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य उभे राहून एकाच वेळी बोलतात.)

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगतो की, कृपया त्यांनी शांतपणे खाली बसावे. त्या दिवशी बैठकीमध्ये काय झाले हे मी सांगतो.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते यांनी जे सांगितले ती खरी गोष्ट आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितल्यानंतर शेवटी असा निर्णय झाला की, या प्रस्तावावर फक्त गट नेत्यांनीच बोलावे आणि हा अंतिम निर्णय झाला होता. सन्माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते हे त्या बैठकीला होते. सन्माननीय मंत्री श्री.रामदास कदम यांनी सभात्याग केला होता. ते बैठकीतून निघून गेले होते.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य उभे राहून एकाच वेळी बोलतात.)

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगतो की, आपण कृपया आपापल्या जागेवर बसावे. हे आता अति झाले आहे. मी पुनश्च सांगतो की, ज्या दिवशी कामकाज सल्लागार

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**उप सभापती**....

समितीची बैठक झाली, त्या बैठकीला सर्व पक्षाचे गट नेते उपस्थित होते. सन्माननीय मंत्री सर्वश्री रामदास कदम व दिवाकर रावते हे सुध्दा उपस्थित होते. माननीय मंत्री श्री.रामदास कदम हे त्यांना जेवढे बोलायचे होते तेवढे बोलून निघून गेले. तद्नंतर माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते यांनी मन मोठे करुन सांगितले की, या प्रस्तावावर मी नाही बोललो तरी चालेल, पण माझ्या ऐवजी माननीय मंत्री श्री.रामदास कदम बोलतील. मी पुन्हा एकदा सांगतो की, ज्या गट नेत्यांना आपले विचार मांडायचे असतील त्यांनी ते मांडायला मी परवानगी देतो. गट नेत्यांनी विचार मांडण्याबाबत माझे काहीही म्हणणे नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण नुकतेच सांगितले की, ज्यांना विचार मांडावयाचे आहेत त्यांना विचार मांडण्यास संधी देतो. परंतु त्याच वेळी खालच्या दिशेने 'गट नेते' असा उल्लेख केल्यामुळे आपण गट नेत्यांचा उल्लेख केला. अशाप्रकारे सभागृह चालता कामा नये. माझी विनंती आहे की, हे सभागृह समोरच्या बाजूने चालविता कामा नये.

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिवाकर रावते ....

सभापती महोदय, आपण म्हणालात की, ज्या सन्माननीय सदस्यांना विचार मांडायचे आहेत, त्यांना मी संधी देतो. आता पुन्हा विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य काही बोलत आहेत. हे असे चालायचे नाही. आम्हाला हे बरोबर वाटत नाही.

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य उभे राहून मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, आपण खाली बसावे. आता माननीय मंत्री श्री. दिवाकर रावते यांनी विचार मांडावेत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री श्री. रामदास कदम यावर विचार मांडणार आहेत.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, यावर अगोदर सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी विचार मांडले पाहिजेत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

..2

श्री. माणिकराव ठाकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित व अन्य सन्माननीय सदस्य यांनी सदनात माननीय सभापती यांच्या संदर्भात अविश्वासाचा प्रस्ताव मांडला आहे. आताच सदनात या संदर्भात बरीचशी चर्चा झाली आहे. हा अविश्वास प्रस्ताव नियमाप्रमाणे, कायद्याप्रमणे, घटनेप्रमाणे सभागृहात आलेला नाही, त्यामुळे या प्रस्तावाला सदनामध्ये परवानगी देण्यात येऊ नये, असा आक्षेप काही सन्माननीय सदस्यांनी पॉईंट ऑफ प्रोसिजरच्या माध्यमातून घेतला आहे. आम्हाला आपल्याकडून त्या संदर्भातील निर्णय अपेक्षित होता. परंतु आपल्याकडून त्या संदर्भातील निर्णय मिळालेला नाही. प्रस्तावावर कोणते सन्माननीय सदस्य म्हणणे मांडतील या संदर्भात सुध्दा आपण काही गट नेत्यांची बैठक बोलाविली आणि त्यामध्ये नेमके काय ठरले होते, त्या संदर्भातही आता मतमतांतरे दिसून आली. आपण निर्णय दिला की, प्रस्तावाच्या वेळी फक्त सन्माननीय गट नेत्यांनी मते मांडावीत.

सभापती महोदय, म.वि.प.नियम 32(1) नुसार सदनामध्ये प्रत्येक विषयावर बोलण्याचा सन्माननीय सदस्यांचा अधिकार आहे. मला आपणास विनंती करायची आहे की, आपण अशा मर्यादा घालून देऊ नये. अविश्वासाचा प्रस्ताव अत्यंत महत्त्वाचा आहे. संपूर्ण राज्याचे लक्ष या विषयाकडे लागले आहे. सभागृहात अविश्वासाचा प्रस्ताव आणण्याचा प्रयत्न होत आहे. आपण अविश्वास प्रस्तावाच्या संदर्भात नेहमी ऐकतो की, कामकाजाच्या संदर्भात अविश्वास निर्माण झाला पाहिजे. परंतु, तसे कोणतेही चित्र, आक्षेप अविश्वास प्रस्ताव आणताना दिसलेला नाही, याचा मी आवर्जून उल्लेख करतो. अविश्वास प्रस्ताव आणताना त्या संदर्भातील कारणे फ्रेम केली पाहिजे की, अमुक या कारणास्तव अविश्वास प्रस्ताव आणला जात आहे.

सभापती महोदय, राज्यामध्ये अनेक प्रसिध्दी माध्यमे आहेत. परंतु, एकाही प्रसार माध्यमातून माननीय सभापतींच्या संदर्भात अमुक या कारणासाठी अविश्वास प्रस्ताव आणला जात आहे, असा उल्लेखही आलेला नाही आणि जनतेला सुध्दा या संदर्भातील कारण समजलेले नाही. कोणतेही कारण नसताना अविश्वासाचा प्रस्ताव आणला जात आहे. राज्यामध्ये ज्यांनी वेगवेगळ्या समाजिक क्षेत्रामध्ये काम केले आहे, ज्यांच्याबद्दल नितांत आदर आहे, अशा व्यक्तीवर अविश्वासाचा

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. माणिकराव ठाकरे ....

प्रस्ताव आणला जात आहे. आज सुध्दा अविश्वास प्रस्ताव आणताना सर्व सन्माननीय सदस्यांच्या भावना वेगळ्या आहेत. राष्ट्रवादी कॉग्रेस पक्ष, भाजप, शिवसेना या पक्षांचे किंवा अपक्ष सन्माननीय सदस्य असतील त्यांच्या भावना काय आहेत हे तुम्ही जवळून पाहिलेले आहे. माननीय श्री. शिवाजीराव देशमुख साहेब हे सभापती आहेत आणि त्यांच्यावर अशा प्रकारचा अविश्वासाचा प्रस्ताव येता कामा नये, असे सर्वांना मनापासून, अंत:करणापासून वाटत आहे आणि त्या भावना त्यांनी माननीय सभापती श्री. शिवाजीराव देशमुख साहेबांच्या समोर येऊन सुध्दा प्रकट केल्या आहेत आणि ते म्हणाले आहेत की, आमचे हात बांधलेले आहेत, आम्ही काय करायचे, आम्हाला आदेश आहेत, आमचा नाइलाज आहे.

आपण सद्सद्विवेक बुध्दीला स्मरून सदनातील कामकाजामध्ये भाग घेत असतो आणि माननीय सभापती देखील त्या संदर्भात त्यांचा निर्णय देत असतात. माननीय सभापती सभापतीस्थानी असतात त्यावेळी, सर्व सन्माननीय सदस्य मग ते सत्ताधारी पक्षातील असोत किंवा विरोधी पक्षातील असोत, त्यांना न्याय देण्याचे काम करीत असतात आणि तसे झाले आहे. माननीय सभापती श्री. शिवाजीराव देशमुख यांनी तशा प्रकारची भूमिका सातत्याने घेतली आहे. हे तुमच्या आमच्या सर्वांच्या नजरेसमोर आहे. कोणत्याही पक्षाचे नेते असोत, अमुक एखादा प्रश्न सार्वजनिक हिताचा असल्याने सभापती म्हणून आपण हा प्रश्न स्वीकृत केला पाहिजे असे त्यांना सांगितले असता त्यांच्याकडून तसे होत असते. मला वाटत नाही की, माननीय सभापतींनी कधी कोणाबद्दल दुजाभाव केला असेल. दुजाभावाचे चित्र कधीही माननीय सभापतींच्या काळात आपल्याला दिसून आले नाही. सभागृह कशा पध्दतीने चालले पाहिजे या संदर्भात काही विचार, संकेत, व्यवस्था असते. या संदर्भात अनेक उदाहरणे आहेत. आपणा सर्वांना माहीत असेल. कदाचित काही जण त्यावेळी असतील. माननीय ना.स.फरांदे साहेब सभापती होते. त्यावेळी काँग्रेस पक्षाचे राज्य आले होते. माननीय विलासराव देशमुख साहेब मुख्यमंत्री होते. माननीय ना.स.फरांदे हे भाजपचे सभापती होते. ते सभापती असताना माननीय विलासराव देशमुख साहेबांनी स्पष्ट संगितले होते की, जरी



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. माणिकराव ठाकरे ...

भाजपचे सभापती असले तरी सुध्दा ते सभापती आहेत, त्यांचा अशा प्रकारचा अवमान करता येणार नाही, अशी आपल्या राज्याची संस्कृती आहे. तत्संदर्भात निर्णय घेतला गेला आणि माननीय ना.स.फरांदे पूर्ण कालावधी पर्यंत राहिले. भाजपचे सभापती असताना सुध्दा असा निर्णय माननीय विलासराव देशमुख साहेब मुख्यमंत्री झाल्यावर काँग्रेस पक्षाने घेतला. सभापती महोदय, परतफेड अशी होत आहे. काय चालले आहे, कोणत्या पध्दतीने राज्य पुढे घेऊन जायचे आहे, कशा विचाराने हे राज्य पुढे न्यायचे आहे ? माननीय सभापतींकडून निर्णय घेताना कधीही दुजाभाव झालेला नाही, त्यांनी केलेला नाही. कोणत्या विचाराने राज्य घडवायचे, राज्यात परिवर्तन करावयाचे, या भूमिकेतून राज्य पुढे जात असते आणि त्या आधारे जनता मतदान करत असते, शासनास सत्तेवर बसविते. एखादा उद्देश साध्य करण्याकरिता काहीही करायचे हे योग्य नाही. सभापती पद आम्हाला मिळाले पहिजे मग काही झाले तरी चालेल, कोणत्याही तडजोडी चालतात. सभापती महोदय, राज्यातील जनता पाहत आहे. भविष्यात हे समजून येईल. आपण ज्या विचाराने सत्तेपर्यंत पोहचलात, त्याच विचारांचे नेतृत्व सदनाचे नेतृत्व करीत आहे, सभापती पद भूषवित आहेत. माननीय सभापती यांच्यामुळे सभापती पदाचा मान-सन्मान वाढला आहे आणि अशा विचारांवर, महत्त्वाच्या नेतृत्वावर काहीही कारण नसताना अविश्वास प्रस्ताव आणण्याचा प्रयत्न करीत आहात. त्यांनी कोणत्याही सदस्यांना अन्यायकारक वागणूक दिली असेल तर मी समजू शकतो. कोणत्याही जनहिताच्या विरोधात निर्णय सदनात झाला असेल, तशी चूक घडली असेल तर मी मान्य करतो. परंतु, अशा प्रकारची कोणतीही चूक झालेली नसताना हे घडले आहे. सर्व सन्माननीय सदस्यांच्या मनापासून भावना आहेत की, माननीय श्री. शिवाजीराव देशमुख साहेब सभापती म्हणून राहिले पाहिजेत. मागच्या वेळी घटनेचा उल्लेख करून सन्माननीय मित्र सांगू शकतात की, सदनात सन्माननीय विरोधी पक्ष नेता निवडताना उशीर लावला. परंतु, त्यावेळी विधानसभेत सुध्दा नेता निवडला गेला नव्हता. आपण आपल्या सोयीप्रमाणे हे दुर्लक्षित करता आहात.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे......

विधान परिषदेबाबत आम्ही सभापती महोदयांना विनंती केली की, आज आम्हाला आमच्या मित्र पक्षाची भूमिका विरोधी पक्षाची राहिलेली दिसून येत नाही. आता तर ती बाहेरही उघड झालेली आहे. ज्या वेळी विधानसभेच्या निवडणुका झाल्या, त्यावेळी मतमोजणी सुरु असताना आमच्या मित्र पक्षाने जाहीर करुन टाकले की, आम्ही भारतीय जनता पक्षाला पाठिंबा देत आहोत. त्यांनी अशा प्रकारचा पाठिंबा देत आहोत म्हटल्याबरोबर लोकांच्या मनामध्ये पाल चुकचुकायची ती चुकलीच. कारण, विधानसभेच्या निवडणुकीपूर्वी आघाडी नाकारण्याचे कारण काय असेल याच्याशी मतमोजणी दरम्यान ज्या पध्दतीने घोषणा करण्यात आली ते सूत्र जोडावे लागेल. नंतर घडणाऱ्या सर्व घटना बघितल्या तर मित्र पक्षाची गरज नाही, राज्य चालविण्यासाठी कुणाशीही तडजोड केली तरी चालेल, असेच सर्व आपल्याला दिसत होते. विधानसभेत ज्या वेळी विश्वासमत प्रस्ताव पारित करावयाचा होता त्यावेळच्या सर्व घटना देखील आपल्या सर्वांसमोर ताज्या आहेत. राज्यातील जनतेच्या मनात देखील या सर्व घटना ताज्या आहेत. कुणाला तरी खुणवायचे, कुणाच्या तरी माध्यमातून सत्ता चालवायची, अशा प्रकारे अनैतिकरित्या, अवैध पध्दतीने भारतीय जनता पक्षाने राज्य कारभार चालविला आहे आणि त्याचे समर्थन राष्ट्रवादी काँग्रेस करीत आहे, हे दुर्दैव आहे. कुणाला तरी सत्तेपासून बाजूला ठेवायचे आणि आपण कधी त्या ठिकाणी येतो, याची वाट पहायची, अशा प्रकारचे चित्र संपूर्ण राज्यात निर्माण झाले आहे. या राज्यातील जनतेने मोठ्या अपेक्षेने तुम्हाला निवडून दिले. कुणाशी हातमिळवणी करायची हे तुम्हीच ठरवायचे आहे. परंतु, या संदर्भात जनतेच्या काय भावना आहेत, हे देखील आपण लक्षात घेतले पाहिजे.

सभापती महोदय, या ठिकाणी जो अविश्वास प्रस्ताव आणला आहे, त्याला आम्ही निश्चितपणे सामोरे जाऊ आणि जाणार आहोत. आम्ही आमच्या पक्षाच्या विचाराने पुढे जाणार आहोत. या सदनातील सदस्यांच्या भावना सुध्दा वेगळ्या आहेत. आपल्या विवेकबुध्दीला स्मरुन त्यांनी मनापासून निर्णय घेतलेला आहे. कोणताही पक्ष असो, शिवाजीराव देशमुख साहेबांबद्दल त्यांच्या भावना जुळलेल्या आहेत. काँग्रेसशी भावना जुळत नसतील. परंतु, एक वरिष्ठ नेतृत्व, चारित्र्यवान नेतृत्व, ज्यांनी संपूर्ण समाजाची 40 वर्षापर्यंत सेवा केली, अशा नेतृत्वावर आघात येत

...2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे......

असेल तर आम्ही सुध्दा अशा प्रकारच्या विचारांना समर्थन देणार नाही. काही सदस्य या ठिकाणी गप्प बसलेले आहे. त्यांच्या मनातून याला विरोध आहे. बीजेपीचे सदस्य सुध्दा भेटलेले आहेत.

सभापती महोदय, निवडणुकीतील चित्र आपण पहा. आमचा हाच मित्र पक्ष सत्तारुढ पक्षावर आरोप करीत होता. आर.एस.एस.वर आम्हीही टीका केली. पण आमच्यापेक्षा कणभर जास्त आमच्या मित्र पक्षाने टीका केली. आता मात्र अशा प्रकारे आर.एस.एस.शी संधान बांधले गेले आहे. तुमचे कार्यालय आता मुंबई, दिल्लीत राहणार आहे की, नागपूरला राहणार आहे ? आमच्या मित्रपक्षाला मी विचारु इच्छितो की, भविष्यात आपली भूमिका काय राहणार आहे, कुणाला घेऊन पुढे जाण्याची भूमिका राहणार आहे, हे त्यांनी स्पष्ट करावे.

सभापती महोदय, माननीय श्री.शिवाजीराव देशमुख साहेबांच्या संदर्भात तुमच्या, आमच्या सर्वांच्या भावना एकच आहेत. आपण आज सभापतीस्थानी बसला आहात. आपल्याला विचारले की, आपल्याला काय वाटते तर मी खात्रीने सांगतो की, हृदयापासून आपल्या भावना याच आहेत की, शिवाजीराव देशमुख साहेबांसारख्या व्यक्तीवर अशा प्रकारचा अविश्वास प्रस्ताव येता कामा नये. त्यांना बाजूला करण्याची ही पध्दत असू नये. आम्ही मित्रपक्षाला सांगितले की, ठीक आहे. तुमचे संख्याबळ आमच्यापेक्षा जास्त आहे. आम्ही तशा प्रकारची चर्चा आपल्याबरोबर करु. परंतु, आम्हाला काही तरी वेगळे दिसून येत आहे. आम्हाला हे मान्य आहे की, त्यांचा पक्ष वेगळा आहे. परंतु, ताकाला जाऊन आणि भांडे लपविण्यापेक्षा त्यांनी सरळ सांगायचे होते की, आमची भविष्यातील आघाडी आता भाजपा सोबत होणार आहे. असे जाहीर करा आणि तुम्ही जा. परंतु, जनतेची दिशाभूल करु नका.

सभापती महोदय, आम्ही शिवसेनेचा पाठिंबा मागितलेला नाही. ज्या सदस्यांच्या विवेकबुध्दीला असे वाटत असेल की, श्री.शिवाजीराव देशमुख साहेब सभापतीस्थानी राहिले पाहिजेत, त्यांनी ठरावाला विरोध करावा आणि तशा प्रकारची भूमिका काही सदस्य घेत असतील तर तो त्यांचा हक्क आहे. मग ते बीजेपीचे असोत किंवा अपक्ष असोत, तो त्यांचा हक्क आहे.

...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे......

सभापती महोदय, मला आपल्याला विनंती करावयाची आहे की, आपण या चर्चेवर बंधन आणू नये. मित्र पक्षाच्या सर्वच्या सर्व सदस्यांना आपल्या भावना मांडू द्याव्यात आणि आमच्याही सदस्यांना भावना मांडू द्याव्यात. कुणाही सदस्यांच्या भावना दाबण्याचा प्रयत्न आपण करु नये. सदनामध्ये असे होता कामा नये. काय लपवून ठेवायचे आहे, कुणाला मदत करायची आहे, याबाबत आपण सर्वांच्या भावना जाणून घेतल्या पाहिजेत. गटनेता किंवा उपनेता यांच्या भाषणानंतर अन्य सदस्यांच्या भाषणांसाठी कदाचित सभागृह एक तास लांबेल. परंतु, ही सर्व परिस्थिती राज्यासमोर येऊ द्या. लपवून का ठेवता ? राज्यासमोर आणि जनतेसमोर सर्व गोष्टी येण्याकरिता सदनातील सर्व सदस्यांच्या भावना या ठिकाणी प्रकट झाल्या पाहिजेत.

सभापती महोदय, आज संपूर्ण राज्य या सभागृहाकडे पहात आहे. तुम्हाला तुमचा निर्णय योग्य वाटतो तर तो तुम्ही घ्या. पण जनतेला तुम्ही सांगा की, शिवाजीराव देशमुख साहेबांसारख्या व्यक्तीविरुध्द तुम्हाला अविश्वास प्रस्ताव का आणावासा वाटला ? तुम्हाला का असे वाटते की, सर्वच गोष्टी आपल्याकडे असल्या पाहिजेत. याची उत्तरे जनतेला मिळाली पाहिजेत आणि त्यामुळे ही भूमिका सदनामध्ये प्रकट झाली पाहिजे. त्यासाठी आपण सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी दिली पाहिजे, अशा प्रकारची नम्रपणे मी विनंती करतो.

सभापती महोदय, हा अविश्वासाचा प्रस्ताव या ठिकाणी पारित होऊ नये, आपण तो नाकारावा अशा प्रकारची विनंती देखील मी सदनातील सर्व सन्माननीय सदस्यांना करतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो. धन्यवाद. जयहिंद.

------------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, माझा सन्माननीय सदस्यांच्या वक्तव्यावर आक्षेप आहे. सन्माननीय सदस्यांच्या भाषणामध्ये व्यत्यय येऊ नये म्हणून मी त्यांच्या भाषणादरम्यान उभा राहिलो नाही. परंतु, त्यांनी वारंवार आर.एस.एस.चा उल्लेख केला आहे. आर.एस.एस.सोबत कुणी गेला तर राजकारणामध्ये तो अतिशय वाईट ठरतो, असा अर्थ त्यांच्या वक्तव्यातून ध्वनित होत होता. आपल्या माहिती करिता मी सांगतो की, यांचे सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.राधाकृष्ण विखे-पाटील हे सुध्दा आमच्याबरोबर होते. आर.एस.एस.च्या अनेक कार्यक्रमांमध्ये ते आले होते. मी काँग्रेसच्या नेत्यांची यादी सांगू शकतो. मी तर त्या दिवसाची वाट बघतो आहे की, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे हे या राजकारणाला कंटाळून आर.एस.एस.मध्ये एक दिवस येतील आणि खऱ्या देशभक्तीसाठी संघर्ष करतील. या संघटनेबाबत महात्मा गांधीजींनी गौरवोद्‌गार काढले आहेत, याच संघटनेसाठी नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी देखील गौरवोद्‌गार काढले आहेत. माझ्याकडे रेकॉर्ड आहे.

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**उप सभापती :** सन्माननीय सदस्यांच्या भाषणातील सर्व तपशील तपासून मग मी निर्णय घेतो. कृपया सन्माननीय सदस्यांनी शांतता राखावी.

---------------

यानंतर श्री.वि.खर्चे.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माझे नाव घेतल्यामुळे मला बोलण्याची संधी द्यावी.

**उप सभापती** : मी रेकॉर्ड तपासून आक्षेपार्ह मजकूर काढून टाकतो. आता यावर काहीही भाष्य करण्यात येऊ नये.

श्री.रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे साहेब सभागृहात उपस्थित दिसत नाहीत, सन्माननीय सदस्य आले आहेत.

सभापती महोदय, नियम 11 प्रमाणे सन्माननीय सभापती श्री.शिवाजीरव देशमुख यांच्यावर जो अविश्वास प्रस्ताव दाखल केलेला आहे. त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. मी प्रथमतः असे सांगत आहे की, आमचा मित्र पक्ष भाजपा व राष्ट्रवादी काँग्रेस यांचे काय आहे याची मला माहिती नाही. या प्रस्तावाबाबत त्यांची भूमिका नेमकी काय आहे याची आम्हाला माहिती नाही.

सभापती महोदय, या प्रस्तावावर जेव्हा मतदान होईल तेव्हा शिवसेना पक्ष कोणाच्या बाजूला आहे हे आपणाला कळेल. एक गोष्ट माझ्या मनात आहे ती अशी की, ज्या वयात ज्या माणसाने उभे आयुष्यभर महाराष्ट्राची सेवा केली, त्या माणसाला ज्या पध्दतीने खुर्चीवरुन बाजूला केले जात आहे ती पध्दत आमच्या मनाला पटत नाही. म्हणून या प्रस्तावावर विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. आम्हाला काँग्रेस राष्ट्रवादीबाबत प्रेम नाही. हे मी या ठिकाणी मुद्दाम स्पष्ट करतो. सभागृहात ज्या पध्दतीने हा प्रस्ताव मांडण्यात आला ती पध्दत योग्य नाही. कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत असा निर्णय घेण्याचा प्रयत्न केला की, या प्रस्तावावर फक्त गट नेत्यांनी बोलावे ही बाब मला पटली नाही म्हणून त्या बैठकीत मी निषेध व्यक्त करुन तेथून निघून गेलो. मी सांगितले की, ही बाब नियमबाह्य आहे, त्याचे कारण असे होते की, 1987 मध्ये विधानसभेचे अध्यक्ष स्व.शंकरराव जगताप यांच्यावर अविश्वासाचा प्रस्ताव आणला होता त्या प्रस्तावावर गट नेतेच नाही तर ज्यांना बोलायचे होते ते सर्व सदस्य बोलले होते. त्या अविश्वास ठरावाच्या संदर्भातील भाषणे माझ्या हातात आहेत. त्यामध्ये सर्वश्री दत्ता पाटील, स्व.विलासराव देशमुख, मदन बाफना, राम कापसे, अण्णा जोशी यांची भाषणे माझ्या हातात आहेत. त्यावेळी 17 सन्माननीय सदस्यांनी भाषणे केली होती. त्यामुळे मी मघापासून पॉईंट ऑफ प्रोसिजरवर बोलत होतो की, या सदनाचे काम नियमबाह्य होऊ नये. सन्माननीय सदस्यांना आपण बोलायला दिले पाहिजे. उभे

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामदास कदम...

आयुष्यभर आम्ही सांगत होते की, सभापती महोदय, आम्हाला एक तास तरी बोलू द्या, अर्धा तास, पंधरा मिनटे, दहा मिनटे आणखी बोलण्यासठी द्यावे, अशी मागणी आम्ही ज्यांच्याकडे करीत होतो त्यांच्या अविश्वास प्रस्तावावर आपण आम्हाला बोलू देणार नाहीत काय ? आपण का तोंड बंद करीत आहात, नियमबाह्य, घटनाबाह्य का काम करीत आहात. हे आपण कशासाठी करीत आहात, आपला उद्देश काय आहे, काय घाई आहे, एक दिवसाने कामकाज वाढले तर डोंगर कोसळणार आहे काय ? असे कोणते नुकसान होणार आहे. परंतु काही लोकांना घाई झाली आहे की, कधी सन्माननीय शिवाजीराव देशमुख यांना खुर्चीवरुन बाजूला करतो. या अगोदर अशा प्रकारे विधिमंडळाचे कामकाज झालेले असताना त्या प्रस्तावावर 17 सन्माननीय सदस्य बोलले असून देखील येथे फक्त गट नेत्यांनी बोलावे. आपण असेही म्हटले होते की, माननीय मंत्री श्री. दिवाकर रावते यांचे मन मोठे आहे, माननीय मंत्री श्री. दिवाकर रावते माझ्यावर मेहरबानी करीत असतील तर मला बिलकूल बोलायचे नाही. मला माझा हक्क पाहिजे. मला घटनेने दिलेला माझा अधिकार पाहिजे. मला माननीय श्री. दिवाकर रावते किंवा कोणाचीही मेहरबानी नको. म्हणूनच मी त्या सभेतून उठून गेलो होतो, बहिष्कार टाकला होता. घटनेने जो मला अधिकार दिलेला आहे तो कोणालाही हिरावून घेण्याचा अधिकार नाही. हे सभागृह घटनेप्रमाणे चालते.

सभापती महोदय, ज्या पध्दतीने विधानसभेचे तत्कालीन अध्यक्ष स्व.शंकरराव जगताप साहेब यांच्या अविश्वास प्रस्तावावर 17 सन्माननीय सदस्यांनी भाषणे केली होती, त्या पध्दतीने सभागृहात नियमानुसार जे जे सन्माननीय सदस्य भाषण करण्यास मागतील किंवा आपले विचार व्यक्त करण्याची परवानगी मागतील त्यांना ती संधी आपण दिली पाहिजे. सन्माननीय सदस्यांची तोंड बंद करण्याचे काम येथे होता कामा नये, अशी माझी आपणाकडून अपेक्षा आहे. हे लोकशाहीत सभागृह घटनेने व नियमाने चालले पाहिजे अशी माझी आपणाकडून अपेक्षा आहे.

सभापती महोदय, ज्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.शिवाजीराव देशमुख पुन्हा या खुर्चीवर बसले त्यावेळी त्यांच्या अभिनंदन प्रस्तावावरील राष्ट्रवादींच्या नेत्यांची भाषणे माझ्या हातात आहेत. ती भाषणे मी आपणाला वाचून दाखवितो. त्यावेळी त्यांच्यावर स्तुती सुमनांचा वर्षाव करण्यात आला होता व आता अचानक असे काय झाले. त्यावेळी अतिशय चांगली भाषणे केली आहेत, त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.शिवाजीराव देशमुख यांच्यावर इतका विश्वास दाखविला होता आणि आता

...3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामदास कदम....

अचानक काय झाले आहे. त्या खुर्चीसाठी ते नालायक म्हणणे ठीक होणार नाही. पण योग्य नाही असे म्हणता येईल. पटकन दोन ओळीचा अविश्वास प्रस्ताव आणला गेला. माझ्याकडे सन 2004 ची भाषणे आहेत. त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.विजयसिंह मोहिते पाटील यांचे भाषण आहे, स्व.आर.आर.पाटील यांचे भाषण आहे. सन्माननीय सदस्य श्री.छगन भुजबळ यांचे भाषण आहे. स्व.गुरुनाथ कुलकर्णी यांचे भाषण आहे, सन्माननीय सदस्य श्री.अजित पवार यांचे भाषण आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते बोलले आहेत. यातील मी एक दोन सन्माननीय सदस्यांची भाषणे वाचून दाखवितो. ...(अडथळा)...ते मतदान करा म्हटले तर आम्ही करणार नाही, जावईबापू तुम्हाला एवढी चिंता कशाला पाहिजे. ज्याला कावीळ असतो त्याला सर्व दुनिया पिवळी दिसते. जसे राष्ट्रवादी आणि तुमचे साटेलोटे चालले आहेत, तसेच भाजपचे आणि तुमचे साटेलोटे चालले आहे काय ? मुख मे राम और बगल मे छुरे, असे कशासाठी पाहिजे. त्याची मला काळजी नाही, मला सर्व 'रामदास बिनधास' म्हणतात. त्यामुळे आम्हाला कसलीही काळजी नाही तुम्हाला जास्त काळजी आहे. ... (अडथळा)... सभापती महोदय मला संरक्षण द्या, सन्माननीय सदस्य खाली बसून बोलतात. त्यांना सभागृहाच्या बाहेर पाठवून द्यावे.

सभापती महोदय, स्व. आर.आर.पाटील यांनी केलेले भाषण मी वाचून दाखवितो. ''सभापती महोदय, आज आपली या सदनाच्या सर्वोच्चपदी निवड झाली त्यामुळे मी आपले अतिशय अंतकरणापासून अभिनंदन करतो. या सदनातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी आपली बिनविरोध निवड केल्याबाबत दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना धन्यवाद देतो. सभापती महोदय, आपण या सदनाचे सभापती झालात म्हणून आम्हा सर्वांना आनंद झाला आहे. सर्वात जास्त आनंद मला होणे स्वाभाविक आहे. या सदनात काही सदस्य आपले सहकारी असतील परंतु आपल्या आयुष्यात राजकीय आणि सामाजिक कार्यातील एक कार्यकर्ता म्हणून देखील मला प्रदीर्घ काळ काम करण्याची संधी मिळाली आहे. सांगली जिल्ह्याचा विचार करता जिद्द, कणखरपणा आणि लढाऊ वृत्ती हा वाळवा व शिराळ्याचा जन्मजात गुण आहे, त्यातही सय्यम आणि धिरोदत्तपणा आणि विचाराने वागणे हे गुण आपल्यात कोठून आले याचा जेव्हा आम्ही विचार करतो, तेव्हा आपल्या राजकारणाची व समाजकारणाची सुरुवात तासगांव येथून झाली. त्यातून आपल्यामध्ये वाळव्यातून आलेल्या शिराळ्याचे देखील गुण आले आहेत, हे महाराष्ट्राने नेहमीच अनुभवले आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामदास कदम...

असे स्व.आर.आर.पाटील यांनी त्यांच्या भाषणात म्हटले आहे. माननीय वि.स.पागे यांनी हे पद भूषविले आहे. आज आपण या पदावर आला आहात, काही वेळेला राजकारणात व्यक्तिला पदे मिळतात व पदांमुळे ती माणसे मोठी होतात.

या नंतर श्री.भोगले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामदास कदम......

त्या पदामुळे तो माणूस मोठा वाटतो. पण काही वेळेस व्यक्तीमुळे पद मोठे होते. मला आत्मविश्वास आहे, विधानपरिषदेचे हे सभापती पद मोठे होईल, असे स्व.आर.आर.पाटील म्हणाले होते. त्यांच्या आत्म्याला काय वाटत असेल? हे सगळे जे चालले आहे ते पाहून त्यांना काय वाटत असेल? त्या सगळ्यांची भाषणे आपण वाचली तर हा प्रस्ताव आणण्यामागचा उद्देश काय आहे हे कळले पाहिजे. आम्ही काँग्रेस पक्षासोबत नाही हे पुन्हा एकदा सांगतो. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाशी आम्हाला काही देणे घेणे नाही. वाईट वाटते. भारतीय जनता पक्षाशी आमची युती आहे. भारतीय जनता पक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष गुपचूप कधी एकत्र आले ते आम्हाला पण कळले नाही. तिकडून काँग्रेसला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि इकडून आम्हाला भारतीय जनता पक्ष फसवितो की काय असा प्रश्न आमच्या मनामध्ये होतो त्याचे दु:ख वाटते. हे सगळे कशासाठी चालले आहे, एक लाल दिव्याच्या गाडीसाठी, एका चेंबरसाठी?

सभापती महोदय, मला एक गोष्ट सांगितली पाहिजे, मी माननीय मुख्यमंत्र्यांना देखील सांगेन की, होऊ द्या सगळी चौकशी. का सगळी चौकशी होत नाही? कधी कधी महाराष्ट्राच्या जनतेला संशय येईल. ही सगळी चुंबाचुंबी कशासाठी चालली आहे. सभापती महोदय, माननीय श्री.शिवाजीराव देशमुख यांचे आज वय, त्यांचे आजारपण पाहिले तर आपल्या लक्षात येईल की, सभागृहात आम्हाला अधिक वेळ उपस्थित राहता येणे शक्य होत नाही परंतु आमच्यापेक्षा ते अधिक वेळ सभापतीस्थानी बसत असत. सभापती महोदय, आपण त्यांच्यासोबत 18 वर्षे काम केले आहे. अशा पध्दतीने त्यांना पदावरुन बाजूला करणे यामागचा उद्देश काय आहे? या सभागृहाचा विश्वास गमावला आहे असे कोण म्हणतो? मी देखील 25 वर्षे विधीमंडळाच्या माध्यमातून समाजसेवा करीत आहे. अशा पध्दतीने लोकशाहीचा खून पाडून नियमबाह्य प्रस्ताव आणून तो आमच्यावर जबरदस्तीने लादून फक्त गटनेत्यांनी बोलायचे, इतरांनी बोलायचे नाही हे आम्हाला मान्य नसताना नियमबाह्य प्रस्ताव आमच्यावर लादून आम्ही बोलायचे नाही, लवकर आटपा, आम्हाला घाई आहे, ते लवकर खुर्चीवरुन गेले पाहिजेत या मागचा उद्देश काय आहे?

सभापती महोदय, विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीचा निकाल घोषित होत असताना चित्र स्पष्ट झाले त्यावेळीच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्यांनी लगेच स्टेटमेंट दिले, आमचा बाहेरुन

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पाठिंबा आहे. तेव्हाच आमच्या लक्षात आले. माननीय पंतप्रधान मोदी साहेब बारामतीला गेले, त्यांनी सांगितले की, केंद्रामध्ये आम्ही श्री.शरद पवार यांचा सल्ला घेऊन कामकाज करीत असतो.

...2...



श्री.रामदास कदम......

त्यामध्ये अधिक स्पष्टता यावी, अधिक शिक्कामोर्तब झाले तर आम्हाला आनंद होईल. महाराष्ट्राच्या मराठी माणसाचा सल्ला घेऊन केंद्र सरकार काम करीत असेल तर आम्हाला त्याचा अभिमान आहे.

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी साहेब बारामतीला गेले ही आपल्या राज्याची परंपरा आहे. स्व.बाळासाहेब ठाकरे श्री.शरद पवार आणि आमची गाढ मैत्री आहे असे म्हणायचे तेव्हा आमचा मेंदू थंड गार झाला होता. तुम्ही मोदी साहेबांची तुलना करता. मला हे सांगायचे आहे की, मनोहर जोशी यांना राज्यसभेवर पाठविताना ते तरुण होते का? माननीय श्री.नरेंद्र मोदी हे देशाचे पंतप्रधान आहेत. त्यांचा उल्लेख करताना आपला मुद्दा सोडून बोलता कामा नये. आपण जर असे बोललात तर आम्हाला 100 उदाहरणे देता येतील. माननीय श्री.नरेंद्र मोदी हे देशाचे पंतप्रधान आहेत. त्यांच्याबद्दल बोलताना संशय निर्माण करणारे वाक्य बोलता कामा नये. उल्लेख करावयाचा असेल तर बारामतीमध्ये कोणत्या कामासाठी गेले हे सांगितले पाहिजे. आपल्या भाषणामध्ये अशा पध्दतीने संदिग्धता निर्माण केली गेली. माननीय श्री.नरेंद्र मोदी हे भारत या सर्वोच्च देशाच्या 125 कोटी लोकांचे प्रतिनिधीत्व करीत आहेत. त्यांना या सभागृहात खुलासा करण्यासाठी येता येणार नाही. तेव्हा संदिग्धता निर्माण करु नये.

श्री.रामदास कदम : मी माननीय पंतप्रधान श्री.मोदी साहेब असा उल्लेख केला आहे. शिवसेना प्रमुख स्व.बाळासाहेब ठाकरे आणि श्री.शरद पवार यांची मैत्री जगजाहीर होती, ती लपून छपून नव्हती. कोणाच्या पाठीत खंजीर खुपसण्याचे काम केले नाही. त्यांनी आयुष्यात पाठीमागून जाऊन कोणाशी दोस्ती केली नाही. मी वाईट काहीही म्हटलेले नाही. सन्माननीय पंतप्रधानांनी म्हटले की, आम्ही श्री.शरद पवार साहेबांचा सल्ला घेऊन केंद्र सरकारमध्ये काम करीत आहोत. मी पुढे असेही म्हटले की, महाराष्ट्राच्या मराठी माणसाचा सल्ला केंद्र सरकार घेत असेल तर आहाला त्याचा अभिमान आहे.यात यात तुम्हाला काय अडचण वाटली? श्री.शरद पवारांबद्दल

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

आणि माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदींबद्दल चांगले बोलले तर अडचण काय आहे? आम्ही चांगलेही बोलायचे नाही का? मी भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना पक्षाच्या युती सरकारमध्ये कॅबिनेट मंत्री आहे याची मला जाणीव आहे आणि मला त्याचा अभिमान आहे,मला त्याचे भान आहे.

..3...

16-03-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) M.3

SGB/ AKN/ ST/ ST/ AKN/ 15:00

श्री.रामदास कदम......

आमचा मेंदू शाबित आहे. ज्यांचा मेंदू शाबित नसेल त्यांनी तपासणी करुन घ्यावी. आमच्या मेंदूची काळजी करण्याची आवश्यकता नाही.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, कोणाचा मेंदू कोण कधी तपासेल हे काळ ठरवेल. मंत्री महोदयांना माझी एकच विनंती आहे की, सर्व पक्षातील अनेक नेते श्रध्देय असतात. या सभागृहात काय चालले आहे त्याबद्दल जरुर बोलावे. स्व.बाळासाहेब ठाकरे आमचे नेते होते असे आम्ही आजही मानतो. भावनेच्या आहारी जाऊन आपण काय बोलत आहोत याचे माननीय मंत्री श्री.रामदास कदम यांनी भान ठेवावे एवढेच मी सांगू इच्छितो. ते बोलताना असे म्हणाले की, या ठिकाणी काय चालले आहे ते मला कळत नाही. त्यांना शिवसेनेत काय चालले आहे ते कळत नाही तर हे कसे कळणार?

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माननीय मंत्री श्री.गिरीष बापट यांनी पुन्हा एकदा मुद्दा सांगावा अशी मी विनंती करतो.

श्री.गिरीष बापट : मी माझ्या भाषणात असा हरकतीचा मुद्दा उपस्थित केला की, या विधानपरिषद सभागृहापुढे जो विषय चर्चेला आला आहे त्यासंबंधी आपण चर्चा करीत आहोत. वेगळे विचार असतील तर ते मांडता येतील. त्याला कोणाची हरकत नाही. सर्व पक्षातील श्रध्देय नेते आहेत. त्यांच्याबद्दल बोलताना राजकारणामध्ये काही झाले तरी कोणाच्या भावना दुखावतील असे बोलू नये अशी मी विनंती केली. आपण असे म्हणालात की या ठिकाणी काय चालले आहे ते आम्हाला कळत नाही. त्यावर मी म्हटले की, जसे शिवसेना पक्षात काय चालले आहे हे आपल्याला कळत नाही तसे भारतीय जनता पक्षामध्ये काय चालले आहे हे कळण्याचा प्रश्न येत नाही.

नंतर एन.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**उप सभापती :** आपणा दोघांना येथे काय चालले आहे ते काही कळत नाही, निदान येथे जे काय चालले आहे ते मला तरी कळू द्यावे.

श्री.रामदास कदम : सभ्‍ापती महोदय, मी माननीय मंत्री श्री.गिरीश बापट यांना सांगू इच्छितो की, मी शिवसेनेचा नेता असल्यामुळे शिवसेनेमध्ये काय चालले आहे हे मला सगळे कळते. शिवसेनेमध्ये काय चालले आहे याची आपण चिंता करू नये. पण आज जे काही चालले आहे त्याची आपण चिंता केली पाहिजे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, मला कोणाचीही मने दुखवायची नाहीत. आदरणीय व्यक्तींबद्दल माझ्या तोंडून अनवधानाने काही बोलून गेले असेल तर ते कामकाजातून काढून टाकावे. ते शब्द मी मागे घ्यायला तयार आहे. मला कोणाचीही मने दुखवायची नाहीत. श्री.मोदी साहेब आदरणीय आहेत. ते या देशाचे माननीय पंतप्रधान आहेत. हे मला सांगण्याची कोणाचीही आवश्यकता नाही. आता थोड्याच वेळाने मतदान होणार आहे. त्यावेळी दूध का दूध आणि पानी का पानी होणार आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील जनताच आपल्याला जाब विचारणार आहे. आम्ही चुकलो तर आम्हाला विचारेल. त्यामुळे काही गोष्टी मनाला लागतात त्याची खंत वाटते. काही गोष्टी मनाला लागतात. त्याचे दु:ख होते, वेदना होतात. माननीय सभापती श्री.शिवाजीराव देशमुख महान व्यक्ती आहेत असा उल्लेख काल पर्यंत राष्ट्रवादी पक्षाचे नेते करीत होते. आपण अनुमती देत असाल तर मी सगळ्यांची भाषणे वाचून दाखवितो. मी सन्माननीय सदस्य श्री.विजयसिंह मोहिते-पाटील यांच्यापासून सर्वांची भाषणे वाचून दाखवितो. काल पर्यंत राष्ट्रवादी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी माननीय सभापती श्री.शिवाजीराव देशमुख यांचा उदोउदो केला आता त्याच राष्ट्रवादी पक्षाचे सन्माननीय सदस्य माननीय सभापतींना या पदावरून पायउतार व्हायला का सांगत आहेत हे महाराष्ट्राच्या जनतेला समजले पाहिजे. त्यामुळे सभागृहामध्ये नियमबाह्य प्रस्ताव आणला आहे असे मी मानतो. आपण घटनाबाह्य प्रस्ताव आणला आहे असे मी म्हणेन. घटनेचा खून करण्याचे काम या निमित्ताने सुरू आहे असे मी म्हणेन. आजचा दिवस हा महाराष्ट्र विधि मंडळाच्या इतिहासातील काळा दिवस असेल असेही मी म्हणेन. येथे प्रश्न माननीय सभापती श्री.शिवाजीराव देशमुख यांचा



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामदास कदम...

नाही. कदाचित सन्माननीय सदस्य श्री.सुनीलजी तटकरे हे देखील या जागेवर असू शकतात. जी व्यक्ती आपण या पदावर बसवाल त्या व्यक्तीच्याबाबतीत उद्या असे काही होऊ शकते. शेवटी नैतिकता ही महत्त्वाची आहे. या निमित्ताने आम्हाला व महाराष्ट्राच्या जनतेला या पाठीमागचा आपला नेमका उद्देश काय आहे या एका प्रश्नाचे उत्तर मिळणे आवश्यक आहे. आपण श्री.शिवाजीराव देशमुख यांना सभापती या पदावरून खाली का उतरवत आहात ? आमची देखील चीड होती. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना दोन वेळा निलंबित करण्यात आले होते त्यावेळी माननीय सभापती श्री.शिवाजीराव देशमुख यांची त्यांना निलंबित करण्यासंबंधातील भूमिका अगदी मवाळ होती. मात्र, राष्ट्रवादीच्या नेत्यांची भूमिका ताठर होती. असे प्रसंग आम्ही जवळून पाहिले आहेत. असे असताना देखील त्या व्यक्तीला आपण पदावरून खाली का आणत आहात ? मी पुन्हा एकदा सांगतो की, शिवसेना काँग्रेस सोबत नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी माननीय मंत्री श्री.रामदास कदम यांना सांगू इच्छितो की, श्री.जयंत पाटील हा तत्त्वासाठी आहे. कोण काय काय बोलले आहेत हे सांगायला मी तयार आहे. मी शक्य तो बोलणार नाही. मी बोललो तर मला अगदी टोकाचे बोलावे लागेल. आपला जो काही वाद चालला आहे तो त्यांच्या समवेत आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना खाली बसून हळूच बोलू नये असे सांगावे. त्यांना जे काही बोलावयाचे असेल ते त्यांनी बोलावे. होय, या सभागृहामध्ये अनेक कटू प्रसंग प्रत्येकाच्या बाबतीत येतात. याचा अर्थ एखाद्या माणसाला सभापती पदावरून खाली उतरविणे असा होऊ शकत नाही. माननीय सभापतींच्या दालनात जाऊन आम्हाला पाच मिनिटे वेळ द्यावा, अमुक एक काम द्यावे असे सांगणे बरोबर नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : चर्चेसाठी वेळ मिळावा असे आपले म्हणणे माननीय सभापतींसमोर मांडण्याचा सर्वांना अधिकार आहे.

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, त्यासाठी आपण सर्वजण जातो हे मला देखील माहीत आहे. आम्ही अधिकाराने जात होतो. आम्ही आमची कामे करून घेत होतो. सभापती महोदय, मला माझे भाषण करू द्यावे. सन्माननीय सदस्यांनी माझ्या भाषणात अडथळा आणला तर मला देखील तसे करता येईल.

सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे की, आपण अजून तरी नियमबाह्य कामकाज होऊ देऊ नये. फक्त गट नेत्यांना बोलण्याची अनुमती न देता ज्या ज्या सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे त्यांना बोलण्यास अनुमती द्यावी. भारतीय जनता पक्षाचे सन्माननीय सदस्य आज बोलणार नाहीत. भाजपमधील माझे जीवाभावाचे मित्र श्री.विनोदजी तावडे यावर काही बोलणार नाहीत हे मला माहीत आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम हे पर्यावरण मंत्री आहे. ध्वनिप्रदूषण होऊ नये म्हणून आम्ही न बोलण्याची भूमिका घेतली आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मौनम् सर्वार्थम् साधनम् अशी आपली भूमिका राहणार आहे. गप्प बसून सर्व काही साधून घेण्याची भूमिका आमच्या मित्र पक्षाने घेतली आहे. आम्ही आमची भूमिका अत्यंत स्पष्ट मांडत आहोत. माझी आपल्याला विनंती आहे की, हे पाप आपल्या हातून होता कामा नये. नव्हे तशी माझी प्रामाणिक इच्छा आहे. कदाचित माननीय उप सभापती श्री.वसंत डावखरे हे पीठासीन अधिकारी म्हणून आले नसते तरी चालले असते. पण आज त्या पदावर आपण बसला आहात. आपल्या हातून तसे पाप घडता कामा नये. नियमबाह्य काम होता कामा नये. कोणाच्या तरी दबावाखाली येऊन काम करणे असे मी म्हणणे योग्य होणार नाही. कदाचित तसे म्हणणे देखील नियमबाह्य होईल. त्यामुळे माझी आपणाला विनंती आहे की, हा जो प्रस्ताव आला आहे तो आपण फेटाळून लावावा. हा नियमबाह्य प्रस्ताव आहे असे आपण सांगावे. आपण सांगावे की, होय, ही महाराष्ट्राची विधान परिषद आहे. कोणाचाही कितीही दबाव आला तरी आम्ही कोणाच्याही दबावाखाली काम करीत नाही. येथे घटनेप्रमाणेच काम होते. घटनेचा खून येथे पाडला जाणार नाही. या सभागृहामध्ये माननीय सभापतींना बाजूला करण्याचे पाप आमच्या हातून

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामदास कदम....

होणार नाही. ..... (अडथळा)..... प्यार कुणाचे आहे हे मतदानाच्या वेळी कळेलच ना. कोण कुणाचे चुंबन घेणार आहे हे आता कळणारच आहे. ते संपूर्ण महाराष्ट्र पाहणारच आहे. कुणाचे गाल जास्त लाल आहेत हे आता महाराष्ट्रातील जनतेला कळणार आहे. सभापती महोदय, मी नियमाने बोलत आहे. मी एका चांगल्या माणसाबद्दल बोलत आहे. ज्याने विधिमंडळाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील कोट्यवधी जनतेची सेवा केली, जनतेला, शेतकऱ्यांना न्याय दिला आहे अशा माणसाला अशा प्रकारे अपमानित करून बाहेर काढू नका हे सांगण्यासाठी मी उभा आहे. श्री.मोदी साहेबांच्याबाबतीत माझ्या तोंडून चुकून काही शब्द गेला असेल तर तो मी मागे घेतो. ते या देशाचे पंतप्रधान आहेत याची मला कल्पना आहे. त्यांच्या हाताखाली आम्ही काम करीत आहोत. त्यांच्या मंत्रिमंडळामध्ये मी मंत्री आहे याची मला पूर्णपणे जाणीव आहे.

सभापती महोदय, आपण मला संरक्षण द्यावे. हे सर्वजण येथे प्लानिंग करून आलेले आहेत. हा एक कट आहे. या कटामध्ये आपण सर्वजण सामील आहात.

यानंतर श्री.जुन्नरे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. रामदास कदम ......

महाराष्ट्रातील विधिमंडळाच्या इतिहासामध्ये, विधान परिषदेच्या इतिहासामध्ये माननीय सभापतींविरुध्द अविश्वासाचा ठराव आणून मतदान होण्याची ही पहिलीच वेळ आहे. महाराष्ट्रातील विधानपरिषदेत माननीय सभापती महोदयांवर वैयक्तिक स्वार्थासाठी, पक्षाच्या स्वार्थासाठी, एका चांगल्या माणसाचा राजकीय बळी घेण्याचे काम या सभागृहात होत असल्यामुळे त्याचे मला दुःख होत आहे. त्यामुळे हा नियमबाह्य प्रस्ताव आपण हाणून पाडावा अशी माझी आपल्याला विनंती आहे. या ठिकाणी कटकारस्थान करुन जी मंडळी आली आहे, त्यांचे कटकारस्थान माननीय उप सभापती महोदय, आपण हाणून पाडावे अशी आपल्याला विनंती आहे. हे कटकारस्थान हाणून पाडण्यासाठी आपण रामशास्त्रीबाणा दाखवावा अशी आमची आपल्याकडून अपेक्षा आहे. सभापती हे कोण्या एका पक्षाचे नसतात, त्यांची बांधिलकी कोणत्याही एका पक्षासाठी नसते तर ते सभापती म्हणून सभापतीच्या आसनावर विराजमान झालेले असतात, याची जाणीव या सर्व मंडळींना आपण करुन द्यावी अशी विनंती आहे. माननीय उप सभापती महोदय, माझ्या मनात आपल्या बाबतीत एक वेगळा आदर आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, आपण ज्या पध्दतीने माननीय सभापती श्री. शिवाजीराव देशमुख यांना सभापती पदावरुन बाजूला करीत आहात, कदाचित हीच वेळ तुमच्यावरही येण्याचीही शक्यता आहे. आपल्या संदर्भात काही गोष्टी माझ्या कानावर आल्यामुळे मी आपल्याला हे सांगत आहे. राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाला सभापती पद तर आम्हाला उप सभापती पद दिले जाण्याची शक्यता असल्यामुळे मी आपला हितचिंतक म्हणून सावध करीत आहे. तुमचे आणि माझे संबंध अतिशय वेगळे आहेत, तुमचे आणि माझे संबंध जीवाभावाचे आहेत.

**उप सभापती :** सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांना मी सांगू इच्छितो की, आपल्या या वक्तव्यामुळे आपल्या संबंधाची चौकशी सुरु झाली आहे. आपले संबंध आपल्या पुरतेच ठेवावेत अशी विनंती आहे.

श्री.रामदास कदम : आपले संबंध मी असेच ठेवतो. परंतु आपल्याला सावध करण्यासाठीच मी हे सांगत आहे. माझी नैतिक जबाबदारी म्हणून मी आपल्याला हे सांगतो आहे. नाही तर आपणच उद्या म्हणाल की, माझा बळी जाणार आहे याची माहिति आपल्याला असताना सुध्दा आपण

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. रामदास कदम ......

काहीही माहिती दिली नाही. आपला देखील बळी जाता कामा नये. यामध्ये लवकरच आपलाही बळी जाणार आहे. त्यामुळेच वेळीच हे प्रकरण थांबवावे. आपण हे प्रकरण वेळीच थांबवले तर तुमचे प्रकरण थांबेल. आपले वय किती आहे, माननीय सभापती महोदयांचे वय किती आहे, याचे कोणाला काहीही पडलेले नाही. बेईज्जत कोण होईल याबाबत यांना काही चिंता नाही. यांना फक्त सभापतींच्या खुर्ची, सत्ता आणि लालदिव्याची गाडी एवढेच हवे आहे. उद्या माननीय श्री. डावखरे साहेबांची इज्जत काय राहील, माननीय श्री. देशमुख साहेबांचे काय होईल......

**उप सभापती :** मी आपल्याला सांगू इच्छितो की, डावखरे यांची इज्जत खुर्चीवर अवलंबून नाही तर ती डावखरे यांच्यावर अवलंबून आहे. मी आपला मित्र असल्यामुळे मी माझी प्रतिष्ठा आयुष्यभर जपेन एवढे मी आपल्याला माननीय बाळासाहेब ठाकरे यांची शपथ घेऊन सांगतो.

श्री. रामदास कदम : मी आपला अत्यंत आभारी आहे. आपले मन मोठे आहे. परंतु मित्र म्हणून आम्हाला काळजी आहे. माननीय शिवसेना प्रमुखांशी आपले संबंध कसे होते हे आपण आम्हाला सांगण्याची आवश्यकता नाही. आपण माननीय शिवसेना प्रमुखांचे आशीर्वाद घेण्यासाठी किती वेळा बंगल्यावर आला होता याचे आम्ही साक्षीदार आहोत. त्यामुळे माझी माननीय उप सभापती महोदयांना पुन्हा एकदा विनंती आहे की, पदे येतात आणि जातात. परंतु घटनेचा खून होता कामा नये असे माननीय तावडे साहेब पाठीमागून मला सांगत आहेत.

**उप सभापती :** मानननीय श्री. तावडे साहेबांचे "लंका जली की, हनुमान बाहर" असे आहे.

श्री. रामदास कदम : माननीय उप सभापती महोदय, भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे, असे माननीय मंत्री श्री. तावडे साहेब सांगत आहेत. मघाशी म्हटल्याप्रमाणे म्हातारी मेल्याचे दु:ख नाही परंतु काळ सोकावता कामा नये. अविश्वासाचा प्रस्ताव थांबवण्याबाबत आपण पुढाकार घ्यावा अशी विनंती आहे. आजच्या सारखे कटू प्रसंग या सभागृहात अनेक वेळा आलेले आहेत. आपल्या प्रयत्नाला यश आले तर महाराष्ट्रातील जनता आपल्याला डोक्यावर घेईल असे मी म्हणेन. हा प्रसंग अतिशय कटू आहे, वाईट आहे, अतिशय क्लेशदायक आहे, हा प्रसंग अतिशय दु:खदायक आहे, वेदना देणारा आहे असे मी म्हणेन. या विषयाच्या संदर्भात आपण पुढाकार

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. रामदास कदम ......

घ्यावा, या प्रश्नाच्या संदर्भात आपल्या वरिष्ठांना काही बोलता आले तर बोलून हे प्रकरण आपण थांबवले तर दुधात साखर मिसळल्यासारखा गोडवा निर्माण होईल. हा प्रस्ताव नियमा प्रमाणे चालू द्यावा. या प्रस्तावावर ज्यांना ज्यांना बोलण्याची इच्छा असेल त्यांना या प्रस्तावावर बोलू द्यावे. सर्व सन्माननीय सदस्यांना आपण का बोलू देत नाहीत हे मला माहिती नाही. आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो व या ठिकाणी हा जो नियमबाह्य प्रस्ताव आणला त्या नियमबाह्य प्रस्तावाचा धिक्कार करतो, निषेध करतो व हा प्रस्ताव फेटाळून लावावा अशी मागणी करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

धन्यवाद. जय हिंद, जय महाराष्ट्र.

--------

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे : या प्रस्तावावर केवळ गट नेत्यांनाच विचार मांडण्याची संधी दिली जाईल असे कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये ठरले होते. त्या प्रमाणे या ठिकाणी आता जवळपास सर्व गटनेत्यांनी आपले विचार या प्रस्तावाच्या संदर्भात मांडले आहेत. ज्या गटनेत्यांनी या प्रस्तावाच्या संदर्भात विचार मांडले नाहीत त्यांना विचार मांडण्याची संधी देण्यात यावी अशी विनंती आहे.

**उप सभापती** : आता सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी विचार मांडावेत.

...5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक): उप सभापती महोदय, सभापती महोदयांच्या विरोधात मांडलेल्या अविश्वासाच्या प्रस्तावाला विरोध करण्यासाठी मी उभा आहे. काल मी लवकर घरी गेलो होतो. टीव्हीवरील मालिका मी बघत नाही. परंतु काल "मेरी आशिकी तुमसे ही" ही मालिका टीव्हीवर सुरु होती.

यानंतर श्री. अजित.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कपिल पाटील...

हिंदी मालिकांमध्ये कधी काय होईल हे सांगता येत नाही. त्या मालिकेमध्ये इशानी ही रणवीरची पत्नी दाखविली आहे. त्याचे आणि तिचे लग्नाच्या आधी पटत नसते. एका भागामध्ये ती नवऱ्यावर निरतिशय प्रेम करणारी दाखविली होती. नवऱ्याच्या हातून कोणाचा तरी खून होतो म्हणून त्याला वाचविण्यासाठी ती प्रयत्न करते. पोलीस तिला पकडतात त्यावेळी ती पोलिसांना सांगते, "तो खून नवऱ्याने केला आहे आणि तो माझा प्रियकर होता." म्हणजे मालिकेमध्ये काय बदल होतो ते काही कळत नाही. कोण कोणावर प्रेम करते, कोण कोणाची प्रेयसी, कोण कोणाचा पती होईल हे सांगता येत नाही.

सभापती महोदय, महाराष्ट्रचे राजकारण त्या हिंदी मालिकासारखे सुरु आहे. येथे मित्र कोण, शत्रू कोण, कोण कोणावर प्रेम करतो, हे कळत नाही. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी "सिंहासन "चित्रपट पाहिला असेल. श्री.जब्बार पटेल यांनी सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना तो चित्रपट दाखविला होता. त्यामध्ये जे राजकारण चालते ते पाहून पत्रकार श्री.दिघू टिपणीस वेडा होतो. आता जे काही राजकारण सुरु आहे ते पाहून महाराष्ट्रातील संवेदनशील जनतेची अवस्था दिघू टिपणीस सारखी झालेली आहे. मी पत्रकार असल्यामुळे त्या संवेदनशीलतेतून बोलत आहे. आमदार झाल्यानंतर लक्षात आले की, आमदार झाल्यामुळे किमान वेड न लागून, नीट पाहून बोलता येते.

सभापती महोदय, महाराष्ट्राच्या इतिहासातील कधी नव्हे असा प्रसंग आपल्यासमोर आहे. मला याची खात्री आहे की, ज्यांनी हा प्रस्ताव मांडलेला आहे आणि जे या प्रस्तावाला समर्थन देणार आहेत ते ही द्विधा अवस्थेत आहेत. त्यांच्याही मनाला क्लेश होत आहे. पण प्रस्ताव आलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी कै.विलासराव देशमुखांचा दाखला दिला. तो दाखला फार जुना नाही. ते अलीकडचे उदाहरण आहे. प्रा.ना.स.फरांदे हे सभापती होते आणि त्यावेळी बहुमत सत्ताधारी पक्षाकडे होते. तेव्हा असा प्रस्ताव आणण्याचा प्रयत्न झाला असता त्यावेळी मुख्यमंत्री पदी असलेले श्री.विलासराव देशमुख यांनी सांगितले की, या सभागृहाची एक उच्च परंपरा आहे. "सभापती" त्यांचा किंवा आपला असा नसतो, तर "सभापती" सभागृहाचा असतो

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कपिल पाटील...

म्हणून सभापती पदाचा आदर राखण्यासाठी त्यांनी तो ठराव आणू दिला नाही. महाराष्ट्र परंपरा जपणारा आहे. हा महाराष्ट्र यशवंतराव चव्हाणांचा आहे, वसंतदादांचा आहे, विलासराव देशमुखांचा आहे. त्यामुळे यापूर्वी कधीही सभागृहाच्या प्रक्रियेमध्ये अशा पद्धतीचे राजकारण खेळले गेले नाही. श्री.शिवाजीराव देशमुखांबाबत असे नेमके काय घडले हे जाणून घेण्यास मी उत्सुक आहे. श्री.शिवाजीराव देशमुख यांच्याबद्दल असलेल्या श्रध्देपोटी मी हे बोलत नाही. त्यांच्या प्रती असलेल्या आदरापोटी मी हे बोलत नाही. माननीय सभापतींकडून असा कोणता प्रमाद घडला की त्यांच्या बद्दलचा अविश्वास प्रस्ताव आणावा लागला हे महाराष्ट्राला जाणून घेण्याचा अधिकार आहे. या सभागृहाचा अधिकार आहे. प्रस्ताव मांडताना त्याचा उद्देश सांगावा लागतो. चौदा दिवस अगोदर कळवावा लागतो. ते चौदा दिवसापूर्वी आम्हाला कळलेले नाही. कदाचित ज्यांच्याकडून प्रस्ताव मांडण्यात आला त्यांच्या भाषणातून ते समजेल. हा प्रस्ताव देण्याच्या अगोदर त्याचा उद्‌देश कळणे आणि जाणून घेणे हा सभागृहाचा अधिकार आहे, पण ते कळलेले नाही.

सभापती महोदय, जनरल करीअप्पा हे भारताचे सरसेनापती होते. ते कोल्हापूरला आले होते. त्यांच्यासमोर जाणे शक्य नव्हते म्हणून एक लहान मुलगा झाडावर चढून त्यांना पाहण्याचा प्रयत्न करीत होता. करीअप्पांनी गाडी थांबविली आणि झाडावर चढलेल्या मुलाकडे पाहून विचारले, तू काय पाहत आहेस ? तो मुलगा खाली उतरला, त्यांनी सरसेनापतींचा हात हातात घेतला शिवाजीराव देशमुखांकडे लढण्याचे बळ आहे. कोणत्याही प्रसंगांना सामोरे जाण्याचे बळ त्यांना करीअप्पांकडून मिळालेले आहे. स्वातंत्र्य लढयापासूनचा श्री.वसंतदादा पाटलांचा वारसा त्यांच्यापुढे आहे. पण महाराष्ट्राच्या उभारणीमध्ये प्रचंड मोठे योगदान मग ते सहकाराच्या क्षेत्रातील असेल, शिक्षण क्षेत्रातील असेल, ते श्री.शिवाजीराव देशमुखांनी महाराष्ट्राला दिलेले आहे. तेव्हा या वयामध्ये त्यांच्याकडून असे काय वाईट घडले ज्यामुळे त्यांच्या विरुध्द अविश्वास प्रस्ताव आणण्याची गरज पडली हे आम्हाला जाणून घेण्याचा अधिकार आहे.

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कपिल पाटील...

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी येथे मनाचे श्लोक सांगितले. त्यांच्या यातना त्यांनी व्यक्त केल्या. त्यांनी येथे बोलून दाखविलेली खंत अतिशय महत्वाची आहे आणि त्याची गांभीर्याने दखल घेण्याची आवश्यकता आहे. मला त्यांच्या राजकारणाबद्दल काही म्हणायचे नाही. पण या सभागृहातील ज्येष्ठ सदस्य म्हणून या सभागृहात बोलण्याचे स्वातंत्र्य हिरावून घेतले जाणार काय असा त्यांनी प्रश्न उपस्थित केला आणि तो सर्वात महत्वाचा आहे.

सभापती महोदय, लोकसभेत पक्षांतर बंदी कायदा मंजूर झाला त्यावेळी सर्वजण बोलत होते की, असा कायदा आला पाहिजे, घोडेबाजार थांबला पाहिजे. पळवापळवी थांबली पाहिजे. राजकारणातील बाजार थांबला पाहिजे. पण त्या विधेयकाला साथी मधू लिमये यांनी विरोध केला होता. त्यांनी या मुद्यावर विरोध केला होता की, जो सदस्य सभागृहात निवडून येतो त्याचे बोलण्याचे स्वातंत्र्य या विधेयकामुळे हिरावून घेतले जाईल. मधू लिमये असे का बोलले याचा अनुभव सन्माननीय मंत्री श्री.रामदास कदम यांचे बोलणे ऐकल्यानंतर अनुभव घेत होतो. पक्षांतर विरोधी कायदा काहीही असेल, परंतु या सभागृहात आल्यानंतर सदस्याला कोणत्याही मुद्यावर बोलण्याचा अधिकार असला पाहिजे. त्याला पूर्ण मोकळीक असली पाहिजे. आज एका ठरावाच्या निमित्ताने आपण आवाज बंद करणार असाल तर त्यासारखी कोणती वाईट गोष्ट आहे ? प्रत्येकाला सभागृहात बोलण्याचे स्वातंत्र्य आहे आणि ते व्यक्त झाले पाहिजे. येथील सभ्यतेच्या आणि नियमांच्या मर्यादा पाळल्या गेल्या पाहिजेत आणि त्या पाळूनच सदस्य बोलत असतात. पण तुम्ही बोलायचे नाही किंवा अमुकच बोलायचे असे नियम आपण घालत आहात.

सभापती महोदय, कामकाज सल्लागार समिती ही सभेच्या कार्यवाहीचा निर्णय घेण्यासाठी आहे. नॉट अबाऊ दि हाऊस. या सार्वभौम सभागृहाच्या वर कोणताही समिती असू शकत नाही. तो या सभागृहाचा अधिकार आहे. या सभागृहात काय निर्णय घ्यायचा, कोणते विधेयक मंजूर करायचे, कोणते विधेयक नामंजूर करायचे, कोणता ठराव मंजूर करायचा, कोणता ठराव नामंजूर करायचा हा अधिकार सभागृहाचा आहे. या सभागृहातील सदस्यांना सर्व भावभावनांना व्यक्त

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कपिल पाटील...

करण्याची संधी देण्याचे जे स्वातंत्र्य आहे, मोकळीक आहे, ती त्यांना दिली पाहिजे. पण या ठरावाच्या निमित्तानेसुद्धा आज ती पूर्ण मोकळीक नाही, याची खंत माननीय मंत्री श्री.रामदास कदम यांनी व्यक्त केली आणि त्यामुळे त्याची गंभीरपणे दखल घेण्याची जरूरी आहे. प्रश्न असा आहे की, श्री.रामदास कदम हे माझ्यासारखे सामान्य सभासद नाहीत. ते मंत्री आहेत. ते सरकारचे प्रतिनिधी आहेत. सरकारचा एक प्रतिनिधी म्हणून तो सभागृहात बोलत असतो. आम्ही काहीवेळेला त्यांना प्रश्न विचारतो की, आपण त्या विभागाचे मंत्री नसताना उत्तरे का देता. पण जेव्हा ज्येष्ठ मंत्री बोलत असतात तेव्हा ते सामूहिक जबाबदारीतून बोलत असतात. त्यामुळे त्यांनी व्यक्त केलेली खंत ही सरकारच्या वतीने आहे काय, हा आपल्यासमोरील प्रश्न आहे. कारण दुसऱ्या बाजूला ते सातत्याने सांगत होते की, इकडची आणि तिकडची नावे घेऊन काय घडणार आहे ? नेमके काय घडत आहे हे आमच्या समोर कोडे आहे. "मेरी आशिकी तुमसे ही " या मालिकेचा उल्लेख मी या करिता केला की, नेमकी कोणाची आशिकी कोणाबरोबर चालू आहे, हे सभागृहाला कळण्याचा अधिकार आहे आणि तो कळला पाहिजे. सत्ताधारी पक्ष सरकार चालविण्यासाठी जबाबदार आहे, हे राज्य चालविण्यासाठी जबाबदार आहे, हे सभागृह चालविण्यासाठी सुद्धा तितकाच जबाबदार आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. कपिल पाटील ....

मला माननीय सभापती श्री. शिवाजीराव देशमुख साहेबांच्या संदर्भातील व्यक्तिगत अनुभव सुध्दा सांगायचे आहेत. प्रस्तावाचा निकाल काय लागेल तो लागेल. सभागृह त्या संदर्भात ठरवेल. भल्या माणसाने असे काय केले होते ? आपण मराठीत "म्हातारा" असे म्हणतो" मघाशी "म्हातारी मेल्याचे दु:ख नाही", असे मला म्हणायचे होते. म्हाताऱ्याचा अर्थ असा की, " महान आणि थोर". म्हातारा हा वाईट शब्द नाही. जो नुसता वयाने नाही तर अनुभवाने, ज्ञानाने, तपाने समृध्द झाला आहे, त्याला "म्हातारा" असे म्हटले जाते. "महा आणि थेर" या अर्थाचा तो शब्द आहे. तो पाली भाषेतील शब्द आहे आणि म्हणून तो "म्हातारा" शब्द आला आहे.

श्री. शरद रणपिसे : सभापती महोदय, भिख्खूंना "महाथेरो" असे म्हणतात.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, थेराबद्दलचे वर्णन धम्म इतिहासात आहे आणि ते सर्व वर्णन माननीय सभापती श्री. शिवाजीराव देशमुख साहेबांना लागू होते. सन्माननीय सदस्य सर्वश्री सतिश चव्हाण, किरण पावसकर यांच्यासारखे अनेक सन्माननीय सदस्य दालनात गेल्यानंतर त्यांचे बाकी कोणाच्या पायाकडे हात झुकत नाहीत, माना झुकत नाहीत. मात्र विधिमंडळात एक माणूस त्याला अपवाद आहे आणि ते म्हणजे माननीय श्री. शिवाजीराव देशमुख. आपल्या सर्वांचे हात बरोबर त्यांच्या चरणाकडे जातात आणि त्यात स्वार्थ असतो यातील काही भाग नाही, त्यांच्या व्यक्तिमत्वाकडे पाहिल्यानंतर माणसाची मान झुकतेच, खाली चरणाकडे हात जातोच, माणसे आदराने झुकतात. माननीय श्री. शिवाजीराव देशमुख साहेबांनी सभागृहाचे कामकाज चालविताना कधीही पक्षपात केला नाही, कधीही दुजाभाव केला नाही. वयाने लहान सन्माननीय सदस्यांना सुध्दा वाव दिला, संधी दिली. एखादा प्रश्न सभागृहात आल्यानंतर ज्या भागातील तो प्रश्न असेल, त्या भागातील सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारलेला नसेल, मात्र ते सन्माननीय सदस्य सभागृहात हजर असतील तर माननीय सभापती सन्माननीय सदस्यांना उठवून सांगणार की, आपल्याला या संदर्भात काही म्हणायचे आहे ते सांगा. माननीय सभापतींनी संधी देण्याची ती पध्दत होती. सन्माननीय सदस्यांना सभागृहात सक्रीय करणे हे माननीय सभापतींचे मूळ काम असते आणि ते काम माननीय सभापती निरपेक्षपणे करीत आले आहेत आणि माननीय सभापतींबाबतच्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

..2

श्री. कपिल पाटील ....

अविश्वासाच्या प्रस्तावावर चर्चा करावी लागणे हेच अत्यंत क्लेशदायक, दु:खदायक, वेदनादायक आहे. ती वेदना मी व्यक्त करतो आणि या प्रस्तावाला पुन्हा एकदा विरोध करून माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद !

----

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सभागृहात माननीय सभापती यांच्यावरील अविश्वासाचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. सभागृहात हा जो अघोरी प्रस्ताव मांडण्यात आला आहे त्याचा निषेध करण्यासाठी, धिक्कार करण्यासाठी मी उभा आहे. मला इतक्या दिवसांत, वर्षांत पहिल्यांदाच एका गोष्टीची जाणीव झाली. संविधानात असलेल्या नियमाप्रमाणे, सभागृहाच्या नियमाप्रमाणे सभागृहात सन्माननीय सदस्यांना आपली मते मांडण्याची, बोलू देण्याची परंपरा आहे. आज पहिल्यांदा संविधानातील मत व्यक्त करण्याच्या स्वातंत्र्यावर घाला घालण्याचा प्रयत्न झाला आहे. मला एका गोष्टीचे नवल वाटते की, कोणतीही चर्चा सुरू असताना एखादे सन्माननीय सदस्य पॉईंट ऑफ ऑर्डर, पॉईंट ऑफ प्रोसिजर, पॉईंट ऑफ इन्फर्मेशन यांच्या माध्यमातून बोलण्यास उभे राहिले तर चेअर त्यांना बसविते, सन्माननीय सदस्य मागणी करूनही त्यांना बोलू दिले जात नाही. मी इतक्या वर्षांत पहिल्यांदा हे चित्र सभागृहात पाहिले असता मला फार दु:ख झाले. माननीय सभापतींनी सन्माननीय सदस्य प्रा. जनार्दन चांदूरकर यांना पॉईंट ऑफ प्रोसिजर उपस्थित करण्याची परवानगी दिली. मात्र त्यांना परवानगी देऊन देखील बोलू दिले गेले नाही, पॉईंट ऑफ प्रोसिजर मांडू दिला नाही.

सभापती महोदय, माननीय मंत्री श्री. रामदास कदम म्हणाले त्याप्रमाणे आजचा हा दिवस आपल्या विधिमंडळाच्या इतिहासातील अत्यंत काळाकुट्ट दिवस आहे. मी त्यांच्या त्या मताशी सहमत आहे. सत्तेसाठी माणसे किती राक्षसी काळजाची बनतात याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे आजचा हा प्रस्ताव आहे. मला विश्वामित्राची गोष्ट आठवते. विश्वामित्र मेनकेसाठी पागल झाला, भ्रष्ट झाला. कालपर्यंत मित्र म्हणून राहत होते, खांद्याला खांदा लावून चालत होते, फिरत होते, बोलत होते त्यांनी सत्तासुंदरीसाठी अशाप्रकारे मित्राचा विश्वासघात करावा, याचे उत्तर मला काही सापडत नाही. राज्याच्या संपूर्ण राजकारणाला कलाटणी देणारा हा प्रकार आहे. आपल्या राज्याचे राजकारण कुठे जाणार आहे, कोणत्या दिशेने जाणार आहे ? संपूर्ण महाराष्ट्र, देश ही परिस्थिती बघत असेल. ही कोणती सजा आहे ? कोणत्याही प्रकारची चार्जशीट नाही. एखादा गुन्हेगार, कर्मचारी गुन्हा करतो तेव्हा त्याला चार्जशीट दिली जाते, आरोपपत्र असते. सभागृहात मात्र फक्त विश्वास गमाविला आहे एवढेच सांगण्यात आले आहे. संसदीय पध्दतीप्रमाणे ही बाब उचित नाही. सन्माननीय सदस्य सर्वश्री माणिकराव ठाकरे, कपिल पाटील यांनी संगितले. माननीय मंत्री

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. जोगेंद्र कवाडे ....

श्री. रामदास कदम यांनी देखील सांगितले. प्रस्ताव मांडणारे सन्माननीय सदस्यही सांगतील. प्रश्न असा निर्माण होतो की, कोणत्या गुन्ह्याची शिक्षा माननीय सभापती श्री. शिवाजीराव देशमुख यांच्या सारख्या एका अत्यंत चांगल्या माणसाला दिली जात आहे ?

सभापती महोदय, असे काय झाले, गुन्हा नाही, दोस्त काही कारण नसताना दुश्मन झाला, असे म्हणण्याची पाळी आमच्यासारख्या सदस्यांवर यावी हे मोठे दुर्दैव आहे. 18-20 वर्षांपासून माननीय सभापती श्री. शिवाजीराव देशमुख हे अत्यंत रामशास्त्री बाण्याने राहिले. रामशास्त्री बाणा हा ऑब्जेक्शनेबल शब्द नाही, नाही तर म्हणाल की, आम्हाला उद्देशून बोललात.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे......

परंतु, ज्या बाण्याने सभागृहाचे कामकाज त्यांनी चालविले, ते पाहिले तर आपल्याला तसेच म्हणावे लागेल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी सांगितले ते खरे आहे. कोणतेही सन्माननीय सदस्य त्यांच्या दालनात गेले की, त्यांचा सन्मान, आदर, सत्कार केला जायचा. सभागृहात सर्वांना बोलण्याची संधी देण्याचे कामही त्यांनी केले. हे मी अनुभवले आणि पाहिलेलेही आहे. असे असताना अशा प्रकारचे आरोप लावून त्यांना सभापती पदाच्या खुर्चीवरुन हटविण्याचे कारस्थान का रचले गेले ? सन्माननीय मंत्री श्री.रामदास कदम साहेब बोलले ते बरोबर आहे. अशा प्रकारचे कट, कारस्थान का रचले गेले, हे समजत नाही. एखाद्या मंत्र्यांवर, एखाद्या सभापतींवर, एखाद्या उप सभापतींवर अशा प्रकारचा अविश्वास प्रस्ताव येतो तेव्हा अखबारों में चर्चा होती है. उन्होंने ये किया, वह किया, अमूक किया, तमूक किया, लेकिन हमारे सभापति के बारे में तो कोई चर्चा नहीं हुई. अखबार वाले, मिडिया वाले, इलेक्ट्रॉनिक मिडिया वाले भी परेशान है कि किस बारे में इस प्रकार का आरोप लगाया गया, लांछन लगाया गया. याची काहीच चर्चा माध्यमांमध्ये झाली नाही. अन्यथा, माध्यमांमधून याबाबतची चर्चा होत असते. या सभागृहाचे माननीय, आदरणीय सभापती श्री.शिवाजीराव देशमुख यांनी असे कोणते असंसदीय कामकाज केले, असा कोणता अपराध केला, कोणता गुन्हा केला की, ज्यामुळे त्यांच्याविरुध्द अशा प्रकारचा अविश्वासाचा प्रस्ताव आणून त्यांना या पदावरुन दूर करण्याचा प्रयत्न केला जात आहे. एक वडीलधारे व्यक्तिमत्त्व, शेतकऱ्यांच्या प्रश्नावर पोटतिडीकीने बोलणारे, त्यांच्या अधिकाराची जाणीव करुन देणारे, आमच्या सारख्या नवीन सदस्यांना प्रोत्साहन देणारे आणि वेळोवेळी गरज असो किंवा नसो पण त्यांना योग्य वाटेल तेव्हा मार्गदर्शन करणारे मार्गदर्शक श्री.शिवाजीराव देशमुख साहेब आहेत.

सभापती महोदय, या ठिकाणी अनेक उदाहरणे दिली गेली. यापूर्वी देखील सभापतींवर अविश्वासाचा प्रस्ताव आला आहे. काही जुने रेकॉर्ड चाळत असताना माननीय श्री.ना.स.फरांदे यांच्या संबंधीचे वृत्त वाचावयास मिळाले. ते भारतीय जनता पक्षाचे होते. त्यावेळी युतीचे सरकार

...2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे......

होते. परंतु, युतीचे सरकार गेल्या नंतर देखील फरांदे साहेब सभापती पदावर होते. त्यांच्याविरुध्द अविश्वास प्रस्ताव आणावयाचा किंवा कसे, अशा प्रकारची चर्चा सुरु झालेली होती. परंतु, तत्कालीन मुख्यमंत्री श्री.विलासरावजी देशमुख यांनी तसे होऊ दिले नाही. याला मनाचा मोठेपणा लागतो आणि आभाळाएवढे काळीज लागते. या सभागृहाची शेंडी ज्याच्या हातात द्यायची आहे ते आपल्या विचारांचे आहेत किंवा नाही, याची पर्वा न करता एक चांगली परंपरा स्व.विलासरावजी देशमुख यांनी सुरु केली. त्यांनी असे सागितले होते की, "जोपर्यंत फरांदे साहेबांचा कार्यकाल आहे, तोपर्यंत त्यांना सभापती पदावरुन हटविण्यात येऊ नये." हे सांगण्यासाठी मनाचा मोठेपणा लागतो. सन्माननीय श्री.शंकरराव जगताप साहेबांच्या बाबतीतही असेच झाले आहे.

सभापती महोदय, माननीय मंत्री श्री.रामदास कदम यांनी सांगितले ते खरे आहे. आदरणीय श्री.शिवाजीराव देशमुख हे ज्यावेळी सभापती झाले त्यावेळी त्यांचा सन्मान करणारा ठराव मांडताना आमच्या मित्रपक्षाच्या अनेक नेत्यांनी त्यांचे कौतुक केले आहे, अभिनंदनही केले आहे. मला असे वाटते की, माणूस एवढ्या लवकर हे सर्व कसा विसरतो ? आपल्या चांगुलपणाला, आपल्या नीतिमत्तेला, आपल्या नैतिकतेला माणूस जेव्हा विसरतो तेव्हा अशा प्रकारची अभूतपूर्व परिस्थिती निर्माण होते. मंत्री महोदयांनी स्व.आर.आर.पाटील यांचे उदाहरण दिले आहे. स्व.आर.आर.पाटील, श्री.विजयसिंह मोहिते-पाटील अशा अनेक नेत्यांनी आदरणीय श्री.शिवाजीराव देशमुख यांच्याबद्दल गौरवोद्‌गार काढले आहेत. त्यांच्या मोठेपणाची, औदार्याची, नेतृत्त्वाची, कर्तृत्त्वाची, समाजसेवेची, सामाजिक परिवर्तनाची त्यांनी प्रशंसा केली आहे. फुले, शाहू, आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार महाराष्ट्रामध्ये घेऊन जाणारा प्रामाणिक कार्यकर्ता म्हणून सभापतीस्थानी श्री.शिवाजीराव देशमुख साहेब बसले आहेत, असे कौतुकोद्‌गार त्यांनी काढले आहेत. माननीय श्री.रामदास कदम साहेब म्हणाले ते बरोबर आहे. बुध्दांमध्ये आत्मा मानत नाहीत. पण खरोखरच आबांचा आत्मा असेल तर जेव्हा हा प्रस्ताव आला तेव्हा त्यांचा आत्मा तळमळत असेल, तडफडत असेल. आमचा विचार केला नाही तरी चालेल पण किमान आबांच्या आत्म्याची काळजी आपण घ्यावी, असे मला वाटते. मित्रांनो, चेहऱ्याऐवजी चरित्र दिसले असते तर माणसाने

...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे......

आरसा पाहण्याचे बंद केले असते. अशीच परिस्थती आज ठरावाच्या निमित्ताने महाराष्ट्रात निर्माण झाली आहे. हे कुठे तरी थांबले पाहिजे. आपण असे सांगितले असते की, देशमुख साहेब आपण बाजूला व्हा. देशमुख साहेब सन्मानाने बाजूला झाले असते.

सभापती महोदय, सन्माननीय गटनेते श्री.माणिकराव ठाकरे यांनी एक गोष्ट सांगितली, आम्हीही ती अनुभवलेली आहे. विरोधी पक्ष नेते पदासाठी आपला आग्रह होता, प्रश्नच नाही, तो आपला अधिकार आहे, हक्क आहे. पण त्या पाठीमागील कारणे काय होती, ती देखील आपल्याला ठाऊक आहेत. मी अधिक तपशील देऊन सभागृहाचा वेळ घेणार नाही. परंतु विलंब लागला असेल तर तो कशासाठी लागला, हे आपण सर्वजण जाणतो. विधानसभेतील विरोधी पक्ष नेत्याची निवड व्यवस्थितपणे पार पडल्यानंतर विधानपरिषदेतील निवडही व्यवस्थितपणे पार पडली, याचे समाधान मानून आपण एकत्रितपणे काम केले असते तर किती तरी चांगले झाले असते. ही सद्‌बुध्दी आम्हाला का सुचली नाही ? याचे मला खूप दु:ख वाटते.

सभापती महोदय, ज्या मित्रांनी सभागृहात हा प्रस्ताव आणला, त्यांची सभागृहातील सदस्य संख्या केवळ 28 आहे. अविश्वास प्रस्ताव मंजूर होण्यासाठी किमान 40 सदस्यसंख्या आवश्यक आहे. परंतु, तेवढे संख्याबळ नसतानाही हा प्रस्ताव आणण्याची हिंम्मत आपण केली. का केली ? याचे उत्तर महाराष्ट्र विचारेल, शेतकरी विचारेल.

सभापती महोदय, अवकाळी पावसामुळे, गारपिटीमुळे शेतकरी आत्महत्या करीत आहेत. कालही पाऊस झाला. मी जालना येथे होतो. सर्व शेतीची धुळधाण झाली आहे, शेतकऱ्यांचे जीवन बरबाद झाले आहे, हातातोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतला आहे. शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्या, शेतकऱ्यांची झालेली अवस्था, कामगारांची झालेली अवस्था, दलित, आदिवासी, ओबीसी यांचे प्रश्न, दाभोळकर, पानसरे सारख्या सामाजिक कार्यकर्त्यांच्या झालेल्या हत्या, नागपूरला मुख्यमंत्री महोदयांच्या गावात, भर दिवसा दुकानामध्ये शिरुन व्यापाऱ्याची झालेली हत्या, साखळी ओढण्याचे वाढलेले प्रकार, बलात्कार, एकूणच राज्यात निर्माण झालेली कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती बिकट असताना या प्रश्नावर काही कारण नसताना दिवसदिवसभर चर्चा सुरु राहते.

यानंतर श्री.वि.खर्चे.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(सभापती स्थानी माननीय उप सभापती)**

प्रा.जोगेंद्र कवाडे...

महाराष्ट्राच्या जीवघेण्या समस्या सोडविण्यासाठी हा वेळ घालविला असता तर मला फार बरे वाटले असते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे फक्त 28 सदस्य असताना अविश्वासाचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. अविश्वास प्रस्ताव पारित होण्यासाठी 40 सदस्यांची आवश्यकता असते. 78 सदस्यांचे हे सभागृह आहे, 28 सदस्य संख्या असताना अशी हिंमत करण्यात आली आहे. प्रस्ताव पारित करण्यासाठी जेवढी मते पाहिजेत तेवढी मते तुम्हाला मिळतील. परंतु अविश्वास प्रस्ताव मांडताना किमान 40 सदस्यांची गरज असते. ही सदस्य संख्या नसताना देखील हा प्रस्ताव कोणाच्या बळावर व हिंमतीवर आणला आहे. आमच्या वऱ्हाडात अशी म्हण आहे की, 'सासूच्या जिवावर जावई फौजदार' अशी तर अवस्था नाही ना ? याचे देखील उत्तर महाराष्ट्रातील जनतेला मिळाले पाहिजे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सभागृहात बहुमत नाही, तरी देखील त्यांनी कोणाच्या हिंमतीवर हे काम केले आहे. सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित आपणाला कोण पाठिंबा देणार आहे. अजूनही वेळ गेलेली नाही, संपूर्ण महाराष्ट्राचा विश्वास आपण परत मिळवू शकतो. सत्ता असो किंवा नसो काम करण्यासाठी माणसाला कसलीही गरज लागत नाही. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरेजी आम्ही सत्ता नसताना देखील काम करतोच आहे, आपण तर नेहमीच वरिष्ठ पदे भूषिविली आहेत, आम्ही जमिनीवरील माणसे आहोत.

माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते साहेब सन्माननीय सदस्य श्री.शिवाजीराव देशमुख हा एवढा मोठा वयोवृध्द माणूस मला नेहमी सर म्हणतात, सर या, सर असे काही करु नका, आपण यातून मार्ग काढून खैरलांजी प्रकरणात न्याय मिळवून देऊ. असे म्हणणारा हा माणूस आहे. सत्तेपेक्षा सत्तेचे सामर्थ्य मोठे असते, याचे भान सर्वांनी ठेवले तर विरोधात बसलो काय आणि सत्तेत बसलो काय लढाई तर सत्तेचीच करायची आहे. लढाई सन्मानाचीच करायची आहे. लढाई स्वाभीमानाचीच करायची आहे. महाराष्ट्राचा स्वाभिमान व सन्मान मिळविण्यासाठी सभापती पदाच्या खुर्चीवर बसून न्यायदानाची भूमिका घेणारे आदरणीय श्री.शिवाजीराव देशमुख यांना पुन्हा आपण सर्वांनी मिळून खुर्चीवर स्थानापन्न करावे व त्याच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करावी. अशी सभागृहातील सर्वच सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे. असे म्हणतात की झाले गेले गंगेला मिळाले. उद्या यासंदर्भातील चित्र स्पष्ट झाले तर सत्तेचे संकट गेले तरी पुरोगामी महाराष्ट्रावर वैचारिक संकट

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे...

आणून तुम्ही अन्याय व अत्याचार करीत आहात, आम्ही ढोंगी होतो, हे ढोंगीपण, आम्ही किती लाचार आहोत, किती बुरे आहोत, किती खुजे आहोत, हे फक्त सत्तेसाठी असे चित्र किमान महाराष्ट्रात येऊ देऊ नका. आम्ही सत्तेचा त्याग करु शकतो. फुले, शाहू, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारासाठी आणि या महाराष्ट्रासाठी आम्ही सत्तेचा देखील त्याग करु शकतो. शरद पवार यांचे नेतृत्व देशाला व महाराष्ट्राला लाभले आहे, आम्ही सत्तेचा त्याग करु शकतो, सत्तेशिवाय राहू शकतो, पण सन्मानाशिवाय व स्वाभिमानाशिवाय जगू शकत नाही. ही भूमिका आपण घेतली पाहिजे. मी अत्यंत सिरियस बोलत आहे, मला कोणाचीही बाजू घ्यावयाची नाही व कोणाला विरोध देखील करायचा नाही. अनेक सन्माननीय सदस्यांनी बोलतांना एकमेकांना टोमणे मारण्यात मला स्वारस्य नाही. माझ्या मनात जे आहे ते मी खुले आमपणे बोलतो. सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंग पंडित यांनी मी सांगू इच्छितो की, जे पोटात आहे तेच आमच्या ओठात असते, जे ओठात असते तेच आमच्या पोटात असते. आम्ही दुधारी किंवा दुहेरी भूमिका कधी घेत नाही. म्हणून फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा आम्ही चालवितो म्हणून आम्ही स्वतःला स्वाभिमानी समजतो. आपण देखील स्वाभिमानी आहात. या परिस्थितीत एका गोष्टीचा खुलासा झाला पाहिजे की, 40 सदस्यांचा पाठिंबा नसताना देखील आपण हिंमत कशी केली. याचे चित्र महाराष्ट्रासमोर गेले तर उद्याचा येणारा सूर्य आपणाला माफ करणार नाही, याची जाणीव आपण ठेवावी.

सभापती महोदय, मी पुन्हा विनंती करतो की, सभागृहाचे कामकाज नियमाप्रमाणे चालले पाहिजे, प्रत्येक सदस्यांना मत व्यक्त करण्याची संधी मिळाली पाहिजे. आपले सभागृह सर्वोच्च आहे, सार्वभौम आहे, या सभागृहाच्या सार्वभौमपणाला कोणत्याही प्रकारचा काळिमा लागणार नाही याची सर्व आम्ही सदस्यांनी दक्षता घेतली पाहिजे, ती दक्षता आपण सर्व सदस्य घेऊ या. या प्रस्तावाबाबत मला माझे मत मांडण्याची संधी दिली व माझे भाषण संपविण्याआधी मी एवढीच विनंती करतो की, अविश्वासाचा प्रस्ताव सभागृहात मांडण्यात आला आहे. माननीय श्री.शिवाजीराव देशमुख सभागृहाचे सभापती यांनी सभागृहाचा विश्वास न गमविता देखील अविश्वासाचा प्रस्ताव त्यांच्यावर आणला त्याबाबत मी तीव्र निषेध व्यक्त करतो व माझे भाषण संपवितो. जयभिम.

-------------

...3...

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, जो अविश्वासाचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे, त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. या सभागृहाचे कामकाज नियमानुसार चालते. नियमाचा दाखला येथे देण्यात आला आहे. नियमाने कामकाज कसे चालावे यासाठी कामकाज सल्लागार समिती आहे. ही समिती ठरविते की, कोणते कामकाज करायचे आहे. विधानसभेत 288 सदस्य आहेत व विधानपरिषदेत 78 सदस्य आहेत, 365 दिवस सभागृह चालले तरी कोणालाही बोलता येणार नाही, कारण त्याचे देखील काही नियम आहेत. नियमाची एकच बाजू या ठिकाणी मांडण्यात आली आहे. मला बोलण्याची संधी मिळाली नाही तेव्हा मी देखील अनेक वेळा सभापतींच्या आसनावर आक्षेप घेतला किंवा तक्रार केली होती. आम्हाला कधी बोलायला मिळणार, मी कामकाज सल्लागार समितीत नाही. सभापती महोदयांनी असे निर्देश दिले होते की, कामकाज सल्लागार समितीने कामकाज ठरविले आहे, त्याप्रमाणे आपणाला कामकाज करावे लागेल. अविश्वास प्रस्तावावर जी चर्चा चालू आहे, ती कामकाज सल्लागार समितीपुरती सीमित न राहता सर्व गट नेत्यांना बोलविण्यात आले होते. गट नेते आणि कामकाज सल्लागार समितीचे सदस्य अशी संयुक्तरित्या बैठक पहिल्यांदा इतिहासात झाली असेल. गटनेते आणि कामकाज सल्लागार समितीचे सदस्य अशी बैठक यापूर्वी कधीची झालेली नाही असे मला वाटते. सन्माननीय सदस्यांनी काही दाखले दिलेत तशी परिस्थिती नाही. विधिमंडळ सचिवांनी सभापतींना सांगायला पाहिजे होते व सभापती महोदयांकडून आम्हाला असा निर्णय पाहिजे होता की, मी नम्रपणे सांगतो की, हे कामकाज सल्लागार समिती नियमाप्रमाणे गठीत झालेली आहे. सर्वच सदस्य या प्रस्तावावर बोलले तर आठ ते दहा दिवस बोलले तरी हा विषय पूर्ण होऊ शकणार नाही. मी नम्र पणे सांगतो की, माननीय सभापती यांच्यावर तिसऱ्यांदा अविश्वास प्रस्ताव आलेला आहे. सभागृहाच्या इतिहासात सभापती यांच्यावर तीन वेळा अविश्वास प्रस्ताव येण्याची ही या सभागृहात पहिलीच वेळ आहे.

या नंतर श्री.बोरले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील.........

सभापती महोदय, हा ठराव तीन वेळा या सभागृहात येणे हे देखील आम्हाला क्लेशदायक होत आहे. मी या प्रस्तावावर बोलणार नाही, असे म्हणत होतो. मी या प्रस्तावावर मर्यादित बोलणार आहे. सभापती महोदय, मी आपल्या आसनाकडे बघून, आपल्या आसनाचा आदर ठेऊन या संदर्भात बोलू शकत नाही. आम्ही देखील सभागृहात काम केलेले आहे. मी माझ्या 14 वर्षाच्या काळात या ठिकाणी अशा पद्धतीचे कामकाज पहिल्यांदा बघितले.

सभापती महोदय, मी दोन-तीन उतारे देऊ इच्छितो. आम्ही माननीय श्री.फरांदे सरांचे कामकाज देखील बघितले आणि पत्रकार गॅलरीत बसून माननीय श्री.जयंतराव टिळक साहेबांचे कामकाज देखील बघितलेले आहे. माननीय श्री.फरांदे सर आणि माननीय श्री.जयंतराव टिळक साहेबांनी एकाही सदस्याला कधी निलंबित केले नाही. माननीय श्री.रावते साहेब, तुम्हाला समर्थन देणारा मीच सदस्य आहे, मी येथेच बसलो होतो. माननीय श्री.फरांदे सरांनी कधीही कोणाला निलंबित केले नाही. आपण रेकॉर्ड तपासून बघावे. मी चुकत असेल तर माझे शब्द मी मागे घेईन. माननीय श्री.टिळक साहेबांचा तर प्रश्नच नाही. त्यांचे वेगळ्या तऱ्हेचे कामकाज होते. त्यांनी केलेल्या कामाची सभागृहाच्या कामकाजात ऐतिहासिक नोंद आहे. आम्ही सभागृहाच्या गॅलरीत बसून तशा पद्धतीचे कामकाज बघितले आहे आणि आता काय चालले आहे ? आम्ही बघितले की, दादा सभागृहाच्या गॅलरीत बसले होते. आता ते गॅलरीत नाहीत. (...अडथळा....) नाही, कामकाजाची शिफारस केलेली असते आणि निर्णय देण्याचे काम माननीय सभापतींनी करावयाचे आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी जे सांगितले ती गोष्ट खरी आहे. विरोधी पक्षनेता मेजॉरिटीने ठरविला गेला पाहिजे. खालच्या सभागृहाबद्दल मी बोलणार नाही. तो माझा अधिकार नाही. या सभागृहात त्या विषयी बोलता येत नाही. (...अडथळा...) सोयी प्रमाणे कसे ? सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे साहेब, खालच्या सभागृहात माननीय अध्यक्षांनी दिलेल्या निर्णयावर आपण येथे भाष्य केले तर तो माननीय अध्यक्षांचा अवमान होतो. या सभागृहात

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील.........

बोलण्यासाठी संकेत नाहीत. सभापती महोदय, मी नम्रपणे सांगू इच्छितो की, या ठिकाणी मेजॉरिटी असताना विरोधी पक्ष नेता जाहीर करण्याबाबत बोलणारा मी एकटाच सदस्य होतो. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील साहेब, माझी भूमिका बदललेली नाही. मी त्यावेळी देखील बोललो होतो की, प्रथम या सभागृहाचा विरोधी पक्ष नेता जाहीर करावा. या सभागृहात पहिल्यांदा असा इतिहास घडतो की, विरोधी पक्ष नेता नसताना हे सभागृह सुरु होते. विधानपरिषद स्थापन झाल्यापासून इतिहासात प्रथमच असे घडत आहे, असे मत मांडणारा मीच होतो. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या सदस्यांनी आपले मत मांडण्यापूर्वी मी हे सांगितले होते. (...अडथळा....) मी त्याचे समर्थन करीत नाही. मी माझ्या भूमिकेशी ठाम आहे. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे साहेब, मी बरोबर सांगतो. ज्यावेळी तुम्हाला समर्थन पाहिजे होते आणि तुम्ही त्यावेळी आले होते, हे आपण सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे साहेबांना विचारावे. त्यांनी भोगलेले आहे. आपण त्या विषयी बोलू नका आणि मला बोलायला लावू नका. मी नम्रपणे बोलतो. मी व्यक्तिगत बोलणार नाही. (...अडथळा....) कोणी कितीही आग लावली तरी जयंत पाटील, जयंत पाटीलच राहणार आहे, हे लक्षात ठेवावे. मी नम्रपणे सांगतो की, आक्षेप कशासाठी, अविश्वासाचा ठराव कशासाठी ? आक्षेप हाच आहे की, विरोधी पक्ष नेते पदासाठी मेजॉरिटी असताना देखील खालच्या सभागृहात आमचा विरोधी पक्ष नेता डिक्लेअर झाला नाही म्हणून आम्ही वरच्या सभागृहाच्या विरोधी पक्ष नेत्याचे नाव डिक्लेअर करीत नाही, असे सांगितले जाते. (...अडथळा....) ठराव दाखल झाल्यानंतर ते केले. हा ठराव दाखल होऊन तो टेबल केल्यानंतर त्याची देखील येथे चर्चा होऊ शकत नाही. मला कळले नाही की, त्या संबंधी हा ठराव होऊ शकत नाही.....

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ ऑर्डर आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी विरोधी पक्षनेत्याच्या निवडीच्या संदर्भात उल्लेख केला. सभागृहाला माहीत आहे की, सर्व घटना का घडल्या आणि हे देखील माहीत आहे की, सर्व सन्माननीय म्हणत असताना देखील माननीय सभापती, श्री.शिवाजीराव देशमुख साहेबांनी सर्वांना सांगितले की, मी



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे.........

आता विरोधी पक्ष नेता जाहीर करतो. मी आता कोणाचेही ऐकणार नाही, अशी भूमिका माननीय सभापती श्री.शिवाजीराव देशमुख साहेबांनी घेतली आणि खालच्या सभागृहाचा विरोधी पक्षनेता जाहीर होण्यापूर्वी त्यांनी या सभागृहात ही भूमिका घेतली.

श्री.सुनील तटकरे (बसून) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे सभागृहाला असत्य माहिती देत आहेत.

श्री.माणिकराव ठाकरे : आपण रेकॉर्ड तपासून बघावे. माननीय सभापती श्री.शिवाजीराव देशमुख साहेबांनी अगोदरच्या दिवशी ही भूमिका घेतली.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, हे सभागृहाच्या रेकॉर्डवर आहे. आपण रेकॉर्ड काढून बघावे. मी तो पर्यंत माझे भाषण थांबवितो. तारीख आहे, आपण रेकॉर्ड बघावे. (...अडथळा....) मी काय म्हणतो, कोठेही झाले तरी हे सभागृह स्वतंत्र आहे. आम्ही निर्णय घेण्यासाठी स्वतंत्र आहोत. आपण नेहमी या आसनावरुन सांगितले की, विधानसभेत काय झाले, याची मला माहिती नाही. आपले सभागृह स्वतंत्र आहे, असे अनेक वेळा रुलिंग दिलेले आहे. असे नाही की, एवढ्यापुरतेच रुलिंग दिलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे साहेब, या प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी आम्हाला आनंद वाटतो काय ? आम्हाला क्लेश होतो, वाईट वाटते की, या पदावर असलेल्या व्यक्तीवर कामकाजाच्या संदर्भात आरोप करताना आमच्या मनाला वेदना होतात. सभागृहात या पद्धतीने चर्चा होते, याच्या आम्हाला वेदना होतात.

सभापती महोदय, मी नम्रपणे सांगू इच्छितो की, श्री.रावते साहेब सभागृहात कोणताही शब्द बोलले नव्हते. कोण बोलले होते, हे मी आता बोलत नाही ? परंतु, माननीय श्री.रावते साहेब सदस्य म्हणून बोलताना नेहमी प्रखरपणे आपले विचार मांडत असत. मला असे वाटते की, आता मंत्री झाल्यानंतर उत्तर देताना त्यांच्यावर बऱ्याच मर्यादा आलेल्या आहेत. परंतु त्यांना ज्यावेळी निलंबित करण्यात आले....

प्रा.जनार्दन चांदूरकर : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ ऑर्डर आहे. सभागृहासमोर जो प्रस्ताव आलेला आहे तो माननीय सभापतींनी सभागृहाचा विश्वास गमावलेला आहे, असा आहे. मी मघाशी स्पेसिफिक चार्जेस संबंधी बोलत असताना आपण मला बोलू दिले नाही. आता हे

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जनार्दन चांदूरकर.........

स्पेसिफिक चार्जेस करीत आहेत. त्यांनी पहिला चार्ज केला की, विरोधी पक्षाच्या नेत्याची निवड योग्य वेळी केली नाही. आता त्यांनी दुसरा चार्ज असा केला की, त्यांनी श्री.रावते साहेबांना सस्पेंड केले. हे जर स्पेसिफिक चार्जेस असतील तर आपणास माझी विनंती आहे की, माननीय सभापती महोदयांवरील हे स्पेसिफिक चार्जेस आपण चर्चेला घ्यावेत. नाही तर त्यांचे हे म्हणणे सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकावे.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आपण निर्णय द्यावा. मी माझे शब्द मागे घेतो.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, ज्यावेळी ही चर्चा सुरु झाली त्यावेळी सांगण्यात आले की, कारणे सांगावीत. आता ज्यावेळी कारणे सांगितली जातात त्यावेळी ते सांगतात की, कारणांच्या बाबतीत आणखी वेगळी चर्चा करावी. सभापती महोदय, हे काय चालले आहे ? हा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे काय ? सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील साहेब बोलत आहेत, आपण त्यांना संरक्षण दिले पाहिजे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी आरोप केले काय ? मी घडलेली वस्तुस्थिती सांगितलेली आहे ? मी काही वेगळे सांगितले नाही. सभापती महोदय, ज्यावेळी माननीय श्री.रावते साहेबांना या सभागृहात येता येत नव्हते त्यावेळी त्यांच्या डोळ्यातून पाणी आले. ते मला म्हणाले की, जयंतराव, हे काय आहे ? ते मला अरे, तूरे बोलतात. ते मला म्हणाले की, मला आयुष्यात हे देखील भोगावे लागले, मी काय चूक केली....

प्रा.जनार्दन चांदूरकर : सभापती महोदय, एखाद्या सदस्याला निलंबित करावयाचे असेल तर त्यासाठी सभागृहाचा कन्सेंट लागतो. How can you, Mr.Chairman, do it ? त्यामुळे हे सर्व असंविधानिक चालले आहे, हे सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकावे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, इतरांनी देखील आपापल्या परीने कारणमीमांसा केलेली आहे. त्यांना जसा कारणमीमांसा करण्याचा अधिकार आहे तसा यांना देखील अधिकार आहे. कृपया त्यांना बोलू द्यावे.

यानंतर श्री.भोगले........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील : सन्माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते यांच्या निलंबनाचा ठराव मांडण्यात आला त्यावेळी मी आक्षेप घेतला होता. त्या ठरावावर चर्चा झाली नाही आणि तो आवाजी मतदानाने मंजूर झाला हे मी सभागृहाच्या माहितीसाठी सांगू इच्छितो.

सभापती महोदय, हे प्रसंग या सभागृहात घडलेले आहेत. माननीय मंत्री श्री.विनोद तावडे यांनाही दोन वेळा निलंबित करण्यात आले होते. माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते यांना मी ओळखतो. ते कधीही खोटे बोलणार नाहीत. मी असे वर्तन केले नसताना, मी बोललो नसताना मला निलंबित केले गेले त्याचे वाईट वाटते असे ते म्हणाले. आम्ही विनंती केली होती की, माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते आक्षेपार्ह बोललेले नाहीत, तरी त्यांच्या निलंबनाचा ठराव मांडण्यात आला. असा ठराव पहिल्यांदाच मांडण्यात आलेला नाही. तेव्हा कोणी काही बोलले नाही.

सभापती महोदय, आम्ही विनंती केली होती की, ठराव मागे घ्यावा. या सर्वोच्च सभागृहात अशा पध्दतीची चर्चा होऊ नये असे आम्ही सांगितले होते. आम्ही माननीय सभापतींच्या दालनात गेलो. त्यांचे निलंबन रद्द करा अशी विनंती केली होती तरी सभापती सभागृहात आले नाहीत. हा निर्णय एका व्यक्तीपुरता नाही. दुसरी एक आठवण मी सांगू इच्छितो. सभागृहाच्या रेकॉर्डवर आलेले आहे. सभापतींचे आसन हे कोणत्याही पक्षाचे नाही. जी व्यक्ती त्या आसनावर आरुढ होते ती त्यावेळी कोणत्याही पक्षाची नसते. जर पक्षाच्या वर्किंग कमिटीचे सदस्य स्वीकारले तर त्यांनी ताबडतोब त्या आसनावरुन बाजूला व्हायचे असते. ज्यावेळी सन्माननीय सभापती यांनी कॉंग्रेस (आय) पक्षाच्या सेंट्रल वर्किंग कमिटीचे सभासदत्व स्वीकारले आणि तसे जाहीर झाले त्यावेळी औचित्याच्या मुद्याद्वारे मी आक्षेप घेतला होता. माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते यांनी माझ्या मुद्याबाबत समर्थन दिले होते. या सर्वोच्च आसनावर बसलेली व्यक्ती ही कोणत्याही पक्षाची पदाधिकारी असू शकत नाही, हा आक्षेप मी त्यावेळी घेतला होता. माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते यांची भूमिका आज का बदलली हे मला कळले नाही. जयंत पाटलांची भूमिका त्यावेळी ठाम होती आणि आजही ठाम आहे.

सभापती महोदय, त्यावेळी मी एक उदाहरण दिले होते. 1952 ते 57 या काळात श्री.नानासाहेब कुंटे हे विधानसभेचे अध्यक्ष होते. ते आमच्या अलिबाग मतदारसंघाचे आमदार

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील....

होते. माझ्या आजोबांच्या विरोधात त्यांनी निवडणूक लढविली होती आणि 1600 मतांनी विजय संपादन केला होता. स्व.चिंतामणराव देशमुख हे रायगड लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार होते. त्यावेळी आमचा जन्मही झाला नव्हता. चिंतामणराव देशमुख यांच्यामुळे रायगडमधील सर्व जागांवर काँग्रेस पक्षाचे उमेदवार निवडून आले. रायगड जिल्हयामध्ये शेतकरी कामगार पक्षाचा पराभव झाला. 1955 साली काँग्रेस कमिटीची बैठक होती. मोरारजी देसाई हे राज्याचे मुख्यमंत्री होते. त्यांनी नानासाहेब कुंटे यांना सांगितले की, तुम्ही पक्षाच्या बैठकीला या. तुम्हाला माझा आदेश आहे. नानासाहेब कुंटे यांनी तिथल्या तिथे सांगितले की, आता माझा कोणताही पक्ष नाही. मी तुमच्यापेक्षा मोठा आहे. मी विधानसभेचा अध्यक्ष आहे. तुम्ही माझ्या हाताखाली काम करता. तुमचे काही काम असेल तर माझ्या बंगल्यावर या. तेथे चर्चा करू. मी तुमच्याकडे येणार नाही.

सभापती महोदय, ही या सभागृहाची उच्च परंपरा आहे. 1957 मध्ये नानासाहेब कुंटे यांना विधानसभेचे तिकीट मिळाले नाही. मोरारजी देसाई यांनी यमूताई भिडे यांना तिकीट दिले. मोरारजी देसाई यांनी नानासाहेब कुंटे यांचे तिकीट कापले. ही या राज्याची परंपरा आहे. अनेक दाखले या ठिकाणी देता येतील. अनेक माननीय सदस्य लॉबीमध्ये खाजगीत काय बोलतात हे मी या ठिकाणी सांगू शकत नाही. परंतु जयंत पाटील स्पष्टपणे बोलतो. मी माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे हे राज्याचे मंत्री असताना त्यांच्याकडे कोणतेही काम घेऊन गेलो नाही. या ठिकाणी दोन वेळेला ठराव आलेले आहेत, त्याचीही कारणे कळली पाहिजेत.

सभापती महोदय, आम्ही आपल्याला विनंती केली, माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनाही विनंती केली, परंतु त्यांनी ऐकले नाही. या सभागृहात या विषयावर चर्चा होऊ नये अशी आमची इच्छा होती. कामकाजाबाबत माझे वेगवेगळ्या प्रकारचे आक्षेप होते, त्याची मी चर्चा करु इच्छित नाही. या ठिकाणी स्पष्ट बोलले पाहिजे. या सभागृहात खाजगीमध्ये माननीय सदस्य काय बोलतात, कशा प्रकारे बोलतात हे मी सांगू इच्छित नाही. मी त्यांना तसा शब्द दिलेला आहे. मी नागपूरच्या हिवाळी अधिवेशनापासून आक्षेप घेत होतो. त्यावेळी माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे सभागृहात उपस्थित होते की नाही याची मला माहिती नाही. त्यांची इच्छा होती की, या सभागृहाचा विरोधी पक्षनेता हा काँग्रेस पक्षाचा असावा.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, हा त्यावेळचा विषय होता व तो एका मर्यादेपर्यंत होता याची सर्वांना माहिती आहे. विरोधी पक्षनेता कॉंग्रेस पक्षाचा असावा अशी माझी इच्छा होती असे माननीय सदस्यांनी म्हटले ते चुकीचे आहे.

नंतर डब्ल्यू.1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांचे म्हणणे रेकॉर्डवरून काढून टाकावे. येथे चुकीचे रेकॉर्ड होत आहे. त्यांनी स्वत:हून मागणी केली होती. ते रेकॉर्डवरून काढले पाहिजे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मी कुठल्या आधारावर मागणी केली होती हे स्पष्ट आहे. त्यावेळी मी माझी बाजू सदनामध्ये स्पष्टपणे मांडली होती.

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी मागणी केली होती की नाही हा मुद्दा आहे. ती मागणी कुठल्या परिस्थितीत केली होती हा मुद्दा गौण आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मागणी कुठल्या परिस्थितीत केली होती हे मला माहीत आहे. मला विरोधी पक्ष नेता पद मिळावे अशी माझ्या नावाने मी कधीही मागणी केली नव्हती.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय,...

**उप सभापती :** मी सन्माननीय मंत्री श्री.विनोदजी तावडे यांना सांगू इच्छितो की, आपण आपले काम चोख केलेले आहे. मी पुन्हा सभागृहाला आठवण करून देणे उचित होणार नाही. लंकेला आग एकदाच लावायची असते. सारखी सारखी आग लावायची नसते.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, दूरदृष्टी ठेवून मागणी केली असेल तर त्यांचे कौतुक करायचे की, त्यांच्यावर अन्याय झाला असे म्हणायचे ?

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी नम्रपणे सांगू इच्छितो की, खालून इशारा आला की, आपण निर्णय देतात अशा प्रकारचा आक्षेप सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी आपल्यावर घेतला होता. सन्माननीय सदस्य श्री.सुनीलजी तटकरे यांनी खालून इशारा केला की, आपण निर्णय देतात हे ते सकाळी बोलले आहेत. त्यांचे हे म्हणणे आक्षेपार्ह नाही काय ? मघाशी आपण पीठासीन अधिकारी या नात्याने मला बोलू दिले नाही. त्यासंबंधी मी आक्षेप घेतला होता.

**उप सभापती :** मी आपणास सांगू इच्छितो की, खालून दिलेल्या इशाऱ्याकडे मी लक्ष देत नसतो.

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी तेच सांगतो आहे. आपले इशारे कसे असतात हे मला माहीत आहे ना. आपण मला आपले इशारे कसे असतात हे खासगीत सांगितले आहे. येथे सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे काय बोलले आहेत ते विसरले आहेत.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, वारंवार माझ्या नावाचा उल्लेख येथे करण्यात येत आहे. त्यावेळचे माझे म्हणणे रेकॉर्डवर असेल तर आपण काढून पहावे. मी सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांचे नाव घेऊन बोललो होतो हे मी मान्य करतो. माननीय मुख्यमंत्र्यांनी उठून भाषणाला सुरूवात करावी अशा प्रकारचे ते इशारे होते. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांना बोलू न द्यावे अशा प्रकारचा त्यांचा इशारा होता.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, त्याला देखील माझा आक्षेप आहे. माननीय मुख्यमंत्री हे या सदनाचे नेते आहेत. त्यांचे स्थान निश्चितच श्रेष्ठ आहे. माननीय सभापती या सदनाचे प्रमुख आहेत तसेच माननीय मुख्यमंत्री देखील या राज्याचे प्रमुख आहेत. माननीय सभापतींबद्दल आपण कधीच काही बोलत नाही. हे संकेत आहेत. त्याला देखील माझा आक्षेप होता. कारण पीठासीन अधिकारी या नात्याने आपण माझ्याकडे बघतच नव्हता. आता आपण सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांच्याकडे बघत आहात. त्यावेळी आपण माझ्याकडे बघत नव्हता.

श्री.दिवाकर रावते (बसून) : येथे आठवणीतील सभापती हा विषय चर्चेला नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते यांनी कुठलाही इन्कार केला नसल्यामुळे मी त्यांना धन्यवाद देतो. याला श्री.दिवाकर रावते म्हणतात. माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते हे कधीच सोयीप्रमाणे बदलत नाही म्हणून ते श्री.दिवाकर रावते आहेत. सोयीप्रमाणे बदलण्याचे कोण काम करते हे मला माहीत नाही.

मी येथे जास्त काही बोलणार नाही. आजचा दिवस काळाकुट्ट दिवस आहे असे मी म्हणणार नाही. तसे म्हणण्याचे माझे धैर्य होत नाही. पण संसदीय कामकाजामधील क्लेशदायक दिवस आहे असे मी नक्की म्हणेन. याने मला आनंद वाटतो अशातील देखील भाग नाही. मला चांगले वाटते

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील...

म्हणून बोलतो आहे अशातला देखील भाग नाही. मी नम्रपणे सांगू इच्छितो की, राजकारणामध्ये वयाची मर्यादा नसते. येथे माननीय मंत्री श्री.रामदास कदम यांचे मत का बदलले हे मला काही कळलेले नाही.

श्री.गिरीश बापट (बसून) : त्यांनाच कळले नाही तर आपणाला काय समजणार ?

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य सर्वश्री कपिल पाटील आणि जोगेंद्र कवाडे यांना नम्रपणे सांगू इच्छितो की, यामध्ये कुठलाही जातीयवाद किंवा धार्मिक वाद नाही. संसदीय कामकाज पद्धतीची अवहेलना हा खरा यात मुद्दा आहे. मी राजकीय निरीक्षक नाही. तरी देखील राष्ट्रवादी पक्ष सत्तेत जाईल असे मला वाटत नाही. असे असते तर श्री.शरद पवार साहेब हे एका झटक्यात केंद्र सरकारमध्ये गेले असते.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी एक चुकीची गोष्ट सांगितली आहे. तत्कालीन माननीय सभापती प्रा.ना.स.फरांदे यांना श्री.शरद पवार यांनी सपोर्ट केला होता. राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस आणि पुरोगामी पक्ष यांची मिळून एक समन्वय समिती होती. या समन्वय समितीमध्ये देखील चर्चा झाली होती. त्यावेळी समन्वय समितीमध्ये श्री.शरद पवार यांनी प्रा.ना.स.फरांदे यांना काढता कामा नये असे श्री.विलासराव देशमुख यांना सांगितले होते. माझा त्याला विरोधी राहील असे देखील त्यांनी सांगितले होते. हा इतिहास आहे. मी चुकीचे कशाला सांगू. मी त्या समितीचा सदस्य होतो. त्या समितीमध्ये श्री.माणिकराव ठाकरे आपण नव्हता. त्या समन्वय समितीमध्ये मी स्वतः होतो, प्रा.एन.डी.पाटील होते. प्रा.ना.स.फरांदे यांनी दिलेले निर्णय ऐतिहासिक आहेत. माननीय श्री.नितीन गडकरी स्वतः माझ्याकडे यायचे आणि सांगायचे की, प्रा.फरांदे सरांना आपण सांगावे. आता येथे सन्माननीय परिवहन मंत्री श्री.दिवाकर रावते देखील बसले आहेत. प्रा.फरांदे सरांनी शिवसेना आणि बीजेपीच्या विरोधात अनेक निर्णय दिले आहेत. ते म्हणायचे की, मी या खुर्चीवर कुठल्या एका पक्षाचा म्हणून बसलेलो नाही. मी कुणाचेही ऐकणार नाही.

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील...

यासंबंधी आम्ही अनेक वेळा चर्चा देखील केली आहे. याबाबत माननीय परिवहन मंत्री श्री.रावते साहेबांनी नाही म्हणून सांगावे. येथे चुकीचे रेकॉर्डवर राहू नये म्हणून मी हे बोलत आहे. माननीय श्री.शरद पवार यांनी प्रा.ना.स.फरांदे यांना माननीय सभापती या पदावर ठेवावे असा निर्णय घेतला होता. पण तो श्री.विलासराव देशमुख यांनी मानला नाही. श्री.विलासराव देशमुख हे चांगले गृहस्थ होते. काँग्रेस प्रेम कसे व्यक्त करावे हे सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांच्याकडून शिकावे. नसेल तर ते करावे.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, आमचे सन्माननीय मित्र श्री.जयंत पाटील यांनी सांगितले की, प्रा.ना.स.फरांदे यांना सभापती या पदावर राहू द्यावे, त्यांना हटवू नका असे देशाचे नेते माननीय श्री.शरद पवार म्हणाले होते. आता माननीय सभापती श्री.शिवाजीराव देशमुख यांना काढावे असे श्री.शरद पवार साहेब म्हणाले आहेत काय ?

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मला कोणीही काहीही सांगितलेले नाही. श्री.शरद पवार साहेबांचा प्रश्नच नाही. एवढेच नव्हे तर सन्माननीय सदस्य श्री.अजित पवार यांनी सत्र कालावधीत मला फोन करून देखील काहीच सांगितलेले नाही. माझ्या सद्सद्विवेकबुद्धीला जे पटले ते मी सांगतो आहे. मी सुरूवातीला सांगितले आहे की, यासंबंधी माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते आणि माननीय मंत्री श्री.गिरीश बापट यांच्याशी चर्चा केलेली आहे. यात देखील वेगवेगळे निर्णय झालेले आहेत. त्यावर बोलावयाचे म्हटले तर अजून दोन तास जातील.

श्री.गिरीश बापट (बसून) : आपल्या चर्चेमुळेच आमचे परिवर्तन झाले.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री श्री.गिरीश बापट यांना देखील काही गोष्टी माहीत नव्हत्या. ज्यावेळेला तत्कालीन ज्येष्ठ सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांचे आसन रिक्त झाले त्यावेळेला माननीय सभापतींच्या दालनात अजितदादांनी मला भेटीसाठी बोलाविले व आपण ज्येष्ठ सदस्य आहात, सभागृहात ज्येष्ठतेप्रमाणे या जागेवर बसावे असे त्यांनी सांगितले. त्याप्रमाणे माननीय सभापतींच्या निर्णयाप्रमाणे हे आसन मला मिळाले. मी माननीय श्री.शरद पवार साहेबांना भेटलो व निर्णय घेतला आणि हा विरोधातला निर्णय घेतला हे म्हणणे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील....

बरोबर नाही. माननीय सभापतींच्या ठरावाच्याबाबत माझी भूमिका बदलली हे वक्तव्य अन्यायकारक आहे. या विषयावर चर्चा होऊ नये असे कामकाज सल्लागार समितीमध्ये माझे मत मांडले. परंतु, सन्माननीय सदस्य सर्वश्री माणिकराव ठाकरे व संजय दत्त यांचा आग्रह चर्चा होण्याचा व मतदान झालेच पाहिजे असा होता. त्यावर मी सांगितले की, मतदान झाल्याने काही फरक पडणार नाही.

यानंतर श्री.जुन्नरे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील.........

तत्वाच्या विचाराच्या गोष्टी माननीय माणिकराव ठाकरे यांनी करु नयेत. लोकसभेत वाजपेयींचे सरकार रामशेठ ठाकूर यांच्या एका मताने पडले होते. आम्ही तत्वाला जागतो.

सभापती महोदय, या अविश्वासाच्या प्रस्तावावर मतदान काय होणार आहे हे स्पष्ट झालेले आहे. त्यामुळे आवाजी मतदानाने हा प्रस्ताव पास करावा अशी मी सभागृहाला विनंती करतो.

श्री. शरद रणपिसे : माझा हरकतीचा मुद्दा आहे. या प्रस्तावावर मतदान होणे आवश्यक असून ती घटनात्मक बाब आहे.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सभागृहाचे वातावरण खेळीमेळीचे रहावे, माननीय सभापती श्री. शिवाजीराव देशमुख यांचा सन्मान राखला जावा अशी विनंती मी करु इच्छितो. माननीय श्री. तटकरे साहेबांनी या प्रस्तावावर जास्त कटू विचार मांडू नये, अशी मी विनंती करतो. या सभागृहात अनेक वेळा आवाजी मताने मतदान झाले आहे. या ठिकाणी माननीय श्री. रावते साहेब व माननीय श्री. तावडे साहेब यांच्यासंदर्भात त्यावेळी जे निर्णय झाले होते त्यावेळी आम्ही माननीय सभापतींविरुध्द अविश्वासाचा ठराव आणला होता, तेव्हा हा ठराव मागे घ्यावा हे सांगण्यासाठी माननीय दादाच आमच्याकडे आले होते. आजचा अविश्वासाचा प्रस्ताव आवाजी मतदानाने संमत करावा अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.
धन्यवाद.

-----

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे (विधानसभेने निवडलेले) : उप सभापती महोदय, सर्वश्री अमरसिंह पंडित तसेच इतर सन्माननीय सदस्यांनी भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 183 (ग) व म.वि.प.नियम 11 अन्वये जो प्रस्ताव मांडला त्यावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, या चर्चेच्या संदर्भात आपण जेव्हा आदेश दिला त्यावेळेला आमच्या पक्षाचे गट प्रमुख श्री. माणिकराव ठाकरे विचार मांडण्यासाठी उभे राहिले होते. माननीय श्री. ठाकरे साहेबांनी त्यावेळेस माननीय श्री. चांदूरकर साहेबांना बोलू द्यावे अशी आपल्याला विनंती केली होती. परंतु आपण माननीय श्री.चांदूरकर साहेबांना बोलू दिले नाही. "आमच्या बीएसीमध्ये जे ठरले होते ते तसेच्या तसेच होईल." अशा प्रकारचे वक्तव्य आपण केले होते.

**उप सभापती :** आपण पश्चात बुध्दीने जे बोलत आहात ते मला मान्य नाही आणि ते मी ऐकून घ्यावे असे माझ्यावर बंधन नाही. मी जे बोललो ते बोललो. या चर्चेमध्ये गटनेत्याच्या पलीकडे कोणालाही बोलता येणार नाही हे बीएसीमध्ये ठरले होते व त्या प्रमाणे मी प्रत्येक गटनेत्यांना बोलण्याची संधी दिली आहे. आता या प्रस्तावाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. तटकरे साहेब बोलतील व त्यानंतर माननीय श्री. शिवाजीराव देशमुख आपले विचार मांडतील.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित यांनी अविश्वासाचा प्रस्ताव मांडलेला आहे. या सभागृहातील आमचे ज्येष्ठ सदस्य, ज्यांनी आमचा वारंवार मित्र पक्ष म्हणून उल्लेख केला ते आमच्या मित्र पक्षाचे सदस्य, काँग्रेस पक्षाचे माजी प्रदेशाध्यक्ष श्री. माणिकराव ठाकरे. प्रदेशाध्यक्ष पद गेल्यापासून अस्वस्थ असलेले सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे, त्याच प्रमाणे शिवसेनेचे नेते....

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष श्री. सुनील तटकरे यांनी उल्लेख केला की, माणिकरावांचे अध्यक्षपद गेल्यामुळे ते अस्वस्थ झाले आहेत. मी सन्माननीय सदस्य श्री. सुनील तटकरे यांना सांगू इच्छितो की, राष्ट्रवादी पक्षाचे सात अध्यक्ष झाले परंतु त्या काळात मी महाराष्ट्रात काँग्रेस पक्षाचा एकटा अध्यक्ष म्हणून राहिलो होतो. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. सुनील तटकरे यांनी माझ्या पक्षाला किंवा मला पावती देण्याची जरुरी नाही. ...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी त्यांच्या सात वर्षाच्या कालावधीचा उल्लेख केला आहे त्यामुळे यासंदर्भातील ऊहापोह मी माझ्या नंतरच्या भाषणात नक्कीच करणार आहे.

सभापती महोदय, आज काँग्रेस पक्षाबद्दल प्रेम व्यक्त करीत असलेले आमचे पर्यावरण खात्याचे माननीय मंत्री श्री. रामदास कदम यांच्या काँग्रेस पक्षाबद्दल ऊतू जाणाऱ्या प्रेमाच्या भावना ऐकल्या. पुरोगामी विचार म्हणून सतत बोलणारे आमचे मित्र.....

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, माननीय मंत्री श्री. रामदास कदम यांनी काँग्रेस पक्षाबद्दल नाही तर माननीय सभापती श्री. शिवाजीराव देशमुख यांच्या बद्दलच्या प्रेमाच्या भावना व्यक्त केल्या आहेत.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, पुरोगामी विचाराचा वसा आपल्याकडेच आहे असा सतत दावा करणारे परंतु शिक्षक मतदार संघातून आमची मदत मागणारे, माननीय अजित पवारांच्या पायाला हात लावणारे सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांचेही विचार मी या ठिकाणी ऐकले आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांना विधान परिषदेवर माननीय श्री. शरद पवार साहेबांनी नियुक्ती दिली होती. या अगोदर 1998 सालच्या लोकसभेच्या निवडणुकीमध्ये प्रा.कवाडे साहेबांना सर्वसाधारण जागेवरुन खासदार म्हणून निवडून आणण्यासाठी माननीय श्री.पवार साहेबांनी प्रचंड मेहनत घेतली होती, असे असताना या ठिकाणी आदरणीय प्रा.कवाडे साहेबांचे विचार ऐकल्यानंतर मला खूप काही शिकायला मिळाले. आजचे कामकाज हे बेकायदेशीर आहे असे आज सुरुवातीपासूनच सांगण्यात येत होते. घटनेच्या 183 कलमान्वये अविश्वासाचा हा प्रस्ताव दाखल झालेला आहे. महाराष्ट्र विधान परिषदेच्या कलम 11 अन्वये सदर प्रस्ताव सभागृहात ठेवला गेला. या विषयाच्या संदर्भात आक्षेप घेतले गेले. मंगळवारी हा प्रस्ताव या सदनात आला त्यावेळेस 10 सदस्यांनी उठून अनुमोदन देणे आवश्यक होते परंतु त्यावेळी माझ्या 24 सदस्यांनी अनुमोदन दिल्यामुळे हा प्रस्ताव आज विचारात घेण्यात आला आहे.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे.......

सभापती महोदय, या प्रस्तावाच्या संदर्भात ॲड. चांदूरकर साहेबांनी युक्तिवाद आणि बुद्धिवाद करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी हाच प्रयत्न दिल्ली दरबारी 15 दिवसापूर्वी केला असता तर त्यांना त्या पदावरुन जाण्याची वेळ आली नसती. दिल्लीतील युक्तिवादामध्ये ते थोडेसे तोकडे पडले. मी तेच म्हणतो आहे की, जेथे युक्तिवाद करावयास पाहिजे होतो तेथे केला नाही आणि जेथे करावयास नको तेथे केल्यामुळे त्याचा उपयोगच झाला नाही. त्यांचा आजचा युक्तिवाद हा कायद्याला धरुन नव्हताच. संविधानाच्या आधारे आलेला हा प्रस्ताव असंविधानिक आहे असे वकील असणाऱ्यांनी सांगणे आणि अकरावी पास असणाऱ्या माझ्या सारख्याने बोलणे हे सयुक्तिक नाही याची मला जाणीव आहे परंतु तरी सुध्दा सभागृहात संदेह राहू नये यासाठीच मी या ठिकाणी बोलण्याचा प्रयत्न करीत आहे. आदरणीय श्री. शिवाजीराव देशमुख यांच्याबद्दल मला कमालीचा आदर आहे. हा प्रस्ताव जेव्हा चर्चेला आला तेव्हा हा प्रस्ताव मताला टाकून माननीय सभापती महोदयांच्या या विषयाच्या संदर्भातील ज्या काही भावना असतील त्या त्यांना व्यक्त करु द्याव्यात व सभागृहातील कटुता टाळावी असे आमचे मत होते. परंतु आमचे सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त साहेबांना त्यावेळेस काय स्फुरण चढले होते ते माहिती नाही, त्यांनी त्यावेळेस मोठया प्रमाणात उचल खाल्ली.

यानंतर श्री. अजित.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे....

माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते हे सातत्याने रागावत असतात, पण त्या दिवशी ते शांत होते. त्यांनी सांगितले की, आपण सभागृहातील कटुता टाळू या. पण त्यावेळी देखील श्री.रामदास कदम यांना पटले नाही. श्री.रामदास कदम हे खरोखर भूमिका बजावतात का, की. श्री.दिवाकर रावते साहेब पक्षाची ठरलेली भूमिका बजावतात, हे पाहण्यासाठी गॅलरीमध्ये उद्धवजींचे दूत आल्याचे मला पहावयास मिळाले. मी त्याबद्दल भाष्य करु इच्छित नाही. पण महत्वाचा मुद्दा असा की, आपणास ही वेळ सुद्धा टाळता आली असती. आपण डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानानुसार काम करतो. ज्या पक्षाचे बहुमत तो पक्ष सत्तेवर, ही संसदीय प्रणाली आपण सर्वांनी मिळून मान्य केलेली आहे. आपण एक लाख मतांनी निवडून आलात किंवा एक मताने निवडून आलात तरी या लोकशाहीमध्ये एक मताने निवडून आलेला देखील निर्वाचित होतो. या सदनामध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे 28 सदस्य आहेत. आपल्यापेक्षा जास्त सदस्य आहेत असे अनेक वेळा बोलले गेले. मग त्या पदावर चिकटून राहण्याचा अट्टाहास का धरला ? मी माननीय सभापतींना दोषी धरत नाही. आमचा पंढरीच्या विठ्ठलावर राग नाही. त्यांच्या भोवताली असलेल्या बडव्यांवर आमचा राग आहे. आमची या ठिकाणी हीच भूमिका आहे. श्री.शिवाजीराव देशमुख यांच्यावर आमचा राग नाही. पण त्यांना बदसल्ला देणारी ही माणसे होती, त्यांनी केवळ पक्षीय भूमिका दाखवली, ते सर्वांना ज्ञात आहे. आपणास देखील ते ज्ञात आहे. त्यांच्याबद्दलची स्पष्ट भूमिका महाराष्ट्रासमोर आली पाहिजे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.जोंगद्र कवाडे यांना आज दुष्काळाची आठवण झाली. शिक्षकांच्या प्रश्नाची आठवण झाली. पण लोकशाहीचे संवर्धन करण्याची जबाबदारी कोणावर आली, याचे आपणास भान राहिलेले नाही. आज आपण पुरोगामीपणाचा आव आणला. या ठिकाणी प्रा.ना.स.फरांदे यांच्या बाबतीत सांगितले गेले. मी नम्रपणे सांगू इच्छितो की, 1995 साली युतीचे सरकार आले, मी भारतीय जनता पक्षाची किंवा शिवसेना पक्षाची स्तुती करीत नाही. त्यावेळी श्री.जयंतराव टिळक सभापतीस्थानी होते. त्यांच्यावर देखील अविश्वासाचा प्रस्ताव त्यांनी आणलेला नाही. त्याची नोंद घेणे आवश्यक आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी सांगिततेली वस्तुस्थिती खरी आहे. या संसदीय लोकशाही प्रणालीचे महत्व टिकावे, शाहू-फुले-आंबेडकरांची विचारधारा अबाधित रहावी. या महाराष्ट्रामध्ये त्या आसनावर बसलेल्या प्रत्येक व्यक्तीचा सन्मान राखावा ही भूमिका आमचे राष्ट्रीय नेते आदरणीय श्री.शरद पवार साहेब यांनी सातत्याने धरली. 1999 मध्ये फारकत घेत राष्ट्रावादी काँग्रेस पक्षाची निर्मिती झाली. त्यावेळी शिवसेना व भाजपाने प्रच्छन्न टीका केली नाही. पण 1999 च्या विधानसभा आणि लोकसभेच्या निवडणुकीत प्रच्छन्न अशी टीका धर्मनिरपेक्ष विचाराच्या माध्यमातून श्री.शरद पवार यांच्यावर झाली. आम्हाला अपेक्षित असलेले यश मिळाले नाही. त्यावेळी महाराष्ट्रात आणि देशात निवडणुकीचे निकाल लागले. देशात वाजपेयी यांचे सरकार प्रस्थापित करण्याचा अगोदर तो निर्णय झाला. आम्हाला जर सत्तेची आस असती आणि आमच्या नेतृत्वाचे सत्ता हेच उद्दिष्ट असते तर त्यावेळी महाराष्ट्रात सत्तांतर झाल्याचे चित्र आपणास पहावयास मिळाले असते. परंतु कुणी या गप्पा माराव्यात, कुणी हे सांगावे ? कै.विलासराव देशमुख यांच्याबद्दल माझ्यासारख्या कार्यकर्त्याला कमालीचा आदर आहे. काही मंडळीनी इतिहास सांगण्याचा प्रयत्न केला. मी 1999 सालचा इतिहास सांगत आहे. त्यावेळी महाराष्ट्रात सत्तांतर झाले असते. तसे निरोप येत होते. परंतु श्री.पवार साहेबांनी स्पष्टपणाची भूमिका घेतली. 1985-86 पासून श्री.विलासराव देशमुख आणि माझे संबंध आहेत. श्री.विलासराव देशमुख विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे नेते झाले त्यावेळी त्यांनी पहिला फोन मला करुन सांगितले की, काँग्रेस पक्षाच्या विधिमंडळ नेते पदी माझी निवड झाली आहे. आपण सरकार बनविण्याचा प्रयत्न करु असे श्री.अजित पवार आणि साहेबांजवळ बोलता आले तर पहा. त्याचवेळी मी त्यांना सांगितले की, विलासरावजी, पवार साहेबांचा निर्णय ठाम आहे. या महाराष्ट्रात पुरोगामी विचार टिकला जाणार आहे. कोणी 1978 सालचे उदाहरण देत असेल पण मी त्यामध्ये जाणार नाही. कारण स्व.यशवंतराव चव्हाण, स्व.वसंतदादा पाटील, कै. राजाराम बापू पाटील, कै. वसंतराव नाईक, आदरणीय श्री.पवार साहेब, अशी नेते मंडळी त्या कालखंडात होऊन गेली.

श्री.शरद रणपिसे (बसून) : वसंतदादा पाटील यांच्या पाठीत खंजीर कोणी खुपसला ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**उप सभापती** : माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे, त्यांनी खाली असून अशा प्रकारच्या कॉमेन्टस करु नयेत आणि सभागृहाने खाली बसून केलेल्या कॉमेन्टसकडे लक्ष देऊ नये.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे हे अलीकडच्या काळात राजकारणात आलेले आहेत. कोणाच्या पाठीत खंजीर खुपसला याचा इतिहास काढायचा असेल तर तो काँग्रेसच्या जन्मापासून वाचायला मी तयार आहे. 1977 नंतर कॉंग्रेसचे विभाजन का झाले, 1989 मध्ये काँग्रेसचे विभाजन करताना कोणी कोणाच्या पाठीत खंजीर खुपसला ? असा सर्व इतिहास आपल्याला बाहेर काढता येतील. तेव्हा तुम्ही ते सांगण्याचा प्रयत्न करु नका. आपण आज वसंतदादाचे नाव घेत आहात, 1985 साली वसंतदादाच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रामध्ये सरकार आले आणि इंदिरा गांधी यांच्या दुर्दैवी निधनानंतर पंतप्रधान बनायला कोण चालले होते याचा इतिहास आम्हाला माहीत आहे. त्यावेळी श्री.वसंतदादानी दिल्लीमध्ये राजीव गांधी पंतप्रधान व्हावे अशी सर्वप्रथम भूमिका घेतली होती. वसंतदादाच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाला यश मिळाले. त्यावेळी तीन महिन्यानंतर दादांना न विचारता काँग्रेस पक्षाचा अध्यक्ष बदलला. त्यावेळी दादांच्या पाठीत कोणी खंजीर खुपसला ? आपण मला कशाला इतिहास सांगता, आम्ही या इतिहासाचे साक्षीदार आहोत. स्वातंत्र्यसेनानी वसंतदादांनी बंदुकीच्या गोळ्या छातीवर झेलल्या, त्या दादांचा अपमान रणपिसे साहेब कोणी केला याचे प्रथम उत्तर द्यावे. त्यानंतर 1978 चा इतिहास आम्हाला विचारण्याचा प्रयत्न करा एवढेच मी सांगतो. पुन्हा कधी या शब्दाचा पुनरुच्चार करु नका. आम्ही निश्चितपणे काँग्रेसच्या इतिहासाचे वाभाडे काढू शकतो, एवढेच आज आपणास सांगतो. आपण 1978 चा इतिहास काढला तर असे 78 पासूनचे सर्व इतिहास तुमच्या समोर ठेवण्याचे धाडस आमच्या मनगटात आहे. आम्हाला तो इतिहास शिकवू नका. सन 1999 मध्ये आम्हाला ते सहज शक्य होते. त्यावेळी प्रच्छन्न टीका झाली.

सभापती महोदय,. मुंबईमध्ये सलग बॉम्बस्फोट झाले त्यावेळी आदरणीय श्री.शरद पवार साहेब हे देशामध्ये संरक्षण मंत्री होते. मी आज बोलू इच्छित नाही. बाबरी मशीदचा वाद निर्माण झाल्यानंतर दिल्लीमध्ये कोणाची भूमिका कशी राहिली हे देशातील सर्वांनी पाहिले आहे. पण आज

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

तो उल्लेख करण्याचा प्रसंग नाही. मुंबईत स्टॉक एक्सचेंजजवळ बॉम्बस्फोट झाला त्यावेळी शरद पवार साहेब स्टॉक एक्सचेंजमध्ये गेले आणि आठ तासाच्या आत मुंबई पूर्ववत करण्याचे धाडस



श्री.सुनील तटकरे....

दाखविले, त्या नेतृत्वाबद्दल बोलण्याचा तुम्हाला अधिकार नाही, हे मी येथे सांगतो. आपण बोलावे. राजकीय मतमतांतरे असू शकतील, राजकीय वाद असू शकतील.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी अनेक प्रश्न उपस्थित केले. खरे म्हणजे हा प्रस्ताव केव्हा आला ? आपण विधानसभेच्या निवडणुकीचा उल्लेख केला. आपण विधानसभेची निवडणूक वेगवेगळी लढलो. ती का लढलो, कशामुळे लढलो ? आज तुम्हाला एकदम साक्षात्कार झाला की, आमचे आणि भाजपाचे काही तर जुळले आहे. एखाद्या प्रस्तावाला कोणी समर्थन देणे म्हणजे काही तरी जुळले असा जावई शोध लावण्याचा प्रयत्न केला तर काँग्रेसच्या लोकसभेच्या इतिहासातील अशा अनेक गोष्टी काढता येतील. त्यावेळी काय घडले हा इतिहास आपण सोयीस्कररित्या विसरु नका. पण आपण येथे तो सोयीस्कररित्या विसरणार. सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी शिफारस केल्यामुळे आपणास दिल्लीमध्ये एखादे स्थान मिळू द्या, त्यामध्ये आक्षेप असल्याचे काही कारण नाही. त्यांच्या कामामुळे त्यांना मतदारसंघात तीन वेळा नाकारले आहे. त्यांना आणखी कुठे जायचे ते जाऊ द्या. आमची काही हरकत नाही. मी त्यांचे अभिनंदन करतो. जिल्हा युवक काँग्रेसचा अध्यक्ष म्हणून मी त्यांच्या नेतृत्वाखाली काम केलेले आहे. मी त्यांचा अनादर कसा करेन ? त्यांच्या मतदारसंघातील लोकांनी त्यांना तीनदा नाकारले, त्यांच्या मुलाची अनामत रक्कम जप्त होते, त्याला मी काय करु ? मी त्यांचा अनादर करीत नाही. श्री.माणिकराव ठाकरे आपण उठू नका, मी आपला आदर ठेवून बोलत आहे. तुमच्या नेतृत्वाखाली घडलेला एक कार्यकर्ता आहे.

यानंतर श्री.बोर्डे.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.प्रकाश बिनसाळे)**

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरेजी यांना सांगू इच्छितो की, मी विधानसभेमध्ये 20 वर्षे काम केले आहे. एक-दोन वेळा नव्हे तर मी सतत चार वेळा निवडून आलो आहे. एकदा निवडणूक हरल्यानंतर पुन्हा त्या मतदारसंघात गेलो नाही आणि पुन्हा उभे राहिलो नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी माझ्या बाबतीत अशा प्रकारचा उल्लेख करणे योग्य नाही. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांना जे बोलायचे असेल त्यांनी ते बोलावे. वरच्या गॅलरीत कोणी बसले आहेत म्हणून अजून किती जोरात बोलावे, हे त्यांनी ठरवावे. सदनाच्या मर्यादा ओळखून त्यांनी बोलावे अशी माझी विनंती आहे.

श्री.सुनील तटकरे : महोदय, सत्ताधारी बाजूची मंडळी म्हणत आहे की, मी जे बोललो ते रेकॉर्डवरुन काढून टाकावे. माझी त्याला हरकत नाही. परंतु मी त्यांच्या नेतृत्वाखाली घडलेला कार्यकर्ता आहे. त्यामुळे त्यांचा विचार घेऊन पुढे चाललो पाहिजे की नाही ? सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त, यांना सांगतो की, मोदी लाटेमुळे तुमच्या पक्षाचे उमेदवार तीन-तीन लाखांनी पडले. परंतु हा सुनील तटकरे केवळ 2100 मतांनी पराभूत झाला. त्यामुळे तुम्ही मध्ये मध्ये बोलू नका. तुमचे डिपॉझिट जप्त झाले आहे, तुम्हाला बोलण्याचा अधिकार नाही.

सभापती महोदय, मी मुद्दा सोडून भाषण करणारच नव्हतो. परंतु तुम्हाला मुद्दा सोडून बोलावेसे वाटले त्यामुळे माझ्यावर सुध्दा तसेच बोलण्याची वेळ आली. हा प्रस्ताव असंविधानिक नाही. विधानसभेच्या निवडणुका आपण स्वतंत्रपणे लढलो. आपण उल्लेख केला की, पहिल्या दिवशी आमच्या पक्षाची भूमिका जाहीर झाली. सन्माननीय मंत्री श्री.रामदास कदम यांना सुध्दा या ठिकाणी चर्चा करावीशी वाटली. विधानसभा निवडणुकीच्या निकालाच्या दिवशी कोण कोणाला निरोप देत होते हे आम्हाला माहीत नाही काय, तुम्ही कोणाला काय बोलत होता, ते आम्हाला फोनवर काय बोलत होते, हे सर्व आम्हाला माहीत नाही काय ? सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी सांगितल्यानुसार विधानसभेच्या निवडणूक निकालानंतर कोणी कोणाला वेगवेगळे प्रस्ताव दिले हे आम्हाला माहीत नाही काय ? त्यावेळी कोणाचे प्रेम कोठे गेले होते, त्यावेळी धर्मनिरपेक्षतेचे विचार कोठे गेले होते ?

श्री.सुनील तटकरे....

सभापती महोदय, मी बाळासाहेब ठाकरे यांचा अतिशय अभिमानाने येथे उल्लेख करु इच्छितो. ते एकमेव असे पक्षाचे नेते होते की, त्यांनी विधानसभेची एकही निवडणूक न लढविण्याचा निर्णय 1980 मध्ये घेतला. त्या भूमिकेशी प्रामाणिक राहणारे एकमेव नेते हे बाळासाहेब ठाकरे होते, याचा मी या ठिकाणी आवर्जून उल्लेख करीत आहे. याचा अर्थ कोणी तत्त्वाशी तडजोड केली असा नाही. कोणीही म्हणू शकले असते की, ते इंदिरा गांधींच्या जवळचे आहेत किंवा बॅरिस्टर अंतुलेंच्या जवळचे आहेत म्हणून त्या काळात तडजोड केली. प्रमोद नवलकर किंवा मनोहर जोशी हे 1980 साली काँग्रेसच्या मेहेरबानीवर वरच्या सभागृहात आले. याचा अर्थ बाळासाहेब ठाकरे यांनी कोणाशी वैचारिक तडजोड केली, असे जर कोणी म्हणत असेल तर ते अन्यायकारक होऊ शकेल. त्यामुळे जी काही भूमिका घ्यायची असते ती स्वच्छपणे घ्यायची असते. 1971 साली सुध्दा तशी भूमिका घेतली गेली. शिवसेना पक्षाची स्थापना झाली त्यावेळी शिवसेनेचा उल्लेख अनेक वेळा 'वसंत सेना' असा केला जायचा. तो काय वसंतराव नाईक साहेबांना समोर ठेवून केला जात होता ? याचा अर्थ त्या काळात सेनेला कोणी पाठिंबा दिल्याचे धाडस कोणी करु शकेल काय ? ही सांगण्याची वेळ एवढ्यासाठीच आली आहे की, हे आम्ही सर्वांनी मिळून अनुभवलेले आहे. परंतु आपण सोयीस्कररित्या स्वत:च्या स्वार्थासाठी हे सगळे विसरण्याचा प्रयत्न करीत आहोत.

सभापती महोदय, या ठिकाणी उल्लेख झाला की, आमच्या पक्षाच्या मंत्र्यांवर आरोप झाल्यामुळे आमचे काही साटेलोटे होईल की काय ? सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे, आपण प्रदेशाध्यक्ष असताना आपल्या पक्षाच्या 2014 च्या निवडणुकीच्या जाहिराती आम्ही बघितल्या. त्या जाहिरातीत होते की, 'माझे कसे स्वच्छ आहे, सगळं पारदर्शक आहे.' महोदय, काँग्रेस पक्षाने विधानसभेची निवडणूक ही एका व्यक्तीच्या चेहऱ्याखाली लढविली. तरी सुध्दा त्या पक्षाला आमच्या पक्षापेक्षा केवळ एकच जागा जास्त मिळाली. मी विचारु इच्छितो की, कोणता स्वच्छपणा होता, कोणता पारदर्शकपणा होता ? ती सही लिहिताना अशी दाखविली जात होती की, जणू काही सर्व स्वच्छ कारभार आम्हीच केला आहे. मघाशी सन्माननीय सदस्य बोलताना थांबले. मी सांगू इच्छितो की, जी काही चौकशी व्हायची असेल ती होऊ द्या. आम्ही आज जात्यात आहोत. परंतु

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे....

तुम्ही सुपात आणि टोपलीत सुध्दा आहात. त्यामुळे त्या बाबतीत बोलण्याचे धाडस तुम्ही करु नका. चौकशीला सामोरे जाण्याची आम्ही तयारी केली आहे. परंतु त्यावेळी तुम्ही तुमचे सांभाळा एवढेच या निमित्ताने सांगतो.

सभापती महोदय, राजकारणामध्ये एवढी सत्ता का लागते ? सन्माननीय मंत्री श्री.रामदास कदम यांनी मघाशी बोलताना माझा उल्लेख केला. माझी पत्नी खेडची आहे. 2005 मध्ये माननीय श्री.नारायण राणे यांनी पक्ष सोडला. विरोधी पक्ष नेत्यासाठी सुनील तटकरे यांच्या बंगल्यावर येणारे कोण होते, याचे उत्तर कोणाला तरी कधी तरी द्यावे लागेल. माननीय श्री.अजितदादा यांच्याकडे मला घेऊन चल आणि यामध्ये त्यांना मध्यस्थी करायला लाव, असे सांगणारे लोक आज हे सर्व काही सोयीस्कररित्या विसरत आहेत. त्यावेळी मात्र राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाशिवाय आम्हाला हे पद मिळू शकत नाही अशी भावना असणारी माणसे आज वेगळ्या पध्दतीने बोलत आहेत. आपल्याला जे काही बोलायचे आहे ते बोला, कारण आपल्याला तसा अधिकार आहे. संसदीय लोकशाहीमध्ये आपल्या सर्वांना बोलण्याचा अधिकार आहे. अशा या तडजोडी सगळ्यांच्याच सर्व ठिकाणी होत असतात. काल-परवापर्यंत हा ठराव आल्यानंतर कोण कोणाला कोणाच्या चेंबरमध्ये जाऊन भेटले हे आम्हाला माहीत आहे. त्यावेळी पक्ष कुठे गेला, विचार कुठे गेले, धर्मनिरपेक्षतावादाचा इतिहास सांगणारे कुठे गेले ? महोदय, विधानसभेच्या निवडणुकीनंतर नागपूर अधिवेशन सुरु झाले त्यावेळी आम्ही विधानपरिषदेच्या विरोधी पक्ष नेता पदावर दावा केला होता. लोकशाही मानणारे आपण आहोत. ज्यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने विधानपरिषदेचे विरोध पक्ष नेते म्हणून सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांचे नाव सुचविले त्या क्षणाला त्यांची निवड लोकशाही माध्यमातून करणे आवश्यक होते. परंतु कोणी जाऊन कुणाला काय सल्ले दिले, पृथ्वी मिसाईल कुठून कुठे फिरत होते ? अहो, राज्य तर घालविलेच, पण त्यांनाही घरी घालविले, त्याला कोण काय करणार, याला कोणाचा काही इलाज चालणार नाही ? कारण राजकारण हे कुरुक्षेत्र आहे. मी अगोदरच सांगितले की, मी येथे आदरपूर्वक सांगणार आहे. मघाशी सन्माननीय मंत्री श्री.रामदास कदम म्हणाले की, हे सर्व लाल दिव्यासाठी चालले आहे. पण लाल दिव्यासाठी सुध्दा कोणी थांबण्याचा अट्टहास का करावा याचेही उत्तर लोकांना मिळाले पाहिजे. आम्ही ठराव आणला म्हणजे एका लाल

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे....

दिव्याच्या गाडीसाठी आम्ही खूप काही मोठे करतो असे सांगून वेगळे चित्र निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. पण आमचा अट्टहास नेमका एवढ्यासाठीच का आहे, आम्ही डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची संसदीय लोकशाही मानणार असू तर हे का नाही ?

महोदय, विधानसभेच्या विरोधी पक्ष नेते पदाच्या वेळी सुध्दा नागपूरला कोण कोणाला भेटत होते हे आम्हाला माहीत नाही का ? या बाबतीत प्रश्न विचारु शकतो की, राधा सुता, तेव्हा तुझा कुठे गेला होता धर्म ? परंतु मी 'राधा सुता' असे म्हणणार नाही. मी विचारु इच्छितो की, राधाकृष्णा, तुझा विधानसभेच्या विरोधी पक्ष नेते पदासाठी धर्म कुठे गेला होता ? कोण जाऊन कोणाचे पाय धरत होते, कोण सांगत होते की, विरोधी पक्ष नेतेपद आम्हाला द्या, हा सुध्दा त्या वेळचा इतिहास सांगण्यासारखा आहे. त्यावेळी सुध्दा दुष्काळ होता, गारपीट होती, खरीप पिकांचे नुकसान झालेले होते. त्यावेळी शिक्षकांवर, दलितांवर, महिलांवर अन्याय-अत्याचार होतच होते. या महाराष्ट्राचा त्या काळातील इतिहास पाहिला आहे. माननीय श्री.शरद पवार साहेबांनी काय नाही पाहिले ? 1980 साली 55 आमदार निवडून आल्यानंतर त्यातील 50 आमदार निघून गेले, तरी सुध्दा उमेदीने उभे राहणारे नेतृत्व शरद पवार साहेबांच्या रुपाने महाराष्ट्राने पाहिले आहे. 5 आमदारांच्या बळावर पुन्हा एकदा महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये माननीय पवार साहेबांच्या नावाला वगळून कोणी त्या निमित्ताने राजकारण करु शकत नाही. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील, जसे स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांचे आहे तसेच शरद पवार साहेबांसारख्या लोकोत्तर नेतृत्वाने हा महाराष्ट्र घडविला आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांची अनेक रुपे आम्ही बघितली आहेत. परंतु त्यांना आज एकदम वेगळे रुप आठवले. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी त्यांची भूमिका स्पष्टपणे सांगितली. त्यामुळे या प्रश्नाची फारशी उकल वा चर्चा न करणे बरे राहील. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना आज इश्क, आशिकी आठवली. ते शिक्षकांचे आमदार आहेत. त्यांना आज सर्व आठवत गेले. त्यांना आज 'चुंबा चुंबी' आठवली.

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुनील तटकरे ....

सभापती महोदय, हे काय चालले आहे ? लाल गाल त्यांना आणि यांनाही आठवले. आता काय करायचे ? खूप प्रेमात आहेत. तुमच्याकडून निदान ही अपेक्षा नव्हती. काल परवा पर्यंत माझ्या सोबत खाजगीत काय बोलला ते सांगू का मी ? सर्वजणच असे वागत आहेत. सन्माननीय सदस्य श्री. शरद रणपिसे यांनी मला सन 1978 पासूनचा इतिहास सांगितला. आता या बाकावर बसण्याची पाळी आपल्यावर का आली, हे सुध्दा त्यांनी संगितले आहे. आता मी कशाला सांगू, आपण कशाला खोटे बोलत आहात ? आता हसले. आपल्याला या बाकावर का बसावे लागले, याला कोण कारणीभूत आहे हे सांगितले आहे. आपण मला सांगावे नाही म्हणून. मी माझे शब्द लगेच मागे घेतो. मी सोडून दिले. मी विनंती करून सांगतो की, आता परत कधी सन 1978 चे सांगू नका. आपल्याला तो अधिकार नाही. आज कोणाला नैतिकता आठवली, कोणाला आणखी काही काही आठवले. नैतिकतेच्या भोवती फिरण्याचा जणू काही प्रयत्न करीत असताना सत्तेसाठी फक्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षच मोठया प्रमाणात आसुसलेला आहे, असा एक आवाज निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. माननीय मंत्री श्री. दिवाकर रावते साहेब, तुम्ही थंड आहात म्हणून तुम्हाला डिवचत नाही. आता माननीय मंत्री श्री. रामदास कदम पाहिजे होते. मी माननीय मंत्री श्री. रामदास कदम यांच्या संदर्भात यासाठी बोलत आहे, कारण तुम्ही पाच लोकांनी शपथ घेतली. महिनाभर ते काय म्हणत होते ते तुम्ही ऐकले आहे का, शेजारी बसलेले आताचे माननीय मंत्री श्री. एकनाथ शिंदे हे विरोधी पक्ष नेते म्हणून काय बोलत होते ते ऐकले का ?

सभापती महोदय, महाराष्ट्राच्या इतिहासात पहिल्यांदा असे झाले की, एक महिन्याच्या आत विरोधी पक्ष नेता राज्य सरकारमध्ये मंत्री होतो. हा इतिहास तुम्ही घडविला. आता तुम्ही नैतिकता काय सांगणार आहात, कोणत्या नैतिकतेचे धडे नव्याने शिकविणार आहात, आपण त्यावेळी महिनाभर फिरत काय गोष्टी करीत होता ? एक महिन्याच्या आत विरोधी पक्ष नेते पद मिळविण्यासाठी सुध्दा किती अट्टहास करीत होता, तुम्ही त्यासाठी किती तडजोडी केल्या आहेत.

सभापती महोदय, प्रस्ताव आला त्यावेळी माननीय मंत्री श्री. दिवाकर रावते आणि मी, आम्ही गॅलरीमध्ये बसलो होतो. पहिला प्रस्ताव विश्वासदर्शक होता आणि दुसरा प्रस्ताव विरोधी



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुनील तटकरे ....

पक्ष नेत्याच्या निवडीचा होता. फक्त क्रम बदलला गेला, त्यावरून मॅच फिक्सिंग किती होती, ते समजले. नावेही बाहेर गेली. तो प्रस्ताव परत माननीय अध्यक्षांनी मांडला. माननीय राज्यपालांना अडविले गेले. आता तुम्ही आम्हाला नैतिकतेच्या गोष्टी सांगू लागला आहात, आमचे कोणावर प्रेम नाही का ? हा व्यक्तीच्या संदर्भातील प्रश्न नाही. हा प्रश्न धोरणाचा आहे. प्रश्न तुमच्या राजकीय विचारसरणीचा आहे. आपण आपुलकीच्या नात्याने ज्येष्ठ नेतृत्वास सल्ला दिला असता की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे 28 सदस्य आहेत, आपले बहुमत नाही आणि त्यामुळे आपण या पदावरून दूर होणे यातच आपली शान राहू शकेल तर शान राहिली असती. तुम्ही म्हणालात त्याप्रमाणे मी आताही हात जोडून विनंती करतो की, अजूनही मत विभाजन होण्यापूर्वी माननीय सभापतींनी उठावे आणि सांगावे की, मी या पदापासून दूर होत आहे. राज्याच्या इतिहासातील कटुतेचे हे क्षण टाळता येतील. आमचे व्यक्तिगत संबंध निश्चितपणे राहिले आहेत. मात्र याचा अर्थ असा नाही की, राजकारणात तडजोड होईल. मी माझ्या पक्षाचा प्रदेशाध्यक्ष आहे. मी माझे काम केले आहे, त्यामुळे अशा पध्दतीने काही मांडण्याची गरज नाही.

सभापती महोदय, गॅलरीमध्ये कोणी आले म्हणून मी फार जोराने बोलतो असे सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांना वाटले. कृष्णा कल्ले आजच वारल्या, त्यांनी एक चांगले गीत लिहिले आहे की, परीकथेतल्या राजकुमारा स्वप्नी माझ्या येशील का ? सभापती महोदय, ते राजकुमाराच्या शोधात आहेत. मात्र तो येतच नाही. तो स्वप्नात पण येत नाही आणि त्यांना भेटतही नाही. तो राजकुमार यांना दिसतच नाही. त्यामुळे आता त्या राजकुमाराला शोधण्याचे काम माणसे करीत आहे, राजकुमाराला बघायला गेले की दुसरेच आणखी काही तरी सुरूहोत आहे. मग आता त्याला काय करायचे ? त्यामुळे हे सगळे सांगणे आवश्यक होते. तुम्ही हे टाळले नाही म्हणून हे बोलावे लागले. परंतु तरी देखील कटुता राहू नये म्हणून हा विषय घेऊन आपण पुढे जाऊ या.

सभापती महोदय, तुम्ही येथे कबुली दिली आहे. रेकॉर्डवर तुमचे भाषण आहे. तुम्ही अशी कबुली दिली की, तुम्ही उप सभापती पद आमच्याकडे मागितले होते. तुम्ही पण एका लाल दिव्यासाठी करीत होता अशी तुम्ही कबुली दिली आहे. आपण रेकॉर्ड काढून पहावे नाही तर मी

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुनील तटकरे ....

कालचे टीव्हीवरील अशोक चव्हाण यांचे स्टेटमेंट काढतो. कशाला आम्हाला फक्त बोलता ? तुम्हाला देखील उप सभापती पदाच्या लाल दिव्याची आस लागली होती. त्यावेळी दुष्काळाची, शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची, महिलांवरील अत्याचाराची चर्चा कुठे गेली ? आता मात्र एका गोष्टीसाठी हे सर्व काही तुम्हाला आठवत आहे आणि याचा अर्थ स्वतःच्या सोयीनुसार हे सर्व आठवण्याचा तुम्ही प्रयत्न करीत आहात. आपण हे टाळले पाहिजे. गेली 15 वर्षे काम करीत असताना आम्ही एकत्रित काम केले. आता हात मिळवणी झाली असे म्हणायचे झाले तर गेली 4 वर्षे आमच्या सोबत असताना तुम्ही काय करीत होता याचा इतिहास सांगायला गेलो तर खूप वेळ लागेल. त्यामुळे तसे सांगणेही काही बरे नाही. स्व. चव्हाण साहेबांच्या जन्म शताब्दीच्या निमित्ताने सुध्दा चर्चासत्रात कोणी काय काढले, त्यामुळे आणखी काय निर्माण झाले, याचीही चर्चा करण्याचे हे व्यासपीठ नाही, याची मला जाणीव आहे.

सभापती महोदय, मी अधिक न बोलता एवढेच सांगेन की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने घेतलेली भूमिका माननीय सभापती श्री. शिवाजीराव देशमुख साहेबांच्या व्यक्तिगत विरोधातील नाही. माननीय श्री. शिवाजीराव देशमुख साहेबांबद्दल कमालीचे प्रेम, आदर असणारा मीच नाही तर आमचे नेते आदरणीय श्री. शरद पवार साहेब यांच्या तसेच माननीय अजितदादांच्या मनात सुध्दा त्यांच्याविषयी प्रेम आहे. परंतु, त्यांना सल्ला देऊन विनाकारण त्यांच्या आयुष्यातील संध्याकाळच्या वेळी त्यांच्यावर आघात करण्याचे पाप करीत आहात, त्यांच्या विरोधात लढण्याचे काम आम्हाला करावे लागणार आहे. हे त्यावेळीच झाले असते तर हा विषय संपला असता आणि हा प्रस्ताव आणण्याची वेळ आली नसती.

सभापती महोदय, त्यावेळी संविधानिक मार्गाने सन्माननीय श्री. धनंजय मुंडे यांची विरोधी पक्ष नेते पदी निवड करणे आवश्यक होते. परंतु कोणीतरी बदसल्ला देऊन आले. आमच्याच लॉबीतून काही माणसे जायची, इकडून तिकडून फिरताना कोणी अजिबात बघायचे नाही. शिपाई सुध्दा बाजूला व्हायचे नाही. पण ते जाऊन काही काही वेळा काही गोष्टी सांगत बसायचे. सर्व गोष्टींचा परिणाम होत गेला. त्यामुळे तुम्ही जे मघाशी म्हणालात, तो दिवस आज आला. त्यावेळी तो सल्ला तुमच्या सारख्यांनी दिला असता तर ही वेळ आली नसती. तुम्हाला पण नुकतेच मंत्री

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुनील तटकरे ....

पद मिळाले होते, तुम्ही इकडे तिकडे गुरफटत बसला होता. त्यामुळे तुमचा सल्ला ऐकण्यास कोणाला वेळच नव्हता. आपण तो सल्ला 4 दिवस अगोदर दिला असता तर ते आजचे सर्व प्रसंग टाळता आले असते. आम्ही कोणत्याही प्रकारे सत्तेसाठी केलेले नाही. आम्ही पुरोगामी विचार, राज्याचे हित या संदर्भात काम करणारे कार्यकर्ते आहोत. माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी बारामतीला गेले होते.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य अतिशय चांगले भाषण करीत आहेत. मी आपल्यामार्फत त्यांना विनंती करीत आहे की, अजूनही वेळ गेलेली नाही. आपल्याला मनापासून माननीय श्री. शिवाजीराव देशमुख यांच्याबद्दल अतिशय आदर, जिव्हाळा, प्रेम वाटत असेल तर अजूनही वेळ गेलेली नही. मी कधी सल्ला द्यायचा, याची मला कल्पना नव्हती. मी सल्ला देण्याइतपत मोठा नाही. मी लहान माणूस आहे. आपण मोठी मंडळी आहात. बाकीच्या मंडळींना बसवून अजून देखील तोडगा निघू शकतो. संध्याकाळच्या वेळी व्यक्तिगतरित्या माननीय श्री. शिवाजीराव देशमुख यांना दु:ख, वेदना होईल असे वागणे ठीक नाही. हे राज्याच्या जनतेला पचनी पडेल अशातील भाग नाही, म्हणून मी मित्र म्हणून विनंती करीत आहे. मला राजकीय भाषण करायचे नही. अजूनही वेळ गेलेली नाही. आपण पुढाकार घेऊन होत असेल तर प्रयत्न करावेत अशी माझी विनंती आहे.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री दुसऱ्या कामात होते. पर्यावरणाचे संतुलन बिघडले की काय हे पाहत असावेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, तुम्ही येण्याअगोरच मी हात जोडून विनंती केली होती की, अजूनही त्यांनी उठून उभे राहून सांगावे की, मी पदमुक्त झालो आहे. त्यांनी असे केले तर विषय संपेल. मत विभाजन टाळता येईल. मी मघाशी हात जोडून विनंती केली आहे. आता पुन्हा तुमच्या साक्षीने विनंती करतो. सभापती महोदय, संख्या बळानुसार कामकाज होते. शिवसेना व भाजप यांची सुध्दा आघाडी राहिली. ज्यावेळी शिवसेनेचे सदस्य गेले तेव्हा विरोधी पक्ष नेते पद त्यांच्याकडे आले. तुमच्याकडे अबाधित राहून प्रयत्न करणारा सुनील तटकरे यातील आहे. मी मघापासून नम्रपणे सांगितले आहे की, पक्ष संख्याबळानुसार चालत असतात. तुम्ही आग्रह करणाऱ्यांपैकी एक होता याची जाणीव मी या निमित्ताने करतो. मी सांगितले



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुनील तटकरे ....

की, प्रश्न व्यक्तीचा नाही. माझ्या मनात, माझ्या नेतृत्वाच्या मनात, माझ्या केंद्रीय नेतृत्वाच्या मनात त्यांच्याबद्दल कमालीचा आदर आहे. पण प्रश्न तो नाही. प्रश्न विचारसरणीचा आहे. कुरुक्षेत्रात भगवंताचे काय घडले, यापेक्षा हे वेगळे आहे का ? सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी सत्य-असत्य याबाबत सांगितले, कुरुक्षेत्र मांडले. आज येथे काय करतोय, काय नाही याची मघाशी आठवण करून दिली. आता सत्य-असत्याचा फैसला आम्हीच करीत आहोत. आपण लोकशाहीमध्ये सर्व काही लोकांवर सोपविलेले आहे.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे......

लोकशाहीचा कौल आम्ही मान्य केला म्हणूनच आम्ही विरोधी पक्षाच्या बाकावर बसलो आहोत. आपण विरोधी पक्षात का बसलो, याबाबत सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी माझ्या कानात काही सांगितले आहे. पण त्याचा उल्लेख मी येथे करणार नाही.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, हा तोंड दाबून बुक्क्यांचा मार आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अमर राजूरकर यांनी तर मला असे सांगितले की, सन्माननीय श्री.अशोक चव्हाण यापूर्वीच अध्यक्ष झाले असते तर ही वेळ आली नसती. किती लोकांची नांवे सांगू ? बरीच नावे सांगता येतील, पण आता सांगत नाही. मला कल्पना आहे की, या गोष्टी बोलायच्या नाहीत, असे आपले अगोदर ठरले होते. परंतु, आताच जे सांगितले ते तुम्ही मान्य केले, याबद्दल आपले आभार.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, खोटे बोला पण रेटून बोला, असे सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांचे सुरु आहे. यामध्ये काही तथ्य नाही. मघाशी आपण भाषण ऐकले. सन्माननीय श्री.एकनाथराव शिंदे यांना विरोधी पक्ष नेते पदी बसविण्यासाठी इकडे जा, तिकडे जा, यांना भेटलो, त्यांना भेटलो, असे ते म्हणत आहेत. पण तसे काहीही घडलेले नाही.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, या पूर्वी असेही कधी घडलेले नाही की, विरोधी पक्ष नेते पदी निवड झाल्यानंतर महिनाभर विरोधी पक्ष नेते महाराष्ट्रात फिरले आणि नंतर लगेच 15 दिवसांनी राज्याच्या मंत्रिमंडळात आले. असे मी बोललो होतो. ते असत्य आहे का ? तसे असेल तर मी माझे शब्द मागे घेतो. यापेक्षा वेगळे मी काय बोललो ? ते विरोधी पक्ष नेते म्हणून नाशिकला गेले, त्यांच्या हातातील माईक आपण काढून घेतला आणि स्वत: बोलत बसला. आता आणखी काय सांगू ? त्यांना कधी विरोधी पक्ष नेता म्हणून आपण बोलू दिले नाही. हे आम्हाला माहीत नाही का ?

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांना सांगू इच्छितो की, त्यांना माहीत नसेल पण विरोधी पक्ष नेते पदाबाबत मुख्यमंत्री महोदयांनाही कल्पना नव्हती की, दुसऱ्या दिवशीच्या कार्यक्रम पत्रिकेवर विरोधी पक्ष नेत्याच्या नेमणुकीचा विषय आहे. रात्री 1.00 वाजेपर्यंत आम्ही थांबलो आणि नियमानुसार त्यांची नेमणूक करुन घेतली. मी कोणावर

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामदास कदम.........

अतिक्रमण केले आहे, हे तुम्ही सांगण्याची आवश्यकता नाही. मी पाच वर्षे विरोधी पक्ष नेता होतो. मलाही अनुभव आहे. अशा प्रकारे सभागृहाची दिशाभूल करु नका, त्यापेक्षा विषयावर या. या वयामध्ये देशमुख साहेबांना आपण असे सांगत आहात की, "उठा आणि असे सांगा की, मी राजीनामा देतो आहे." एक लाल दिव्याची गाडी नाही मिळाली तर तुम्हाला काय अडचण होणार आहे ? या वयामध्ये एक गाडी त्यांच्याकडे राहिली तर काय हरकत आहे ? त्याऐवजी तुम्ही त्यांना असे सांगत आहात की, "उठा आणि राजीनामा देतो म्हणून सांगा." कशासाठी ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, लाल दिव्यासाठी ते किती व्याकूळ झाले होते, हे आम्ही पाहिले आहे. त्यांना नको असेल तर आम्ही हा विषय सोडून देऊ. सन 2005 मध्ये ते त्यांच्या बळावर विरोधी पक्ष नेता झाले, असे आपण समजू.

श्री.रामदास कदम : तुम्ही तेवढेच काम करीत आहात.

श्री.सुनील तटकरे : ठीक आहे. सोडून दिले.

श्री.रामदास कदम : जावई एवढा लबाड असू शकतो ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, याचा अर्थ असा आहे की, विरोधी पक्ष नेते बनण्यासाठी आमचा खारीचा वाटा होता, हे त्यांनी कबूल केले आहे. ते मघाशी बोलले की, मी 2100 मतांनी पडलो. जरा थोडेसे माझे ऐकले असते, आधी मला सांगितले ...........

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, 2100 मतांचा आणि आजच्या प्रस्तावाचा काय संबंध आहे ? यांच्याकडे आता सांगण्यासारखे काहीही नाही, यांची इज्जत गेली आहे, कपडे उतरविले गेले आहेत म्हणून दिशाभूल करण्याचा प्रयत्न ते करीत आहेत.

**उप सभापती :** ठीक आहे. आता रेटारेटी पुरे झाली. सन्माननीय सदस्यांनी मुद्यावर बोलावे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांना मी सांगू इच्छितो की, आम्ही आणि काँग्रेसने रायगड जिल्ह्यात कसे काम केले आहे, ते तुम्हालाही माहीत आहे आणि सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांना देखील माहीत आहे. रायगड जिल्ह्यापुरते सीमित राजकारण करणाऱ्यांमधील मी नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे........

सभापती महोदय, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने मांडलेला प्रस्ताव संविधानात्मक आहे. पुरोगामी विचारावर आमची गाढ निष्ठा आहे. मघाशी बोलताना सन्माननीय मंत्री श्री.रामदास कदम यांनी देशाचे पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी हे बारामतीला गेले, असा उल्लेख केला. परंतु, बारामतीला जाणारे ते पहिले पंतप्रधान नाहीत. स्व.राजीव गांधी देखील बारामतीला गेले होते.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, त्यात मी चुकीचे काय बोललो. उलट मी एवढे चांगले सांगितले की, आमच्या या महाराष्ट्रातील मराठा माणूस, मराठा नेता, गवळी नाही म्हटले मी, मराठा नेता दिल्लीमध्ये शासन चालवितो, असे म्हटले. पवार साहेबांबद्दल बोलल्यानंतर तुमच्या पोटात का दुखायला लागले ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री श्री.रामदास कदम यांनी माझी जात काढली. मी गवळी आहे. गवळी समाजाची 500 मते सुध्दा माझ्या मतदारसंघात नाहीत. पण शिवसेनेच्या उमेदवाराला पाडून 5 वेळा मी निवडून आलो. ही माझी पुण्याई आहे. तुम्ही मला सांगण्याचा प्रयत्न करु नका. तुम्ही माझी जात काढली ना ?

श्री.रामदास कदम : मी माझा शब्द मागे घेतो.

श्री.सुनील तटकरे : गप्प, शांतपणे बसा आता. मी दम कधी दिला ? तुम्ही जात काढली.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, एखाद्या सन्माननीय ज्येष्ठ सदस्यांची जात काढली जात असेल तर ते बरोबर नाही.

**उप सभापती :** जातीवाचक काही शब्द आले असतील तर ते मी कामकाजातून काढून टाकतो.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, ते माझे सासरे आहेत. त्यांनी क्षमा मागितली नसली तरी शब्द मागे घेतला, एवढे पुरे आहे. पण मी हे दाखवून दिले आहे की, गवळी समाजाचा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

असूनही मी शिवसेनेचा पाडाव करुन पाच वेळा निवडून आलो आहे. हे सत्य कोणाला नाकारता येणार नाही. आता एवढे खूप झाले.

...4.....



श्री.सुनील तटकरे........

सभापती महोदय, या संदर्भात कितीही युक्तिवाद करता येऊ शकतो. पंतप्रधान महोदयांचा उल्लेख त्यांनी केला आहे. बारामतीचे काम बघून प्रभावित झालेल्या डॉ.मनमोहन सिंगांना 7 रेसकोर्स बंगल्यावर सुनील तटकरेने बघितले आहे. राजीव गांधी ज्यावेळी बारामतीला गेले त्यावेळी बारामतीच्या कामाची त्यांनी स्तुती केली, हे सुनील तटकरेने पाहिले आहे. स्व.बाळासाहेब ठाकरे यांनी देखील त्यांची स्तुती केली. पंतप्रधान महोदयांच्या बारामती भेटीचा पुन्हा एकदा राजकीय अन्वयार्थ काढण्याचा प्रयत्न करु नका, एवढेच तुम्हाला सांगतो. तुमचे, त्यांचे काय आहे, ते तुम्ही बघा. आम्हाला त्याचे काही देणेघेणे नाही. तुम्ही रहा, राहू नका, तुम्हाला काही मिळते की नाही, हा तुमचा भाग झाला. आमच्यासाठी हा विषय गौण आहे. आमची भूमिका एवढीच आहे की, संविधानात्मक मार्गाने हा प्रस्ताव सभागृहामध्ये आणला गेला आहे, त्याचे मी समर्थन करतो. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या विचारावर, संविधानावर, शाहू, फुले यांच्या पुरागामी विचारावर दृढ निष्ठा ठेऊनच पुढील वाटचाल करणार आहे, एवढेच सांगतो आणि माझे विचार थांबवितो. जय हिंद . जय महाराष्ट्र.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ ऑर्डर आहे.

**उप सभापती :** आता मी कुणालाही परवानगी देणार नाही. सन्माननीय सभापती श्री.शिवाजीराव देशमुख यांनी आता आपले भाषण सुरु करावे.

---------

...5....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शिवाजीराव देशमुख **(सभापती) :** सन्माननीय उप सभापती श्री.वसंतरावजी डावखरे, सन्माननीय संसदीय कामकाज मंत्री श्री.गिरीष बापट, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे, सन्माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते, सन्माननीय मंत्री श्री.रामदास कदम, सन्माननीय सदस्य आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष श्री.सुनील तटकरे, सन्माननीय गटनेते श्री.माणिकराव ठाकरे आणि सभागृहात उपस्थित असलेल्या बंधू आणि भगिनींनो,

यानंतर श्री.वि.खर्चे........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शिवाजीराव देशमुख **(सभापती) ...**

सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी अन्य 21 सहकारी सन्माननीय सदस्यांसह "महाराष्ट्र विधानपरिषद सभापती यांनी सभागृहाचा विश्वास गमविल्यामुळे त्यांना सभापती पदावरुन दूर करण्यात यावे" असा अविश्वास प्रस्ताव दाखल केला आहे. या अनुषंगाने माझे सहकारी सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी सभागृहात तसा प्रस्ताव मांडला आहे. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे, सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील, सन्माननीय मंत्री श्री.रामदास कदम, सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील, सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे या माझ्या सहकारी मित्रांनी यावर विचार व्यक्त केले आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी पहिला मुद्दा असा मांडला की, राजकारण आणि वयाचा यत्किंचितही संबंध नाही. त्यांच्या मताशी मी पूर्णपणे सहमत आहे. मी 80 वर्षाचा आहे, 70 किंवा 60 वर्षाचा आहे, या प्रकारे मी आयुष्यात कधीही कोणाकडे भीक मागितली नाही आणि मागणार देखील नाही. या सदनात काम करताना जनसेवा करावी या उद्देशाने मी काम करण्याचा प्रयत्न केला आहे. एका ध्येयवादी कुटुंबात आयुष्यातील पहिली चार वर्षे मी अत्यंत सुखात होतो. प्रतिकूल परिस्थिती कशी असते हे मी त्यानंतरच्या काळात अनुभवली आहे. खानावळीत जेवण घेत असताना महिन्याचे 15 रुपये देखील मी देऊ न शकल्यामुळे खाली मान घालून जेवण्याची वेळ आलेल्या कष्टाळू कुटुंबातील मी एक मुलगा होतो. अनेक संकटे आल्यानंतर समाजसेवा करावी, सामान्य माणसाला मदत करावी, विद्यार्थ्यांना मदत करावी, असे मी ठरविले होते. एमए चे शिक्षण घेताना मी असा प्रयत्न करीत होतो की, मला 50 रुपये महिन्याची नोकरी मिळाली तर माझ्या अन्य तीन भावांचे शिक्षण होईल व माझे देखील शिक्षण होईल. दहा महिने प्रयत्न करुन देखील मला नोकरी मिळाली नाही. म्हणून मला महाविद्यालयातील शिक्षण सोडावे लागले होते. असे अनेक प्रहार छातीवर सोसलेला मी कार्यकर्ता आहे. माझा जिल्हा व तत्कालीन मुख्यमंत्री स्व.वसंतदादा पाटील यांचा जिल्हा एकच आहे. त्यांच्या नजरेत मी कसा आलो ते मी आपणाला सांगतो. मी बीएचे शिक्षण कोल्हापूर येथे घेत होते. तासगांव येथे विस्तार अधिकारी म्हणून मी काम करीत होतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

...2...

श्री.शिवाजीराव देशमुख **(सभापती) ...**

सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी माझ्या बाबतीत एक आठवण सांगितली ती खरी आहे. मी इंग्रजी तिसरीत होतो, त्यावेळी एक वेगळे आकर्षण होते. भारताचे सरसेनापती फिल्ड मार्शल करीअप्पा त्यावेळी कोल्हापूर येथे आले होते. काहीही करुन त्यांना आपण भेटावे अशी माझी तीव्र इच्छा होती. त्यांना भेटण्यासाठी आम्ही तीन चार मीत्र चार दिवस प्रयत्न करीत होतो. संरक्षण अत्यंत कडक असल्यामुळे आम्हाला त्यांना भेटता येत नव्हते. शेवटी आम्ही तीन विद्यार्थ्यांनी असे ठरविले की, कोल्हापूरच्या विमानतळावरील कॉर्नरवर एक वडाचे झाड आहे. त्या झाडावर आम्ही सकाळी पाच वाजतो चढून बसलो होतो. जनरल साहेब सात वाजता तेथे आले, त्यावेळी त्यांच्या लक्षात आले की, दोन चार मुले झाडावरुन खाली उतरत आहेत. त्यांनी कार थांबविण्यास सांगितली. त्यावेळी त्यांची व आमची अत्यंत चांगली भेट झाली होती. त्यांनी आम्हाला ध्येयवादाचा विचार सांगितला होता. सदनात या क्षणी देखील तो मी सांगू शकतो. ''Let us perish but keep flag flying." म्हणजे प्रसंगी तुम्हाला मरण आले तरी चालेल ते तुम्ही स्वीकारा, परंतु देशाचा तिरंगा फडकवत ठेवा. अशा प्रकारचा ध्येयवाद माझ्या नसानसांत भिनलेला आहे. खरे तर मी राजकीय क्षेत्रात अपघाताने आलो आहे. भारतीय संरक्षण दलात जावे व एक योध्दा व्हावे या मानसिकतेचा मी कार्यकर्ता होतो. मी सायन्सचा विद्यार्थी असून कोल्हापूरच्या एनसीसीत जात असताना मी सायन्समधून आर्टमध्ये प्रवेश घेतला होता. 'सी' सर्टीफिकेट परीक्षेला आम्ही 25 विद्यार्थी बसलो होतो. त्यातील आम्ही दहा विद्यार्थी पास झालो होतो, त्यातील 9 इंडियन महाविद्यालयाचे विद्यार्थी होते व मी एक आर्टचा विद्यार्थी होतो. माझ्या घरच्या अत्यंत हलाखीच्या अडचणीमुळे मी विस्तार अधिकारी म्हणून 9 वर्षे नोकरी केली होती. तासगांव तालुक्यात 1958 मध्ये मी काम करीत होतो. स्व.आर.आर.पाटील यांचा जन्म 1957 चा आहे. स्व.आर.आर.पाटील यांचे वडील व माझी चांगली मैत्री होती.

महोदय, दरम्यानच्या काळात स्व. वसंतदादा पाटील यांनी मला बोलाविले आणि माझ्याशी चर्चा केली. त्यांनी मला असे सांगितले होते की, तू नोकरी सोडून दे. मी त्यांना सांगितले होते की, मी चार वर्षानंतर जरुर नोकरी सोडीन. अशा प्रकारे अपघाताने मी राजकीय जीवनात आलो आहे. राजकारणी म्हणून माझ्याकडे बघितले तर खऱ्या अर्थाने राजकारणाचे काही गुण माझ्यात

...3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शिवाजीराव देशमुख **(सभापती) ...**

कमी असल्यामुळे मला आयुष्यात अनेक फटके बसले आहेत. अनेक वेळा मानसिक दृष्ट्या त्रास देखील झाला आहे. त्यावर मात करुन मी राजकीय जीवनात आपण सर्वांचा सहकारी झालो. काही तरुणांचा मित्र झालो, मला अभिमानाने सांगावेसे वाटते की, सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांच्याकडे मी गेल्या 25 वर्षापूर्वीच अतिशय ध्येयवादी तरुण म्हणून पाहिले होते. श्री.विजयसिंह मोहिते-पाटील, स्व.वसंतदादा पाटील व मी असे ठरविले होते की, श्री.सुनील तटकरे यांना कोणत्याही परिस्थितीत मदत करणे जरुरीचे आहे. अत्यंत कुवत असणारे हे व्यक्तिमत्व आहे. जे सुख माझ्या तरुण वयात मला कधीही मिळाले नाही, 18 व 25 व्या वर्षी देखील मिळाले नाही, या दृष्टीकोनातून मी आयुष्यभर तरुणांच्या शोधात होतो. मग तो कोणत्याही जाती जमातीचा असेल, कोणत्याही पक्षाचा असला तरी अत्यंत कर्तृत्वान व्यक्तिला मी नेहमी मदत करतो. मी उदाहरण देतो की, सत्ताधारी पक्षात बसलेले माननीय मंत्री डॉ.रणजित पाटील, हे माझ्या नजरेत गेल्या तीन-चार वर्षापूर्वी आले होते. डॉ.रणजित पाटील यांना जेवढी मदत करणे शक्य होते तेवढी सर्व मदत करण्याचा मी प्रयत्न केला आहे. मी केलेली मदत त्यांना पसंत पडली किंवा नाही हे मला माहीत नाही. त्यांच्याकडे कुशाग्र बुध्दीमत्ता आहे, ते अत्यंत ध्येयवादी आहेत, अशा चांगल्या लोकांवर मी प्रेम करणारा माणूस आहे, या वयात मी यापेक्षा आणखी काय करावे.

महोदय, मी अभिमानाने सांगतो की, माझ्या सांगली जिल्ह्यातील माझा मतदारसंघ बहाद्दूर लोकांचा आहे. 1942 च्या लढ्यात लढलेला हा मतदार आहे, काही गावांमध्ये 50 ते 100 स्वातंत्र्यसैनिक आहेत. माझ्या गावापासून दोन मैलावर बारशी गाव आहे. त्या गावातील ग्रामस्थांनी 1930 मध्ये 50 फूट उंचीचा झेंडा लावला होता. तो शेवटपर्यंत काढला नाही. शेवटी ब्रिटीश शासनाला लष्कर आणून तो झेंडा काढावा लागला होता. अशी ऐतिहासिक परंपरा असलेला माझा तालुका माझा मतदारसंघ आहे. त्या मतदारसंघातील मी एक अत्यंत सामान्य कार्यकर्ता आहे.

या नंतर श्री.बोरले..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शिवाजीराव देशमुख **(सभापती) .......**

मला तीन वेळा सनदशीर मार्गाने काँग्रेसचे तिकीट मिळाले नाही. ज्यावेळी सन 1978 मध्ये मला लोकांनी सांगितले की, आता आपणच निर्णय घेऊन विधानसभा निवडणूक लढवावी. त्यावेळी मी लोकांना सांगितले की, मी तुमच्या मताप्रमाणे निवडणूक लढवायला तयार आहे. परंतु, माझी एक अट आहे. त्यांनी मला विचारले की, तुमची कोणती अट आहे ? मी त्यांना सांगितले की, मी चुकून निवडून आलो तर मी वसंतदादांच्या आणि इंदिरा गांधींच्या काँग्रेसचा आमदार म्हणून काम करणार आहे, आपणाला पसंत असेल तर तसे सांगावे. त्यांनी मला सांगितले की, आम्हाला हे मान्य आहे आणि अपघाताने सन 1978 मध्ये मी प्रथम निवडून आलो. मला अभिमानाने उल्लेख करावा लागेल की, प्रत्येक निवडणुकीच्या वेळी संघर्ष असताना माझ्या शिराळा मतदारसंघातील बहाद्दरांनी, सांगली जिल्ह्यातील सर्व सहकाऱ्यांनी मला मदत केली. मी चार वेळा विधानसभेची निवडणूक जिंकली. परंतु ज्या दिवशी मी प्रदेश काँग्रेसचा अध्यक्ष झालो त्यावेळी खऱ्या अर्थाने माझ्या लक्षात आले की, जर संघर्षच करायचा असेल, लोकांचा विश्वास मिळवायचा असेल तर टप्प्याटप्प्याने आपण येथेही पोहोचू शकतो. आज मला या ठिकाणी सांगताना अभिमान वाटतो की, माझ्या समोर अविश्वासाचा ठराव आहे आणि अनेक संघर्ष करीत असताना सामान्यातील सामान्य माणसांनी मला जी ताकद दिली, तुमच्या सारख्या मित्रांनी मला जे प्रेम दिले, वडिलधाऱ्या मंडळींनी आशीर्वाद दिला, त्यामुळेच मी 18 वर्षे विधानसभेचा सदस्य आणि 19 वर्षापासून विधान परिषदेचा सदस्य म्हणून काम करीत आहे. जगलो, वाचलो तर माझी विधान परिषद सदस्यत्वाची आणखी 5 वर्षे मुदत शिल्लक आहे. अखिल भारतीय काँग्रेसने माझ्यावर केलेले जे ऋण आहेत, ते मला कधीही फेडता येणार नाहीत. आज अविश्वासाच्या प्रस्तावाला तोंड देत असताना माझ्या मनात यत्किंचितही खंत नाही.

माझे मित्र सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे साहेबांनी मोठ्या मनाने सांगितले की, मी थांबतो. तो आपला दोष नाही. श्री.तटकरे साहेब, खरे म्हणजे मला असे वाटते की, हा तत्वाचा प्रश्न आहे. मी अनेक वेळा माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले किंवा आपल्याला बोलावितो आणि चर्चा करतो. याबाबतीतही मी चर्चा केली असती. परंतु, मी मनाने ठरविलेले आहे की, लोकशाहीमध्ये ध्येयवादाने प्रेरित होऊन काम करीत असताना

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शिवाजीराव देशमुख **(सभापती) .......**

कोणत्याही संघर्षाला सामोरे जाणे, त्याला टक्कर देणे हा ध्येयवाद असणे जरूरीचे आहे. मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, मी गोरगरिबांवर प्रेम करणारा एक सामान्य कार्यकर्ता आहे आणि अशा पद्धतीने जीवनात काम करीत असताना मी अनेक वेळा त्यागही केलेला आहे. मी प्रदेश कॉंग्रेसचा अध्यक्ष होतो. मी अध्यक्ष पदावर असतानाही मला खूप त्रास झाला. एकदा अशी परिस्थिती निर्माण झाली की, एक व्यक्ती एक पद आणि त्यावेळी प्रदेशाध्यक्ष पद सोडावयाचे, का सार्वजनिक बांधकाम मंत्री पद सोडावयाचे, असा नाजूक प्रश्न माझ्या समोर निर्माण झाला होता. त्यावेळी अनेकांना असे वाटत होते की, मी प्रदेश कॉंग्रेसचे अध्यक्ष पद सोडणार आणि बांधकाम मंत्री पदावर काम करणार. मी त्यावेळी स्व.सुधाकरराव नाईक साहेबांना सांगितले की, नाईक साहेब, मी प्रदेश कॉंग्रेसचा अध्यक्ष म्हणून काम करतो आणि बांधकाम मंत्री पद सोडतो. कॉंग्रेस ही माझी मातृ संस्था आहे. माझ्या मातृ संस्थेची प्रतिष्ठा मी राखायची की कोणी राखायची ? या ध्येयवादाने प्रेरित होऊन आपण काम करावयाचे असते.

सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील साहेबांनी दोन-तीन बाबी उपस्थित केल्या. श्री.जयंत पाटील साहेब, मी अखिल भारतीय कॉंग्रेसच्या वर्किंग कमिटीचा विशेष निमंत्रित आहे, हे खरे आहे. कॉंग्रेस पक्षात ही मानाची नव्हे तर कर्तृत्वाची व प्रतिष्ठेची जागा आहे. एक अपवाद या दृष्टीने ती जागा मिळते. माझ्या कायदेशीर सल्लागारांनी मला सल्ला दिल्यानंतरच मी ती जागा स्वीकारण्याचे ठरविले. याबाबतीत आपल्या अन्य काही शंका असतील तर आपण त्या मला सांगाव्यात. मी आपल्याला पटवून देईन की, माझे सभापती पद आणि अखिल भारतीय कॉंग्रेसच्या वर्किंग कमिटीचे विशेष निमंत्रित पदही टिकत होते, म्हणून मी ते घेतलेले आहे.

सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील साहेबांनी सांगितले की, माझ्यावर यापूर्वी तीन वेळा अविश्वास ठराव आला होता, ही गोष्ट खरी आहे. हे नाकारण्याचे काही कारण नाही. त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री, माननीय विरोधी पक्ष नेते, सन्माननीय गट नेते यांनी माझ्या दालनात बैठक घेतली. माझ्यावरील अविश्वास ठरावाच्या संदर्भातील बैठकीला मी कधीही उपस्थित नव्हतो. एक वेळ ती बैठक झाल्यानंतर मला बोलाविण्यात आले. त्यांनी चर्चा करुन माझ्या विरुद्ध अविश्वास ठराव

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शिवाजीराव देशमुख **(सभापती) ...**

न मांडता ते त्याच ठिकाणी थांबविले. यात नाकारण्यासारखे काय आहे ? जी वस्तुस्थिती आहे ती आपण सांगितली, त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देईन. माझी सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील साहेबांना आणखी एक विनंती आहे आणि ती म्हणजे आपण भाषणाच्या शेवटी असे म्हणालात की, अन्य काही गोष्टी आहेत. मला असे वाटते की, तुमच्या मनात ज्या भावना आहेत त्या सर्व गोष्टी तुम्ही लिखित स्वरुपात द्याव्यात. त्या बाबतीत कोणत्याही पद्धतीने, कोणतीही चौकशी करावयाची असेल तर मी त्याला सामोरे जाण्यास तयार आहे. त्यामध्ये माझ्यावर एक टक्का देखील दोष आला तर तुम्ही सांगाल ती शिक्षा, हे सभागृह सांगेल ती शिक्षा भोगायला मी तयार आहे. आयुष्यभर ध्येयवादाने जगणारा, खऱ्या अर्थाने अभिमानाने वागणारा, कोणत्याही परिस्थितीत मान खाली न घालणारा मी कार्यकर्ता आहे आणि या दृष्टीने काम करीत असताना मी मागील 11 वर्षे विधानपरिषदेचा सभापती म्हणून तुमच्या समोर काम करीत आहे. तुम्ही तिन्ही वेळा मला सभापती म्हणून बिनविरोध निवडून दिलेले आहे आणि अशा पद्धतीने या सर्वोच्च सदनाला अभिमान वाटेल या पद्धतीने काम करण्यासाठी मला सातत्याने तुमचे सहकार्य मिळाले.

माझे दोन मित्र, माननीय श्री.दिवाकरजी रावते आणि माननीय श्री.विनोद तावडेजी, यांना मी सांगू इच्छितो की, काम करीत असताना काही वेळा त्या क्षणी निर्माण झालेली परिस्थिती लक्षात घेता सभापती या अनुषंगाने एखादा अपवाद म्हणून निर्णय घेतात, त्या पद्धतीने मी तो निर्णय नक्की घेतला. परंतु, नंतरच्या काळात ज्यावेळी अन्य सर्वांनी मला सांगितले, मला पटले, त्यावेळी त्यांना अत्यंत प्रेमाने बोलावून, त्यांचे अत्यंत प्रेमाने स्वागत करुन मी त्यांच्या शिक्षा कमी केलेल्या आहेत. मला असे वाटते की, अत्यंत अवघड काम जर कोणते असेल तर ते विधान परिषदेच्या सभापतींचे असते. सभागृहातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना नेहमी असे वाटले पाहिजे की, सभापती आमच्या बाजूने बघतात. मी या दृष्टीने काम करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

मी सामान्य कुटुंबातील असल्यामुळे नकळत मी लाजाळू असल्यासारखे विशेषत: वृत्तपत्र क्षेत्राला वाटते याची मला जाणीव आहे. कारण, मी सहजगत्या दोन-तीन वेळा माझ्या वृत्तपत्रातील मित्रांबरोबर बोललो. त्यांनी मला सांगितले की, हे सहज बोलण्याकरिता आहे, छापण्याकरिता नाही.

यानंतर श्री.भोगले.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शिवाजीराव देशमुख **(सभापती)....**

पण त्यातील एका मित्राने मद्रास हिंदू वृत्तपत्रात ते छापले. त्यामुळे मला राज्यात आणि दिल्लीतही अडचण निर्माण झाली. त्यानंतर मी ठरविले की, पाणी सुध्दा फुंकून प्यायचे. ताक फुंकून प्यायचे कारण नाही. पण तेही करायचे आणि दूधही फुकून प्यायचे असे ठरविणारा मी कार्यकर्ता आहे.

मी सभागृहाला सांगू इच्छितो की, माझ्याविरुध्द मांडण्यात आलेल्या अविश्वासाच्या ठरावाबाबत मला यत्किंचितही बोलायचे नाही. मला एकच सांगायचे आहे. आमच्या वाली आणि सुग्रीवाच्या युध्दामध्ये रामाने बाण मारण्याचे काही कारण नव्हते असे मला वाटते. आम्ही वाली आणि सुग्रीव आहोत. एकाची गदा याला लागेल किंवा त्याची गदा मला लागेल. पण हे युध्द चालू असताना रामाने त्यात बाण मारला नसता तर बरे झाले असते असे माझ्या मनाला वाटते. मी अभिमानाने माझ्या शिवसेनेच्या मित्रांचे आभार मानतो. स्व.बाळासाहेब ठाकरे यांचे नाव घेत असताना महाराष्ट्राचे एक अभिवादन या दृष्टीने मी त्यांच्याकडे पाहतो. श्री.उध्दवजी ठाकरे यांनी या अनुषंगाने जे सहकार्य द्यायचे ठरविले त्याकरिता मी त्यांचा ऋणी आहे. मी सभागृहाला विनंती करतो की, एक ध्येयवादी कार्यकर्ता असताना आज माझ्या विरोधात अविश्वासाचा ठराव येतो, आयुष्यात अशा पध्दतीने एक अत्यंत मोठे संकट माझ्यावर येत असताना मला अगदी यत्किंचितही असे वाटत नाही की, आपण राजीनामा देऊन पळून जावे. मी आयुष्यात माझी पाठ युध्दाकडे कधी फिरविली नाही. मी या अविश्वास ठरावाला सामोरे जायचे ठरविले आहे. माझ्या काँग्रेस पक्षाने आयुष्यभर मला सहकार्य केलेले आहे. सातत्याने मला मोठे करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केलेले आहेत. या विधानपरिषदेमध्ये 11 वर्षे मी काम करीत असताना माझ्याकडून जर एखाद्या सदस्याच्या अनुषंगाने एखादी चूक झाली असेल तर मला तुम्ही क्षमा करा.

माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांना विरोधी पक्षनेता म्हणून निवडत असताना माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांचाही एक अर्ज आला होता. या अनुषंगाने सदनामध्ये सात ते आठ वेळा तो प्रश्न उपस्थित झाला. एक दिवस या सदनामध्ये मी नक्की सांगितले की, मी निर्णय नक्की घेत आहे. अचूक निर्णय मी नक्की घेणार आहे. कोणावरही अन्याय करणार नाही. माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे प्रदेशाध्यक्ष असताना त्यांना मी बोलावून सांगितले की, माणिकरावजी, आपण जो अर्ज केलेला आहे तो संपूर्णपणे मी तपासला आहे. त्या अनुषंगाने मला असे वाटते की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांना मला विरोधी

...2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शिवाजीराव देशमुख **(सभापती)....**

पक्षनेता करणे आवश्यक आहे. त्यांनी सांगितले की, जो निर्णय आपण घ्याल तो आम्हाला मान्य आहे. म्हणून मी माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांना विरोधी पक्षनेता केले ही वस्तुस्थिती आहे. त्यावेळेला काहींना वाटले की, मला कोणीतरी सल्ला देतो. बिनचूक असेल तर तेथे ऐकतो, अन्यथा आयुष्यात मी कोणाचा सल्ला घ्यायच्या भानगडीत पडत नाही. त्या दृष्टीने मी काम करतो.

या ठिकाणी बोलत असताना सन्माननीय प्रा.ना.स.फरांदे सरांच्या बाबतीत दोन तीन मुद्दे उपस्थित केले गेले. एक नक्की आहे की, मला माझ्या कॉंग्रेस पक्षाने साधारणपणे 1994 च्या दरम्यान मला सांगितले, शिवाजीराव तुम्ही तीन वर्षे थांबणे आवश्यक आहे. मी सांगितले, पक्ष जो निर्णय घेईल तो मला मान्य आहे. त्या अनुषंगाने प्रा.ना.स.फरांदे साहेब जरी माझे भारतीय जनता पक्षाचे सहकारी कार्यकर्ते असले तरी त्यांनी तीन वर्षे या सभागृहात सभापती म्हणून काम केले. मी या ठिकाणी एवढीच अपेक्षा करतो की, ही सर्व पार्श्वभूमी असताना माझ्याविषयी अविश्वास वाटावा असे कोणतेही कृत्य मी सभागृहात अथवा सभागृहाबाहेर केलेले नसताना तसा उल्लेख सुध्दा आजच्या या ठरावात नसताना आकड्यांचे सोंगटे फेकून सौहार्दपूर्ण परंपरेला काळिमा फासत या सारिपाटावर अप्रतिष्ठेचे गणित जुळविण्याच्या प्रयत्नाचा मला खेद वाटतो.

आजपर्यंत आपण सर्वांनी, विधीमंडळाचे अधिकारी व कर्मचारी, पत्रकार मित्र यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल सर्वांचे आभार मानतो. संसदीय लोकशाही पक्ष यंत्रणा आणि नेतृत्व यांचे अनन्यसाधारण महत्व आहे. माझ्या कॉंग्रेस पक्षाच्या नेत्या आदरणीय श्रीमती सोनिया गांधी तसेच अन्य सर्व नेत्यांविषयी मी कृतज्ञता व्यक्त करतो. धन्यवाद. जय हिंद, जय महाराष्ट्र.

**उप सभापती** : आता मी प्रश्न मतास टाकतो.

(अनेक माननीय सदस्य सभागृहात पोलची मागणी करीत असतात)

ठीक आहे. विभाजनाची घंटा वाजविण्यात यावी.

नंतर 2एफ.....1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)**

(विभाजनाची घंटा वाजवून झाल्यानंतर)

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**उप सभापती :** आता सभागृहाचे दरवाजे बंद करण्यात येतील. मत विभाजनाची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत दरवाजे उघडण्यात येणार नाहीत.

(सभागृहाचे दरवाजे बंद केल्यानंतर)

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, या मतदानाच्या प्रोसेसमध्ये शिवसेनेला भाग घ्यावयाचा नाही म्हणून आम्ही सभात्याग करतो.

(शिवसेना पक्षातील काही माननीय सदस्य दरवाजापर्यंत जातात.)

**उप सभापती :** आता दरवाजे उघडण्यात येणार नाहीत. कोणीही दरवाजे उघडायचे नाहीत. दरवाजे बंद केलेले आहेत. कृपया सन्माननीय सदस्यांनी बाहेर जाऊ नये. आपणास तटस्थ रहावयाचे असेल तर आपण् तटस्थ रहावे. आपण कृपा करून शांतपणे सभागृहात बसावे. तत्पूर्वी प्रधान सचिवांनी सन्माननीय सदस्यांना मत विभाजनाची प्रक्रिया समजावून सांगावी.

प्रधान सचिव : मत विभाजनाच्या वेळी प्रथम अनुकूल असणाऱ्या सन्माननीय सदस्यांनी स्वस्थानी उभे राहून संख्या मोजावी व खाली बसावे. तद्नंतर प्रतिकूल असणाऱ्या सन्माननीय सदस्यांनी स्वस्थानी उभ् राहून संख्या मोजावी व खाली बसावे.

**उप सभापती** : आता विभाजनाला सुरूवात होत आहे.

यानंतर श्री.जुन्नरे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(अनुकूल व प्रतिकूल सदस्यांची मतमोजणी संपल्यानंतर)

**उप सभापती :** प्रस्तावाला अनुकूल असलेल्यांची संख्या 45 आहे.

प्रस्तावाला प्रतिकूल असलेल्यांची संख्या 22 आहे.

40 वा त्यापेक्षा जास्त सदस्यांनी प्रस्तावास अनुकूलता दर्शवली असल्यामुळे संविधानातील व नियमातील तरतुदीप्रमाणे प्रस्ताव संमत झाला असे मी घोषित करतो.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या मंगळवार, दिनांक 17 मार्च, 2015 रोजी दुपारी 12 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 6 वाजून 21 मिनिटांनी, मंगळवार, दिनांक 17 मार्च, 2015 च्या दुपारी 12 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION